



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, मंगळवार २८ आक्टोबर २०२५ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०





केंद्रीय निवडणूक आयोगाची मोठी घोषणा

# एसआयआरचा दुसरा टप्पा जाहीर

## 12 राज्यांसह केंद्रशासित प्रदेशांचा समावेश




**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** केंद्रीय निवडणूक आयोगाने आणखी एक मोठी घोषणा केली आहे. देशातील १२ राज्यांसह काही केंद्रशासित प्रदेशांत एसआयआरच्या मोहिमेचा दुसरा टप्पा जाहीर करण्यात आला आहे. बिहारमध्ये मतदार याद्यांच्या विशेष सखोल फेरतपासणीमुळे (एसआयआर) मोठ्या प्रमाणात वाद उद्भवल्याचं पाहायला मिळालं. विरोधकांनी निवडणूक आयोगाच्या या एसआयआर प्रक्रियेवर आक्षेप घेत जोरदार टीका केली होती. यावरून चांगलंच राजकारणही तापल्याचं पाहायला मिळालं. मात्र, असं असतानाही आता केंद्रीय निवडणूक आयोगाने आणखी एक मोठी घोषणा केली आहे. देशातील १२ राज्यांसह काही केंद्रशासित प्रदेशांत एसआयआर मोहिमेचा दुसरा टप्पा जाहीर करण्यात आला आहे. आज निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक आयुक्तज्ञानेश कुमार यांनी पत्रकार परिषद घेत ही घोषणा केली आहे.

बिहारमध्ये एसआयआरचा पहिला टप्पा यशस्वी पार पाडल्यानंतर निवडणूक आयोगाने सर्व राज्यातील निवडणूक आयोगाच्या आयुक्तांबरोबर एक महत्वाची बैठक घेतली. त्या बैठकीत एसआयआरबाबत सविस्तर चर्चा झाली. एसआयआरचा पहिला ➪(पान २ वर)

# घराणेशाहीचे राजकारण आता चालणार नाही

## ठाकरे बंधूंवर अमित शाहांचा निशाणा

**मुंबई/प्रतिनिधी :** घराणेशाहीचे राजकारण आता या देशात चालणार नाही. कामगिरीच्या बळावर देशाचे नेतृत्व ठरेल. एका गरीब कुटुंबात जन्मलेला चहा विक्री करणारा मुलगा देशाचा तीनदा पंतप्रधान बनतो हे आमच्या पक्षाने दाखवून दिले असे सांगत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी अप्रत्यक्षपणे ठाकरे बंधू यांच्यावर निशाणा साधला. मुंबईत भाजपा कार्यालयाच्या भूमिपूजनासाठी ते आले होते. या कार्यक्रमातून त्यांनी भाजपा आणि घराणेशाहीचे राजकारण यावर भाष्य केले.अमित शाह म्हणाले की, जो पक्षाच्या सिद्धांतावर चालतो, ज्याच्यात कामगिरी करण्याची ताकद आहे तोच भाजपात मोठा नेता बनू शकतो. कामगिरीच्या बळावरच देशाचे नेतृत्व ठरेल. घराणेशाहीचे राजकारण आता चालणार नाही. नरेंद्र मोदी हे उत्तम उदाहरण आहे. गरीब चहावाल्याच्या घरात जन्मलेला मुलगा, त्याचा त्याग, समर्पण,



देशभक्तीच्या आधारे या देशाचा पंतप्रधान बनतो. ३ वेळा पंतप्रधानपद सांभाळण्याचे संधी मिळते. लोकशाही पक्षात आपला विश्वास किती दृढ आहे हे दिसून येते. जे पक्ष त्यांच्या संघटनेच्या कामकाजात लोकशाही आणू शकत नाही. ते पक्ष देशातील लोकशाहीचे कधी रक्षण करू शकत नाहीत असा टोला त्यांनी लगावला.तसेच आज आपण भाजपच्या नवीन कार्यालयाचे भूमिपूजन करत आहोत पण जिल्हा मुख्यालयाचे काम बाकी आहे. प्रत्येक जिल्ह्यात डिसेंबर २०२६ पर्यंत भाजपाचं कार्यालय असायला हवे असे अमित शाह यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांना सूचना केल्या. शत प्रतिशत भाजपाच्या दिशेने आपण वाटचाल करत आहोत. अनेक बड्या नेत्यांनी आयुष्य पक्षासाठी आणि देशसेवेसाठी वेचले. त्यांच्या कामाचे फळ म्हणून आज जिल्हा परिषदेपासून पंचायत समितीपासून देशभर भाजपा पसरली असेही अमित शाह यांनी म्हटले.

**विरोधकांचा सुपडा साफ करा**-मी पक्षाचा अध्यक्ष बनलो, त्यानंतर निवडणुका लागल्या➪(पान २ वर)

# मतदारांनो सावधान! 10 कागदपत्रे नसतील तर नाव होणार कट




**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**केंद्रीय निवडणूक आयोग देशभरात 'मतदार यादी दुरुस्ती' मोहिम राबवणार आहे. आज आयोगाने पत्रकार परिषद घेउन याबाबत मोठी घोषणा केली. बिहारनंतर, मतदार यादी दुरुस्ती प्रक्रिया आता १२ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये सुरू होणार आहे. यामध्ये अंदमान आणि निकोबार बेटे, छत्तीसगड, गोवा, गुजरात, केरळ, लक्षद्वीप, मध्य प्रदेश, पुद्दुचेरी,➪(पान २ वर)

# आरोपी आणि महिला डॉक्टरचे वारंवार चॅटिंग

## पोलिस तपासातून धक्कादायक खुलासे

**सातारा /प्रतिनिधी :** फलटण उपजिल्हा रुग्णालयातील महिला डॉक्टर आत्महत्येने महाराष्ट्र हादरला असून राज्यभरातून तीव्र प्रतिक्रिया येत आहेत. आपल्या हातावर पेनाने सुसाईड नोट लिहून डाक्टर महिलेने आपले जीवन संपवल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणांमध्ये सुरू असलेल्या तपासाबाबत पोलीस अधीक्षक तुषार दोशी यांनी आज महत्वाचे खुलासे केले आहेत. याप्रकरणी सुरू असलेल्या तपासाची माहिती देताना, मृत महिला डाक्टर आणि आरोपी यांच्यात वारंवार चॅटिंग सुरू होते असा खळबळजनक दावा



पोलिस अधिक्षकांनी केला आहे.

फलटण शहर पोलिस ठाण्यात जो गुन्हा दाखल करण्यात आला, तो आत्महत्येचा गुन्हा आहे. या प्रकरणात दोन्ही आरोपी सध्या अटकेत आहेत, दोन्ही आरोपी सध्या पोलिस कस्टडीमध्ये असून त्यांचा डीवायएसपी यांच्यामार्फत तपास सुरू आहे. सीडीआर असेल किंवा इतर पुरावे, यामार्फत आरोपीविरुद्ध काय पुरावे मिळतात याचा तपास सध्या सुरू आहे. सध्या प्राथमिक पीएम रिपोर्ट मिळाले असून फायनल पीएम रिपोर्ट आज किंवा उद्या आम्हाला मिळतील. त्याचबरोबर काही फारेन्सिक रिपोर्ट देखील लवकरच हाती येतील. त्यानुसार मयत आणि आरोपी यांचे काही➪(पान २ वर)

# मुंबईवर दोन व्यापा-यांचा डोळा, आज एक जण येऊन गेला

## शाहांच्या दौ-यावरून ठाकरेंचा हल्लाबोल

**मुंबई/प्रतिनिधी :**आज मुंबईमध्ये शिवसेना ठाकरे गटाचा निर्धार मेळावा सुरू आहे, या मेळाव्यात बोलताना उद्धव ठाकरे यांनी भाजपवर जोरदार हल्लाबोल केला आहे. आज केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे मुंबईच्या दौ-यावर होते, त्यांच्या हस्ते मुंबईमध्ये भाजपच्या कार्यालयाचं भूमीपूजन झालं, यावरून उद्धव ठाकरे यांनी जोरदार हल्लाबोल केला आहे. मुंबईवर दोन व्यापा-यांचा डोळा आहे, आज एक जण येउन गेला, असं उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे.



आज भाजप असेल मिंधे असेल त्यांच्याकडे पैसा आहे. पण जीवाला जीव देणारी माणसं नाहीयेत. त्या दिवशी, दसरा मेळाव्याच्या दिवशी पाउस पडत होता. पाउसमध्ये जाणवत होता, मध्येच जाणवत नव्हता. तुमचा प्रतिसाद एवढा की पाउसही फिका पडला. पावसामुळे काही जण फटक्यातून ➪(पान २ वर)

# पक्ष कार्यालयातील लावणी नृत्याने राष्ट्रवादी शहराध्यक्ष अडचणीत



**नागपूर/प्रतिनिधी :** कार्यालयात लावणी नृत्य केल्याची चित्रफिती व्हायरल झाल्यानंतर वृत्तवाहिन्यांवर वृत्त झळकले आणि राष्ट्रवादीचे (अजीत पवार) नागपूर शहर अध्यक्ष अनिल अहिरकर अडचणीत आले आहेत. प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी त्यांना खुलासा करण्यास सांगितले आहे. नागपूर शहर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कार्यालय येथे आयोजित दीपावली मिलन कार्यक्रमात पक्षाचे काही पदाधिकारी यांनी नृत्य व नाचगाणी सादर केले. त्याची माध्यमामध्ये प्रसिद्धी होउन पक्षाची प्रतिमा मलीन होत आहे. त्यामुळे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी या प्रकरणाबाबतचा लेखी खुलासा सात दिवसांच्या करण्याची सूचना केली आहे.

दरम्यान, दीपावलीच्या मंगल पर्वाचे औचित्य साधून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी नागपूर शहर व ग्रामीणतर्फे दिवाळी मिलनकार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या स्नेहमेळाव्यात शहर आणि परिसरातील➪(पान २ वर)



# पूरग्रस्तांना मदतीचा हात; मुख्यमंत्री सहाय्यता निधीस ५ लाखांचा धनादेश सुपूर्द


**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रातील अलीकडील पूर आपत्तीमुळे बाधित झालेल्या नागरिकांना मदत करण्याच्या उद्देशाने, मुंबई भाजप उपाध्यक्ष अमरजीत मिश्रा यांच्या दीप कमल फाउंडेशन या सामाजिक संस्थेने मुख्यमंत्री सहाय्यता निधीस ५ लाख रुपयांचे योगदान दिले आहे. ➪(पान २ वर)

## ठाकरे गटाचेही 'लाव रे तो व्हिडिओ'

# एका खोलीच्या पत्त्यावर 38 मतदारांची नोंदणी

### आदित्य ठाकरेंचे मतचोरीविरोधातील सादरीकरणा

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात येत्या काही महिन्यांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत. या निवडणुकांसाठी सर्वच राजकीय पक्षांनी जोरदार तयारी सुरू केली आहे. मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज मुंबईतील वरळी डोम येथे शिवसेनेचा (उद्धव ठाकरे) निर्धार मेळावा पार पडला. या मेळाव्यात आमदार आदित्य ठाकरे




यांनी मतचोरीविरोधात सादरीकरण केले. यावेळी त्यांनी व्हिडिओच्या माध्यमातून मतदार याद्यांमधील त्रुटी समोर आणल्या. यावेळी आदित्य ठाकरे यांनी एक व्हिडिओ दाखवला. या व्हिडिओमध्ये एका खोलीचे घर पाहायला मिळाले. यावेळी त्यांनी दावा केला की, ➪(पान २ वर)

# छठ पूजेदरम्यान नाव उलटली, अनेक जण बुडाल्याची शक्यता

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** उत्तर प्रदेशातील चंदौली येथे सोमवारी छठ पूजेदरम्यान एक मोठी दुर्घटना घडली. येथे लोक सेल्फी घेत असतानाच एक नाव उलटली. या नावेवरील अनेक जण नदी पात्रात बुडाल्याचे वृत्त आहे. या घटनेमुळे परिसरात एकच गोंधळ उडाला. यावेळी घाटावर असलेल्या काही स्थानिक लोकांनी तत्काळ नदपात्रात उड्या घेत चार जणांना जीव वाचवल्याचे समजते. इतरांचा शोध सुरू आहे. पोलिसही गोताखोरांसह ➪(पान २ वर)



# लोकमान्य टिळक एक्सप्रेसचे डबे वेगळे

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**उत्तर प्रदेशातील चित्रकूट जिल्ह्यात मध्यरात्री भीषण रेल्वेअपघात थोडक्यात टळला. मुंबईहून भागलपूरकडे जाणारी लोकमान्य टिळक भागलपूर एक्सप्रेस ट्रेन दोन भागांत विभागली गेली. ट्रेनची कपलिंग (डब्यांना जोडणारा भाग) तुटल्याने मागील तीन डबे मुख्य ट्रेनपासून वेगळे झाले. मात्र ट्रेनचा वेग कमी असल्याने मोठा अपघात टळला. ही धक्कादायक घटना मझगाव-टिकरिया रेल्वे स्थानकांच्या दरम्यान रात्री ➪(पान २ वर)






# बांगलादेशात हाफीज सईदची नापाक खेळी

## ■ ईशान्येकडे भारतासाठी धोक्याची घंटा ■ सीमेवर हालचाली वाढल्या

**ढाका/वृत्तसंस्था :** कुख्यात दहशतवादी संघटना लष्कर ए तोयबाचा नेता हाफीज सईद बांगलादेशच्या धरतीवर वेगाने पाय पसरत आहे. हाफीजचा जवळचा सहकारी आणि मरकजी जमीयत अहल ए हदीसचा सदस्य २५ ऑक्टोबरला ढाका येथे पोहचला. त्यानंतर त्याने २७ ऑक्टोबरला भारतबांगलादेश सीमेवरील चपैनवाबगंज परिसरात दौरा केला. इब्तिसाम इलाही जहीर नावाच्या या मौलानाचा दौरा इस्लामशी निगडीत असल्याचा दाखवला जातोय परंतु भारत बांगलादेश सीमेवरील वाढत्या हालचालींमुळे ईशान्य भारतात



काहीतरी मोठं षडयंत्र सुरू असल्याचे संकेत मिळत आहेत. याआधीही पाकिस्तानी गुप्तचर एजन्सी आयएसआयने ईशान्येकडे अस्थिरता निर्माण करण्याचा कट रचला होता. एका रिपोर्टनुसार, मरकजी जमीयत अहल ए हदीसचा इब्तिसाम इलाही जहीर २ दिवसापूर्वी अचानक बांगलादेश दौ?यावर आल्याने गुप्तचर यंत्रणा हैराण आहेत. जहीर मरकजी जमीयत अहल ए हदीसचा महासचिव आहे. बांगलादेशी गुप्तचर यंत्रणाही जहीरच्या हालचालींवर नजर ठेवून आहेत. जहीर २५ ऑक्टोबरला संध्याकाळी राजशाहीच्या शाह मकदूम विमानतळावर उतरला होता. अब्दुर रहीम बिन रज्जाक नावाच्या व्यक्तीने त्याचे स्वागत केले. तो अल जामिया अस सलिफाचा सदस्य आहे. जी देशातील अहल ए हदीस चळवळीतील बांगलादेशीत शाखेशी जोडलेला आहे. अब्दुल्ला बिन अब्दुर रज्जाक हे ➪(पान २ वर)

# अरूणाचल सीमेपासून 40 किमी अंतरावर चीनने बांधला मोठा एअरबेस



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** चीनने तिबेटमधील लुंजे एअरबेसवर ३६ नवीन हार्डनाइज्ड एअरक्राफ्ट शेल्टर, नवीन प्रशासकीय इमारती आणि एक मोठे विमान पार्किंग क्षेत्र तयार केले आहे. हा एअरबेस मॅकमोहन रेषेपासून ४० किमी आणि अरुणाचल प्रदेशातील तवांगपासून अंदाजे १०७ किमी अंतरावर आहे.या बांधकामामुळे, चीन आता या भागात आपले लढाउ विमान आणि ड्रोन सिस्टीम वेगाने तैनात करु शकेल. माजी हवाई दल प्रमुख एअर चीफ मार्शल बीएस धनोआ यांनी याबाबत एका वृत्तवाहिनीली माहिती दिली. 'लुंजे येथे ३६ मजबूत नवीन हार्डनाइज्ड एअरक्राफ्ट शेल्टरच्या बांधकामावरून चीन भविष्यात➪(पान २ वर)

# आंध्र प्रदेशात मुसळधार पाउस, अनेक गाड्या रद्द

**बंगळुरू/वृत्तसंस्था :** चक्रीवादळ मोंथा लँडफाल झाला आहे, ज्यामुळे किनारी जिल्ह्यांमध्ये पाउस आणि जोरदार वारे वाहत आहेत. चक्रीवादळाची तीव्रता लक्षात घेता, दक्षिण मध्य रेल्वेने अनेक गाड्या रद्द केल्या आहेत. आंध्र प्रदेश राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे (एपीएसडीएमए) व्यवस्थापकीय संचालक प्रखर जैन यांनी सोमवारी सांगितले की चक्रीवादळ मोंथा लँडफाल झाला आहे. २८ ऑक्टोबर रोजी त्याचे तीव्र चक्रीवादळात रूपांतर होण्याची शक्यता आहे. हवामान खात्याच्या मते, वादळ जमिनीजवळ येताच त्याची तीव्रता वाढेल. गेल्या सहा तासांत ताशी १८ किलोमीटर वेगाने वारे वाहत असल्याची नोंद झाली आहे. हवामान विभागाच्या मते, '२८ ऑक्टोबर रोजी संध्याकाळी किंवा रात्री हे चक्रीवादळ काकीनाडाजवळील आंध्र प्रदेशच्या किना-यावरून तीव्र चक्रीवादळाच्या स्वरूपात धडकण्याची शक्यता आहे.'



जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# आपल्या सीमेवर कधीही काहीही घडू शकते

## ऑपरेशन सिंदूरचा उल्लेख करत राजनाथ सिंह यांचे लक्षवेधी विधान

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** मे महिन्यात पाकिस्तानबरोबर झालेल्या चार दिवसांच्या संघर्षाने सीमेवर कधीही काहीही घडू शकते याची आठवण करून दिली, असे सांगत संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी भारताने नेहमीच युद्धासारख्या परिस्थितीसाठी तयार राहिले पाहिजे, असे म्हटले. सोसायटी ऑफ इंडियन डिफेन्स मॅन्युफॅक्चरर्सच्या कार्यक्रमात बोलताना राजनाथ सिंह म्हणाले की, ऑपरेशन सिंदूरचा राष्ट्रीय सुरक्षा आणखी भक्कम करण्याच्या तयारीसाठी केस स्टडी म्हणून वापर करता येईल. ऑपरेशन सिंदूरचा आपण एक केस स्टडी म्हणून वापर करायला हवा. यातून आपण नव्या गोष्टी शिकू शकतो आणि आपला भविष्याचा मार्ग आखू शकतो. या घटनेने आपल्याला पुन्हा एकदा दाखवून दिले आहे की, आपल्या सीमेवर कधीही आणि कुठेही काहीही घडू शकते, असे ते म्हणाले. आपण त्या परिस्थितीला कठोर प्रत्युत्तर दिले असले आणि आपले सैन्य देशाच्या सीमांचे रक्षण करण्यासाठी पूर्णपणे तयार असले तरी, आपण आत्मपरीक्षण करत राहिले पाहिजे, असेही सिंह म्हणाले. याबाबत




पीटीआय या वृत्तसंस्थेने वृत्त दिले आहे. राजनाथ सिंह यांनी सांगितले की, ऑपरेशन सिंदूरने भारताच्या स्वदेशी विकसित संरक्षण प्रणालींचा प्रभाव दाखवून दिला. ऑपरेशन सिंदूर दरम्यान आकाश क्षेपणास्त्र प्रणाली, ब्रह्मोस, आकाशतीर हवाई संरक्षण नियंत्रण प्रणाली आणि इतर स्वदेशी संरक्षण प्रणालींची ताकद आपण सर्वांनी पाहिली आहे, असे राजनाथ सिंह म्हणाल्याचे वृत्त एएनआय या वृत्तसंस्थेने दिले आहे. स्वदेशीकरणावरील सरकारच्या धोरणावर प्रकाश टाकताना राजनाथ सिंह म्हणाले की, भारताचे संरक्षण उत्पादन २०१४ मध्ये सुमारे ४६,००० कोटी रुपये होते. ते आता १.५१ लाख कोटी रुपयांपर्यंत वाढले आहे. यामध्ये खाजगी क्षेत्राचे ३३,००० कोटी रुपयांचे योगदान आहे. एका दशकापूर्वी १,००० कोटी रुपयांपेक्षा कमी असलेली संरक्षण निर्यात आता अंदाजे २४,००० कोटी रुपयांपर्यंत वाढली आहे आणि मार्च २०२६ पर्यंत ती ३०,००० कोटी रुपयांपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे, असेही राजनाथ सिंह यांनी नमूद केले.

**ऑपरेशन सिंदूर-**जम्मू आणि काश्मीरच्या पहलगाममध्ये २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून भारतीय लष्कराने पाकिस्तान व पाकिस्तानव्याप्त जम्मू आणि काश्मीरमधील ९ दहशतवादी तळांवर हवाई हल्ले केले होते. या हवाई हल्ल्यात १०० हून अधिक दहशतवादी मारले गेले होते. यानंतर पाकिस्तानने भारतावर हल्ले करण्याचा प्रयत्न केला होता, जो भारतीय लष्कराने यशस्वीपणे परतावून लावला होता.

# विदर्भाला मुंबई, पुण्याशी जोडणा-या 23 विशेष गाड्या आजपासून धावणार

**अकोला/प्रतिनिधी :** सणासुदीच्या काळातील गर्दी लक्षात घेउन रेल्वेने प्रवाशांना मोठा दिलासा दिला आहे. विदर्भाला मुंबई, पुण्याशी जोडणा-या विशेष गाड्या २८ ऑक्टोबरला सोडल्या जाणार आहेत. मध्य रेल्वेकडून २८ ऑक्टोबरला एकूण २३ विशेष गाड्या चालवल्या जाणार आहेत. त्यातील १४ विशेष गाड्या भुसावळ विभागातून धावतील. गाडी क्र. ०१०११ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस - नागपूर विशेष छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून ००.२० वाजता सुटेल. या गाडीला दादर, ठाणे, कल्याण, इगतपुरी, नाशिक रोड, मनमाड, चाळीसगाव, पाचोरा, जळगाव, भुसावळ, मलकापूर, शेगाव, अकोला, मूर्तिजापूर, बडनेरा, धामणगाव आणि वर्धा येथे थांबा राहील. गाडी क्र. ०१४०३ पुणे -अमरावती विशेष पुणे येथून रात्री १९.५५ वाजता सुटेल. या गाडीला दौंड कार्ड लाईन, अहिल्यानगर, बेलापूर, कोपरगाव, मनमाड, चाळीसगाव, जळगाव, भुसावळ, मलकापूर, शेगाव, अकोला, मूर्तिजापुर आणि बडनेरा येथे थांबा आहे. चार वातानुकूलित तृतीय श्रेणी, सहा शयनयान, सहा सामान्य द्वितीय श्रेणी आणि दोन सामान्य द्वितीय श्रेणीसह गार्ड ब्रेक व्हॅन, अशी गाडीची संरचना आहे.



**गाडी क्र. ०१४०१ पुणे** - नागपूर विशेष पुणे येथून रात्री २०.३० वाजता सुटेल. या गाडीला दौंड कार्ड लाईन, अहिल्यानगर, बेलापूर, कोपरगाव, मनमाड, चाळीसगाव, पाचोरा, जळगाव, भुसावळ, मलकापूर, शेगाव, अकोला, मूर्तिजापुर, बडनेरा, धामणगाव आणि वर्धा येथे थांबा आहे. गाडी क्र. ०१२०२ हडपसर - नागपूर विशेष हडपसर येथून दुपारी १५.५० वाजता सुटेल. या गाडीला उरळी, दौंड कार्ड लाईन, अहिल्यानगर, बेलापूर, कोपरगाव, मनमाड, जळगाव, भुसावळ, मलकापूर, शेगाव, अकोला, बडनेरा, धामणगाव आणि वर्धा येथे थांबा आहे. गाडी क्र. ०१४१० नागपूर - पुणे विशेष नागपूर येथून १६.१० वाजता सुटेल. या गाडीला वर्धा, धामणगाव, बडनेरा, मूर्तिजापूर, अकोला, शेगाव, मलकापूर, भुसावळ, जळगाव, पाचोरा, चाळीसगाव, मनमाड, कोपरगाव, बेलापूर, अहिल्यनगर आणि दौंड कार्ड लाईन येथे थांबा राहील.

**गाडी क्र. ०१०१२ नागपूर -** छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस विशेष नागपूर येथून २२.१० वाजता सुटेल. ही गाडी वर्धा, धामणगाव, बडनेरा, मूर्तिजापूर, अकोला, शेगाव, मलकापूर, भुसावळ, जळगाव, पाचोरा, चाळीसगाव, मनमाड, नाशिक रोड, इगतपुरी, कल्याण, ठाणे आणि दादर येथे थांबणार आहे. या विशेष गाड्यांपुढे गर्दीच्या काळात प्रवाशांची सुविधा होणाार आहे.

पान १ व १० वरून

## एसआयआरचा दुसरा टप्पा

टप्पा यशस्वी पार पडल्यानंतर आता काही राज्यात यशस्वी एसआयआरचा दुसरा टप्पा सुरू करण्यात येणार आहे. एसआयआरचा मुख्य उद्देश हाच आहे की प्रत्येक योग्य मतदाराचा मतदार यादीत समावेश करणं आणि अयोग्य मतदाराचं नाव मतदार यादीतून कमी करणं असं निवडणूक आयोगाचे आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी म्हटलं आहे.

बिहारमध्ये एसआयआरचा पहिला टप्पा पार पडल्यानंतर आता देशातील १२ राज्य आणि काही केंद्र शासित प्रदेशात एसआयआरचा दुसरा टप्पा सुरू करण्यात येणार आहे. आता या १२ राज्यात आणि काही केंद्र शासित प्रदेशात एसआयआर करण्यात येणार असल्यामुळे आज रात्री १२ नंतर येथील मतदार याद्या गोठवण्यात येतील निवडणूक आयोगाचे मुख्य आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी सांगितलं आहे.

**या राज्यात एसआयआर**

छत्तीसगड, गोवा, गुजरात, केरळ, लक्षद्वीप, मध्य प्रदेश, पुडूचेरी, राज्यस्थान, तमिळनाडू, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, अंदमान आणि निकोबार या ठिकाणी एसआयआरचा दुसरा टप्पा पार पडणार असल्याची माहिती निवडणूक आयोगाने दिली आहे.

एसआयआरचा दुसरा टप्पा कधीपर्यंत चालणार?

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी सांगितलं की, घरोघरी जाउन मतमोजणी ४ नोव्हेंबर ते ४ डिसेंबर २०२५ या कालावधीत केली जाईल. मतदार यादीचा प्रारूप ९ डिसेंबर २०२५ रोजी प्रकाशित केला जाईल. दावे आणि हरकती दाखल करण्याचा कालावधी ९ डिसेंबर २०२५ ते ८ जानेवारी २०२६ पर्यंत असेल. ज्यांना नोटीस मिळेल त्यांची सुनावणी आणि पडताळणी ९ डिसेंबर २०२५ ते ३१ जानेवारी २०२६ या कालावधीत होईल. अंतिम मतदार यादी ७ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रसिद्ध केली जाईल.

## घराणेशाहीचे राजकारण

होत्या. आम्ही सन्मानजनक जागावाटपाची मागणी केली होती. परंतु ते झाले नाही आणि युती मोडली. आम्ही दीर्घ काळानंतर महाराष्ट्रात स्वतंत्र निवडणूक लढवली आणि महाराष्ट्रात पहिला भाजपाचा मुख्यमंत्री मिळाला. त्यानंतर सलग ३ वर्ष देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात एनडीएने महाराष्ट्रात विजयी झाली. देवेंद्र फडणवीस आज पुन्हा मुख्यमंत्री म्हणून आपल्यासमोर आहेत. राज्यात डबल इंजिन सरकार झाले परंतु मी समाधानी नाही. मला ट्रिपल इंजिन हवे. जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका, महापालिका या सर्व निवडणुकीत इतक्या ताकदीने भाजपा कार्यकर्त्यांनी लढावे, जेणेकरून विरोधकांचा सुपडा साफ होईल. दुर्बिण घेउनही ते दिसायला नको, एवढ्या आवेशाने आपल्याला लढायचे आहे असं आवाहन अमित शाह यांनी कार्यकर्त्यांना केले.

## मतदारांनो सावधान!

राजस्थान, तामिळनाडू, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगाल या राज्यांचा समावेश आहे. यासाठी आता मतदारांकडे काही कागदपत्रे जवळ असणे आवश्यक आहे. निवडणूक आयोगाने एसआयआरसाठी मतदारांनी सादर करावयाच्या आवश्यक कागदपत्रांची यादी देखील जारी केली आहे. जर तुमच्याकडे ही कागदपत्रे असतील तर तुम्ही ती तुमच्या बीएलओला दाखवावीत. जे लोक ही कागदपत्रे सादर करू शकत नाहीत त्यांना एसआयआरनंतर तयार केलेल्या मतदार यादीत त्यांची नावांचा समावेश करण्यात अडचणी येउ शकतात.

***ही कागदपत्रे तुमच्याकडे असायला हवीत-*** केंद्र किंवा राज्य सरकारने जारी केलेले पेन्शन पेमेंट ऑर्डर,सरकार किंवा स्थानिक संस्था, बँक, पोस्ट ऑफिस, एलआयसी यांनी जारी केलेले प्रमाणपत्र,जन्म प्रमाणपत्र,पासपोर्ट,शैक्षणिक प्रमाणपत्र, कायमस्वरूपी निवास प्रमाणपत्र, वन हक्क प्रमाणपत्र, जातीचा दाखला, एनआरसी, राज्य किंवा स्थानिक संस्थेने तयार केलेले कुटुंब नोंदणी, जमीन किंवा घर वाटप प्रमाणपत्र

***असे आहे SIR चे वेळापत्रक-***मुख्य निवडणूक आयुक्तज्ञानेश कुमार यांनी यावेळी वेळापत्रक स्पष्ट केले. SIR चा दुसरा टप्पा उद्यापासून सुरू होईल. छपाई आणि प्रशिक्षण २८ ऑक्टोबर २०२५ ते ३ नोव्हेंबर २०२५ पर्यंत चालेल. ४ नोव्हेंबर २०२५ ते ४ डिसेंबर २०२५ पर्यंत घरोघरी जाउन मतदारांची माहिती गोळा केली जाईल. ९ डिसेंबर २०२५ रोजी प्रारूप मतदार यादी सादर केली जाणार आहे. बिहारमधील मतदार यादी दुरुस्ती प्रक्रिया आधीच पूर्ण झाली आहे. अंदाजे ७.४२ कोटी नावे असलेली अंतिम यादी ३० सप्टेंबर रोजी प्रकाशित झाली. बिहारमध्ये मतदान ६ आणि ११ नोव्हेंबर रोजी दोन टप्प्यात होईल आणि १४ नोव्हेंबर रोजी निकाल जाहिर होतील.

## आरोपी आणि महिला डॉक्टरचे

नक्की संबंध होते का हे तपासातून समोर येईल, असे पोलिस अधीक्षक तुषार दोषी यांनी म्हटलं. मयत डाक्टर या ज्यावेळेस हाटेलमध्ये गेली, त्यावेळेस ती एकटी होती. हे सीसीटीव्हीमध्ये दिसत असून ह?टेलमधील डीव्हीआर आम्ही जप्त केला आहे. डीव्हीआर तपासला असता, कोणतीही संशयास्पद गोष्ट आम्हाला आढळून आली नाही. तरीसुद्धा ती ह?टेलवर का गेली या गोष्टींचा पूर्ण तपास करण्यात येईल, अशी माहिती देखील दोषी यांनी दिली. या प्रकरणाच्या तपासा संदर्भामध्ये आमच्यावर कोणाचाही दबाव नाही. गृह विभागाकडून हा तपास पूर्णपणे निष्पक्ष व्हावा, अशा सूचना आम्हाला मिळाल्या आहेत. त्या अनुषंगाने हा तपास पूर्णपणे निष्पक्षपणे सुरू आहे. सध्याचे सीडीआर आणि चॅटिंग समोर आले आहे. त्याच्यातून असं दिसत आहे की, मृत ड?क्टर आणि आरोपी यांच्यामधील वारंवार चॅटिंग सुरू होतं. ड?क्टर महिला ही आरोपींच्या संपर्कामध्ये होती, अशी माहितीही पोलिस अधीक्षकांनी दिली.

## मुंबईवर दोन व्यापा-यांचा डोळा,

वाचले. नाही तर आणखी फटकावणार होतो. विभाग प्रमुखांना नेहमी भेटतो. शाखाप्रमुखांच्या मिटिंग घ्यायचो. पण उपशाखाप्रमुखांची बैठक घ्यावी ही इच्छा होती. त्यामुळे ही बैठक घेतली. ती आता सभाच झाली आहे, असं यावेळी उद्धव ठाकरे यांनी म्हटलं.

पुढे बोलताना ते म्हणाले की, गटप्रमुखांशी बोलणार आहे. उपविभागप्रमुखांकडे तीन शाखा येतात. शाखा प्रमुखाकडे महापालिका व?र्ड येतो. उपशाखाप्रमुखांकडे दोन ते तीन मतदार याद्या येतात. आदित्य ठाकरे यांनी वरळीमधील मतदार याद्यातील घोळ दाखवले आहेत. आपल्याला हे काम महाराष्ट्रात करायचं आहे. मुंबईतून सुरुवात करायची आहे. मुंबईवर दोन व्यापा-यांचा डोळा आहे. आज एक जण येउन गेला. सामनात दोन बातम्या पाहिल्या, पहिल्या पानावर बातमी होती, भाजप कार्यालयाचं भूमिपूजन, आत बातमी आहे, जिजामाता उद्यानात अ?नाकोंडा येणार. आपण पेंग्विन आणले. काही पेंग्विनच्या बुद्धीचे लोक आपल्यावर टीका करतात. ते सोडा. अ?नाकोंडा म्हणजे सर्व गिळणारा साप, तो येउन गेला, त्यांना मुंबई गिळायचीय, पण ते मुंबई कशी गिळतात ते बघतोच, अशा शब्दात उद्धव ठाकरे यांनी आज अमित शाह यांच्या मुंबई दौ-यावरून हल्लाबोल केला आहे.चा डोळा

## पक्ष कार्यालयातील लावणी

विविध धर्म, पंथ आणि सामाजिक स्तरावर समाजासाठी उत्कृष्ट कार्य करणा-या सामाजिक योद्ध्यांचा विशेष सन्मान करण्यात आला.पक्षाच्या वतीने हा कार्यक्रम केवळ दिवाळीच्या शुभेच्छा देण्यासाठी नव्हे, तर समाजात सकारात्मक बदल घडवणा-या, निस्वार्थपणे कार्य करणा-या व्यक्तींबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आयोजित करण्यात आला होता. विविध धर्मांचे प्रतिनिधित्व करणा-या व्यक्तींना सन्मानित करून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने जातीय सलोखा आणि सर्वधर्म समभाव या मूल्यांचा दृढ संदेश दिला.

विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केलेल्या सुमारे १० सन्माननीय व्यक्तिमत्त्वांचा यावेळी शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देउन गौरव करण्यात आला. यामध्ये ख्रिस्ती धर्माचे पास्टर, त्यांच्या क्षेत्रात गरजू रुग्णांना मदत करणारे श्री विठ्ठलराव गायकवाड तसेच बौद्ध धर्मातील लेखक, महिलांसाठी आणि बचत गट यासाठी बेबी ताई रामटेके, मिनिंद मानकर, सांस्कृतिक वारसा जपणा-या मराठी लावणी सादर करते शिल्पा शाही यांचा विशेष गौरव करण्यात आला.

सन्मानित झालेल्या व्यक्तींमध्ये हिंदू, मुस्लिम, शीख, ख्रिस्ती, बौद्ध अशा सर्वधर्मीय सामाजिक कार्यकर्त्यांचा समावेश होता. यावेळी मान्यवरांनी बोलताना सांगितले की समाजातील अंधकार दूर करून, मानवतेची ज्योत पेटवणा-या या सर्व सामाजिक योद्ध्यांचा सन्मान करणे, हे आमच्या पक्षाचे कर्तव्य आहे. नागपूर शहरात सामाजिक एकोपा अधिक मजबूत व्हावा, यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी नेहमीच प्रयत्नशील राहील.

यावेळी शहराध्यक्ष अनिल अहिरकर, जिल्हाध्यक्ष राजाभाउ टाकसाळे , कार्याध्यक्ष श्रीकांत शिवणकर महिला शहराध्यक्षा सुनीता येरणे, युवक अध्यक्ष विशाल खांडेकर, तानाजी वनवे उपस्थित होते.

## *पूरग्रस्तांना मदतीचा हात; मुख्यमंत्री*

आज जुहू चौपाटीवर ही मदत छठ पूजेच्या निमित्ताने करण्यात आली असून, छठ व्रत करणा-या महिलांमार्फत मिश्रा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सदर धनादेश सुपूर्द केला.यावेळी मुंबई भाजप अध्यक्ष,स्थानिक आमदार अमित साटम उपस्थित होते. यावेळी मिश्रा म्हणाले की,सनातन धर्माच्या या महान उत्सवानिमित्त, आम्ही भगवान सूर्याला प्रार्थना करतो की असीम उर्जाचे अधिपती भगवान भास्कर महाराष्ट्रावर आपले आशीर्वाद वर्षाव करो. समाजसेवा हीच खरी पूजा आहे, आणि या योगदानातून आमच्या संस्थेने महाराष्ट्रातील बांधवांसोबत आपली एकजूट व्यक्त केली.

## ठाकरे गटाचेही ‘लाव रे तो

निवडणूक आयोगाने या एका खोलीच्या पत्त्यावर ३८ मतदारांची नोंदणी केली आहे. हा व्हिडिओ दाखवताना त्यांनी प्रश्न केला की, या एका खोलीत किती लोक राहू शकतात? जास्तीत जास्त पाच. पण या खोलीच्या पत्त्यावर ३८ मतदारांची नोंदणी केली आहे. या ३८ मतदारांपैकी एकही व्यक्ती त्या खोलीमध्ये राहत नाही. आम्ही तिथे जाउन पाहणी केली आहे. याप्रकारे वरळीत अशी २१४ घरे दाखवली आहेत, ज्यामध्ये ३३३५ मतदारांची नोंदणी करण्यात आली आहे. आदित्य ठाकरे पुढे म्हणाले की, निवडणूक आयोगाचा कायदा आहे की, जर १० हून अधिक लोक एका घरात राहत असतील, तर त्या घरात जाउन तिथे खरोखरच १० हून अधिक लोक राहतात का, याची पाहणी करण्याची जबाबदारी मतदार यादी अधिका-याची आहे. मतदार यादी अधिका-यांनी याची पाहणी खरेच केली आहे का? या मेळाव्यात आदित्य ठाकरे यांच्या मतदार याद्यांच्या सादरीकरणानंतर माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे भषण झाले. या भाषणात उद्धव ठाकरे यांनी पंतप्रधान मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यावर जोरदार टीका केली. मुंबईवर दोन व्यापा-यांचा डोळा असल्याचे म्हणत उद्धव ठाकरेंनी जोरदार घणाघात केला.उद्धव ठाकरे म्हणाले की, आज आदित्य ठाकरे यांनी या ठिकाणी मतदार याद्यांमधील घोळांबाबत जे सादरीकरण केले आहे, आपल्याला त्यामध्ये आणखी खोलात जायचे आहे, हे काम महाराष्ट्रभर करायचे आहे, पण याची सुरुवात मुंबईपासून करायची आहे. कारण मुंबईवर कोणाचा डोळा आहे हे तुम्हाला माहिती आहे. खासकरून दोन व्यापा-यांचा मुंबईवर डोळा आहे. तुमच्या मनातील नावे मला माहिती आहेत, पण ते मी आता माईकमध्ये घेत नाही.

## छठ पूजेदरम्यान नाव उलटली,

घटनास्थळी दाखल झाले आहेत.ही घटना बबुरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कोदोचक गावात घडली. मिळालेल्या माहितीनुसार, छठपूजेसाठी हजारो लोक येथील चंद्रप्रभा नदीवर पोहोचले होते. नदीत एक जुगाड केलेली नाव (होडी) होती. काही लोक या नावेवर चढले आणि पूजेदरम्यान सेल्फी घेउ लागले. दरम्यान, नावेचा तोल गेला आणि नावेतील सर्व लोक पाण्यात पडले. हे लोक नदीपात्रात पडताच एकच आरडाओरड सुरू झाली. यानंतर, घाटावर उपस्थित असलेल्या ग्रामस्थांनी पाण्यात उड्या घेतल्या आणि कसेबसे चार जणांना सुखरूप बाहेर काढले. आणखी काही लोक पाण्यात पडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिस गोताखोरांसह घटनास्थळी पोहोचले असून गोताखोर बुडालेल्या लोकांचा शोध घेत आहेत.

## लोकमान्य टिळक एक्सप्रेसचे

२:५४ वाजता घडली. घटनेनंतर प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. तातडीने रेल्वेच्या तांत्रिक पथकाने घटनास्थळी पोहोचून तपासणी केली. जवळपास चार तासांच्या प्रयत्नांनंतर डबे पुन्हा जोडण्यात आले आणि सकाळी ७ वाजता ट्रेन पुढील प्रवासासाठी रवाना करण्यात आली.

प्राथमिक तपासणीत स्पष्ट झाले की, या घटनेचे मुख्य कारण कपलिंग तुटणे हेच होते. सुमारे २०० ते २५० प्रवासी त्या वेगळ्या झालेल्या डब्यांमध्ये प्रवास करत होते, मात्र सुदैवाने कोणतीही जीवितहानी किंवा दुखापत झालेली नाही. रेल्वेच्या झाशी विभागाचे डीआरएम यांनी सांगितले की, घटनेच्या चौकशीसाठी विशेष तपास समिती गठित करण्यात आली आहे. दरम्यान, काही प्रवाशांनी या घटनेचे व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर केले आहेत.

## बांगलादेशात हाफीज सईदची

` अल जामिया अस सलीफाचा अध्यक्ष शेख अब्दुर रज्जाक बिन युसूफ याचा मुलगा आहे. त्याने पाकिस्तानी मौलानाला राजशाही शहरातील नौदापारा येथील संघटनेच्या कॅम्पसमध्ये नेले. ८ ऑगस्ट २०२४ रोजी शेख हसीना यांच्या नेतृत्वाखालील अवामी लीग सरकार कोसळल्यानंतर आणि मोहम्मद युनूस यांची अंतरिम सरकार प्रमुख म्हणून नियुक्ती झाल्यानंतर जहीर याचा बांगलादेशचा हा दुसरा दौरा आहे असं न?र्थईस्ट न्यूजने वृत्त दिले आहे. सोमवारी सकाळी जहीर नौदापारा ते चपैनवाबगंज येथे रवाना झाला. या दोघांनी भारत बांगलादेश सीमेवर काही परिसरात दौरा केला. तिथे स्थानिक मस्जिदीमध्ये बैठकांचा कार्यक्रम घेतला.

जहीर २९ आणि ३१ नोव्हेंबरला सीमेवरील रंगपूर, लालमोनिरहाट आणि निलफामारीसारख्या परिसराचा दौरा करणार आहे. १ नोव्हेंबरला ज?यपुरहाट आणि २ नोव्हेंबरला नागाव येथे तो असेल. त्यानंतर ६ आणि ७ नोव्हेंबरला राजशाहीच्या पाबा उपजिल्ह्यातील डांगीपारा येथे सलाफी संमेलनाला संबोधित करेल. त्यानंतर ८ नोव्हेंबरला तो पाकिस्तानात परतणार आहे. जहीरच्या बांगलादेश भारत सीमेवरील दौ-यामुळे भारतासाठी धोक्याची घंटा मानली जाते. जहीर एक कट्टर इस्लामी मौलाना आहे जो विषारी विधानांसाठी कुख्यात आहे. त्याने अनेकदा गैर मुस्लिमाविरोधात हिंसेची भाषा केली. त्यामुळे भारत-बांगलादेश सीमेवर त्याचा दौरा भारताला ईशान्येकडे चिंताजनक ठरू शकतो. भारत आणि बांगलादेश यांच्या सीमेचा बहुतांश भाग खुला आहे त्यामुळे जहीर ब्रेनव?श करून याठिकाणी घुसखोरी करू शकतो असं बोलले जाते.

## अरूणाचल सीमेपासून ४० किमी

तेथे आपले तांत्रिक लढाउ विमाने आणि हल्ला करणारे हेलिकाप्टर तैनात करेल असे दिसत आहे. दारूगोळा आणि इंधन आधीच भूमिगत बोगद्यांमध्ये साठवले असावे, असंही त्यांनी सांगितले.

‘डोकलाम वादाच्या वेळी, मी म्हटले होते की जेव्हा चीन तिबेटमधील हवाई तळांवर एअरक्राफ्ट शेल्टर बांधण्यास सुरुवात करेल, तेव्हा ते भारताविरुद्ध युद्धाची तयारी करेल. आता त्यांची सर्वात मोठी कमकुवतता दूर होत आहे, असंही त्यांनी सांगितले.माजी हवाई दलाचे उपप्रमुख एअर मार्शल अनिल खोसला म्हणाले की, लुंजे आणि इतर हवाई तळांच्या विस्तारामुळे चीनच्या भविष्यातील युद्ध योजनांना बळकटी मिळेल. त्यांनी ते भारतासाठी एक गंभीर धोरणात्मक धोका असल्याचे वर्णन केले.‘हे ३६ एअरक्राफ्ट शेल्टर चीनला त्यांच्या विमानांना हल्ल्यांपासून संरक्षण करण्यास आणि उंचावरील भागात सतत ऑपरेशन करु शकतात.

लुंजे, टिंगरी आणि बुरंग सारखे हवाई तळ एलएसीपासून ५-१५० किमी अंतरावर आहेत, यामुळे चीनला जलद प्रतिक्रिया देता येते आणि भारताच्या अरुणाचल, सिक्कीम, उत्तराखंड आणि लडाख प्रदेशांना कव्हर करता येते. नवीन उपग्रह फोटोंमध्ये लुंजे हवाई तळावर क्त४ ड्रोन दाखवले आहेत. हे ड्रोन १६,००० फूट उंचीवरून क्षेपणास्त्रे डागू शकते आणि ते उंचावरील मोहिमांसाठी डिझाइन केलेले आहे.भारताला त्याचे उत्तर २०२९ मध्ये मिळेल जेव्हा अमेरिकन कंपनी जनरल अॅट?मिक्सचे यूएस-स्थित स्काय गार्डियन ड्रोन भारतीय हवाई दल आणि सैन्यात समावेश केले जातील. दोन्ही दलांना प्रत्येकी आठ ड्रोन मिळतील, तर नौदलाला आधीच १५ सी गार्डियन ड्रोन मिळत आहेत. हा ३.५ अब्ज ड?लर्सच्या कराराचा भाग आहे.

## शेतक-यांच्या कर्जमुक्तीसह विविध

संघटनांचे नेते, सामाजिक कार्यकर्ते आणि तरुण महाएल्गार सभेच्या देखील सभेत आज सहभागी होणार आहेत. आमचा आवाज दुर्लक्षित केला तर आम्ही गप्प बसणार नाही, असे अनेक शेतकऱ्यांनी सांगितले आहे. या माध्यमातून शेतकऱ्यांसह सर्वच शोषित घटक हक्क आणि न्याय मिळवण्यासाठी राज्याचे माजी राज्यमंत्री बच्चू कडू आणि त्यांचे सहकारी सरकार समोर ठोस मागण्या मांडणार आहे. या आंदोलनाला शेतकऱ्यांचा वाढत्या प्रतिसादमुळे शासन यावर ठोस तोडगा काढणार का ? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.यावेळी प्रहार जनशक्ती पक्षाचे कार्याध्यक्ष बल्लू जवंजाळ,महेश देशमुख ,अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक नितीन आगे ,प्रवीण पाटील ,दीपक भोरे,निलेश जाधव ,प्रदीप बंड,राजू बघेले ,निलेश भांडे ,गणेश पुरोहित ,पवन वाठ , सरदार खान,समीर सांडे,सचीन खुळे,रोहित मेंढे,प्रशांत चर्जन,गोलु निंभोरकर,नाजिम पठाण आदी शेतकरी ,प्रहार पक्षाचे कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थितीत आहे .

## एसटी बस व क्रुझर अपघातातील

देशपांडे यांचा रविवारी (ता. २६) उपचारादरम्यान मृत्यू झाला. बिरुदेव तातोबा जावीर यांची प्रकृती अत्यंत गंभीर असल्याचे निकटवर्तीयांनी सांगितले. रविवारला दुपारी उत्तरीय तपासणीनंतर मुकुंद देशपांडे यांचा मृतदेह नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आला. या अपघातात अन्य सहा जण जखमी झाले आहेत. एमएच ४० वाय ५१३४ क्रमांकाच्या एसटीने एमएच १० सीए ९३७१ क्रमांकाच्या क्रूझरला धडका दिल्याने हा भीषण अपघात झाला होता.

## शहानूर नदी काठावर बेपत्ता

त्याच्या मोबाईलचे लोकेशन काढण्याचा प्रयत्न केला असता मोबाईल बंद असल्याने त्याचा शोध घेणे शक्य झाले नाही.

रविवार (दि.२६) शहानूर नदीच्या तीरावर गुरे चारण्यासाठी गेलेल्या एका व्यक्तीला झुडपांमध्ये मानवी सांगाडा विखुरलेल्या अवस्थेत आढळला. या घटनेची माहीती गावात पसरताच सांगाडा पाहण्यासाठी लोकांची मोठी गर्दी जमली होती .

या घटनेची माहीती मिळताच ठाणेदार प्रफुल्ल गाडेकर, पोलिस कर्मचारी विठ्ठल मुंडे , व सर्व कर्मचारी हे तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा सुरू केला असता, सांगाड्याच्या पॅन्टच्या खिशात आधारकार्ड, पॅनकार्ड आणि एटीएम कार्ड आढळून आले. या कागदपत्रांच्या आधारे पोलिसांनी ओळख पटविली. मृतकाच्या वडिलांनी सुद्धा सांगाडा आपला मुलगा अक्षय गावंडे याचाच असल्याची खात्री केली.

घटनास्थळी फॉरेन्सिक लॅब आणि अमरावती एलसीबीची टीम दाखल झाली होती. त्यांनी घटनेची पाहणी केली. सांगाडा विखुरलेल्या अवस्थेत असल्याने तो पुढील उत्तरीय तपासणीकरिता उपजिल्हा रुग्णालय, दर्यापूर येथे पाठवण्यात आला आहे.

पुढील तपास येवदाचे ठाणेदार प्रफुल्ल गाडेकर, विठ्ठल मुंडे आणि त्यांचे सहकारी करीत आहेत. अक्षय गावंडे याच्या मृत्यूचे नेमके कारण काय आहे, याबाबत अधिक तपास सुरु आहे.

## स्वच्छता कंत्राटाच्या शर्यतीत

वतीने गेल्या ९ ऑक्टोबर रोजी अ वर्ग दर्जा प्राप्त एका इंग्रजी दैनिकात ही निविदा सूचना प्रकाशित केली होती. आता चार पैकी कुठल्या कंपनीला हा कंत्राट मिळेल हे पाहणे रंजक ठरणार आहे.

## मनपा प्रस्तावित २९ हॉकर्स झोन

२०१४ च्या कायद्याचे उल्लंघन आहे. कोर्टाच्या आदेशाची अवहेलना आहे. त्यामुळे हे होकर्स झोन होकर्स बंधू वर अन्यायकारक आहे. हे झोन रद्द न झाल्यास हॉकर्स मोठे आंदोलन करतील. व्यावसायिकांच्या कायद्याप्रमाणे हॉकर झोन तयार करावे अशी मागणी युनियन ने केली आहे. निवेदन देतांना गणेश मारोडकर, दीपक लोखंडे ,जावेद शेख, सुरज चढार व अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

## देशी कट्टा व चाकूसह आरोपी

शस्त्र बागळून फिरत आहे. या वरून पथकाने कार्यवाही करून आरोपी अंकित किशोर घाटे याला देशी कट्टा व चाकूसह ताब्यात घेतले. त्याच्याविरुद्ध पोलीस ठाण्यात दखलपत्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरण वानखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय नितीन इंगोले, हवालदार सुनील, सय्यद अजमत ,चेतन दुबे, निलेश यांनी ही कारवाई केली.

## शिंदी बु. येथील गजानन महाराज

आहेत. ग्रामस्थांनी या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त केला असून, ‘मंदिरांसारख्या पवित्र स्थळांवरही चोरीच्या घटना घडणे अत्यंत खेदजनक आहे,’ अशी भावना व्यक्त केली. तसेच रात्रीच्या वेळी गस्त वाढविण्याची मागणी ग्रामस्थांकडून करण्यात आली आहे.दरम्यान, अचलपूर तालुक्यातील इतर काही गावांमधूनही मागील काही दिवसांत चोरीच्या तक्रारी समोर येत असून, ग्रामीण भागात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलिसांनी लवकरात लवकर चोरट्यांचा शोध घेऊन कठोर कारवाई करावी, अशी ग्रामस्थांची मागणी आहे.

## महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशन

महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशनच्या खात्यातून स्वतःच्या आणि पत्नीच्या खात्यावर अडीच लाख रुपये हस्तांतरित केले होते आणि सुमारे ९.५० लाख रुपये त्यांनी रोख बँकेतून काढले होते. अजूनपर्यंत त्यांनी या रकमेचा कोणताही हिशोब दिलेला नाही. त्याच बरोबर धर्मादाय आयुक्तांकडे सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये जय कवळी यांनी आमच्या खोट्या स्वाक्षऱ्या केल्या आहेत, असे शपथपत्र रणजित सावरकर आणि अन्य ६ पदाधिकाऱ्यांनी धर्मादाय आयुक्तांकडे सादर केले आहे. याचीही चौकशी सुरु आहे.

**जय कवळी यांची मतदार चोरी-** २ नोव्हेंबरला महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनची निवडणूक होत असून त्यात विद्यमान अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विरुद्ध केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी मोठे आव्हान निर्माण केले असल्यामुळे ही निवडणूक चुरशीची होणार आहे. या निवडणुकीत केवळ ६० मतदार असल्याने प्रत्येक मताला प्रचंड महत्त्व आले आहे.

महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनमध्ये जय कवळी हे गेली बारा वर्षे उपाध्यक्षपदी विराजमान असून उपमुख्यमंत्री अजित पवारांचे खंदे समर्थक म्हणून त्यांची ओळख आहे. या निवडणुकीत महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशनचे अध्यक्ष असल्याचा खोटा दावा करत जय कवळी यांनी महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशन निवडणुकीसाठी दोन सदस्यांचे नामांकन मतदार म्हणून केले होते. विशेष म्हणजे या मतदार चोरीसाठी त्यांनी रणजित सावरकर यांचेच लेटरहेड वापरले आहे. त्यामुळे रणजित सावरकर यांनी जय कवळी यांच्या विरोधात भारतीय दंड संहितेखाली फसवणूक, खोटी कागदपत्रे वापरणे आणि अन्य कलमांखाली समर्थ पोलीस ठाणे पुणे येथे एफआयआर दाखल केला आहे. या प्रकरणी पोलीस तपास सुरु आहे.

**मुरलीधर मोहोळ विरोधकांना दरेकरांचा पाठिंबा का ?**महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनमध्ये अजित पवार यांच्या विरोधात केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी मोठे आव्हान निर्माण केले आहे. त्यामुळे महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशन निवडणुकीत प्रवीण दरेकरांनी अजित पवार समर्थक जय कवळी यांच्या पाठीमागे उभे रहाण्यामागे काय राजकारण आहे, असा प्रश्न क्रीडा क्षेत्रात उपस्थित होत आहे.या संपूर्ण प्रकरणात खेळाचा विचार कमी आणि राजकारणाचा भाग जास्त दिसत आहे, ही शोकांतिका !

## शेंदोळा परिसरातील अवैध दारुवर

नांदगाव पेठ अमरावती) यांच्यावर कार्यवाही करण्यात आली. आरोपींकडून गावठी दारू २० लिटर कि.४ हजार, मोहफुलाचा सळवा कि.७५० लिटर कि. ३७ हजार ५००, लोखंडी, प्लास्टिक ड्रम-९ कि.१८००, दारू गळाचे साहित्य कि.५०० रूपये असा एकूण ४३ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करून मोहफुलाचा सळवा सॅम्पल घेऊन ड्रम सहीत जागीच नष्ट करण्यात आले. सदरची कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, उपायुक्त रमेश धुमाळ, गणेश शिंदे ,श्याम घुगे, सहाय्यक पोलीस उपआयुक्त, नांदगाव पेठचे पोलीस निरीक्षक यांच्या नेतृत्वाखाली पोहवा सुनील सोळंके, मापो आशा, पोका राजिक खान, राजा यांनी केली.

# जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ मंगळवार, २८ ऑक्टोबर २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठ ४

एक प्रतिष्ठित सवय

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# माहितीचा अधिकार ठप्प; क्षेत्रसहाय्यक खंडारे यांचा 'सत्यलपवा' कारभार!

## दोन महिन्यांनंतर माहितीऐवजी अवलोकनाचे पत्र

**■ प्रतिनिधी | कारंजा ■**

**वनपरिक्षेत्र कारंजा (लाड) येथील क्षेत्रसहाय्यक (वनपाल) पी.एन. खंडारे यांच्या मनमानी व बेजबाबदार वर्तनामुळे माहितीचा अधिकार (RTI) हा कायदा अक्षरशः ठप्प झाल्याचे चित्र समोर आले आहे. अर्जदाराने दि. १८ ऑगस्ट २०२५ रोजी मागविलेल्या माहितीवर दोन महिन्यांहून अधिक काळ लोटूनही माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली नाही. उलटपक्षी, संबंधित अधिकारी पी.एन. खंडारे यांनी नियम धाब्यावर बसवून अर्जदारास 'माहितीचे अवलोकन करा' असे पत्र पाठवून शासनाच्या परिपत्रकांची उघडपणे पायमल्ली केली व शासन निर्णयास पायदळी तुडविले.**




रीतसरपणे अर्ज सादर केल्यानंतर तीस दिवसांची मुदत संपली, तरी माहिती प्राप्त झाली नाही. RTI कायद्यानुसार कोणतीही मागितलेली माहिती अर्ज प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांच्या आत अर्जदाराला देणे बंधनकारक आहे. मात्र, या प्रकरणात ७० दिवस उलटूनही माहिती न दिल्याने हा नियम मोडला गेला आहे. अर्जदाराने वारंवार लेखी पाठपुरावा करूनही वनविभागाकडून कोणतीही ठोस कार्यवाही झाली नाही.

२७ ऑक्टोबर रोजी दि.०१ ऑक्टोबर रोजीचे पत्र दर्शवून क्षेत्रसहाय्यक खंडारे यांनी अर्जदारास पत्र पाठवून ३० ऑक्टोबरला दुपारी १.३० ते २.०० वाजेच्या दरम्यान कार्यालयात हजर राहून माहितीचे 'अवलोकन' करण्याचे सुचविले. मात्र, अर्जदाराने कुठल्याही प्रकारच्या अभिलेख तपासणीची मागणी केलेली नसताना तब्बल दोन महिन्यानंतर पत्र पाठविणे ही प्रक्रिया नियमबाह्य असल्याचे अर्जदाराचे मत आहे. संबंधित अधिकाऱ्याने जाणीवपूर्वक शासन परिपत्रकांचा अवमान करून अधिनियम व नियमाला पायदळी तुडविले. २०१२ मध्ये जारी झालेल्या 'माहितीचा अधिकार (दुसरी सुधारणा) नियम २०१२' नुसार, मागणी केलेली माहिती विस्तृत असल्यासही अर्जदारास विहित मुदतीत माहिती शुल्काबाबत लेखी कळविणे आवश्यक असते. मात्र, या प्रकरणात खंडारे यांनी कोणतीही सूचना न देता थेट दोन महिन्यांनंतर अवलोकनाचा सल्ला देऊन कायद्याची पायमल्ली केली आहे. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार, 'ही माहिती मुद्दाम दडविण्यात येत आहे, कारण मागणी केलेल्या दस्तऐवजांमधून वनपरिक्षेत्रातील गैरव्यवहार व भ्रष्टाचार उघड होण्याची शक्यता आहे.'

### - कायदा, नियम सर्वसामान्य नागरिकांनाच बंधनकारक
### - कर्मचारी व अधिकाऱ्यांना कोणतेच बंधन नाही

या प्रकाराबाबत वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.) गिरीश जतकर यांचे मौन देखील चर्चेचा विषय ठरत आहे. खंडारे यांच्या कारभारावर कारवाई करण्याऐवजी वरिष्ठ अधिकारी त्यांना मौन आश्रय देत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. परिणामी, शासकीय अधिनियमांचा खेळखंडोबा व पारदर्शकतेचा अभाव हा कारंजा (लाड) वनपरिक्षेत्राचा चेहरामोहरा झाला आहे. वन विभागाकडून कायद्याची पायमल्ली आणि जबाबदारीचा अभाव ठळकपणे दिसून येत आहे. वनविभागातील ही घटना केवळ एका अर्जदारापुरती मर्यादित नसून, शासनाच्या पारदर्शकतेच्या तत्त्वांवरच प्रश्नचिन्हे उपस्थित करते. नियमांचे पालन न करता नागरिकांच्या अधिकाराला पायाखाली तुडविणाऱ्या अधिकाऱ्यांवर प्रशासनाने तात्काळ कारवाई करून जबाबदारी निश्चित करणे गरजेचे आहे. कारंजा (लाड) वनपरिक्षेत्रातील RTI प्रकरणात, क्षेत्रसहाय्यक पी.एन. खंडारे यांनी माहिती द्यायची टाळाटाळ करून शासनाच्या RTI कायद्याचा निव्वळ खुला अवमान केला नाही तर प्रशासकीय व शासन व्यवस्थेला खुले आव्हान दिलेले आहे. पारदर्शकतेच्या नावाखाली माहिती दडविण्याचा हा प्रकार 'सत्यलपवा' कारभाराचे स्पष्ट उदाहरण ठरत आहे. पी.एन. खंडारे यांच्या गैर कृत्याविरुद्ध, शासन नियमाविरोधी, कृतीविरुद्ध वरिष्ठ अधिकारी वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.) कारंजा गिरीश जतकर, उपवनसंरक्षक वाशिम, अभिजीत जी. वायकोस हे दोन्ही अधिकारी प्रत्यक्षपणे कोणत्या प्रकारची कार्यवाही करते की कागदी घोडे नाचविण्यातच धन्यता मानते हे बघणे मजेशीर ठरणार आहे.

# गुरुवारी गोर बंजारा समाजाकडून हैदराबाद- अकोला महामार्ग रास्ता रोको



**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

गोर बंजारा समाजाला एस टी.दर्जाचे आरक्षण मिळावे, हैदराबाद गॅझेट लागू करुन सेवासवलती उपलब्ध करून देण्यात याव्यात यामागणीसाठी गोर बंजारा महाराष्ट्रभर आतापर्यंत लाखोंच्या संख्येने पंचावन्न महामोर्चे काढले असून महाराष्ट्रात अनेक गोर बंजारा युवकांनी ९ ठिकाणी आमरण उपोषण केले तसेच चार युवकांनी आरक्षणाची मागणी करीत आपले जीवन संपविले मात्र सरकारने गोर बंजारा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीला गांभीर्याने घेतले नाही.तसेच सर्वच उपोषणकर्त्यांची फक्त शाब्दिक बोळवण केली. गोर बंजारा समाज हा आदीवासी समुदायाच्या वैशिष्ट्याची पुर्तता करत असताना विविध ठिकाणी नोंदीचे पुरावे सापडत असतांनाच,तसेच हैदराबाद गॅझेट मध्ये अनुकूल नोंदी असतांनाही सुस्त निद्रिस्त सरकार गेल्या ७८ वर्षांपासूनच्या मागणीकडे कानाडोळा करत आहेत.तेव्हा सुस्त निद्रिस्त मगरगठ्ठ सरकारला जागवण्यासाठी बंजारा आरक्षण कृती समितीच्या वतीने दि.३० आक्टोबर गुरुवार रोजी मालेगांव पांईट जवळ समृद्धी महामार्ग व हैदराबाद अकोला राष्ट्रीय महामार्ग रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे.येथे आरक्षण कृती समितीच्या २३ आक्टोंबर रोजी झालेल्या बैठकीत निर्णय घेण्यात आला असून १० हजार गोर बंजारा स्त्रीपुरूष समृद्धी महामार्ग हैदराबाद अकोला महामार्गावर उतरणार असल्याचा महत्त्वपूर्ण निर्णय पोहरादेवी येथील सभेत गोर बंजारा आरक्षण कृती समितीने घेतला आहे.पोहरादेवी येथे दि.२३ आक्टोबर रोजी पार पडलेल्या सभेमध्ये महंत, सर्व संघटनांचे उपस्थित पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत हा निर्णय घेण्यात आला असून या आंदोलनात ना वाशीम, यवतमाळ, अकोला , बुलढाणा, अमरावती, वर्धा जिल्ह्यातील गोर बंजारा बांधव भगिनी या रेल रोको आंदोलनात सहभागी होणार आहेत.

# निर्माणातून राष्ट्रनिर्माण हेच संघाचे कार्य
## प्रा. दिलीप जोशी यांचे प्रतिपादन

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची दैनिक शाखा म्हणजे चारित्र्यसंपन्न मनुष्यनिर्मितीचे केंद्र असून, 'व्यक्तीनिर्माणातूनच राष्ट्रनिर्माण होते' हे संघाचे प्रमुख कार्य असल्याचे प्रतिपादन विद्या भारती विदर्भ प्रांताचे सहमंत्री विद्यावाचस्पती प्रा. दिलीप जोशी यांनी केले.



मंगरुळनाथ तालुक्यातील पारवा येथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतीने शस्त्रपूजन व विजयादशमी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून प्रा. जोशी उपस्थित होते, तर प्रमुख अतिथी म्हणून जगदंबा संस्थान पारवा येथील अध्यक्ष गोपाल सावके यांनी उपस्थिती दर्शविली. मंचावर मंगरुळनाथ तालुका संघचालक देवानंद राठोड हे उपस्थित होते.

प्रारंभी वैयक्तिक गीत, अमृतवचन व सुभाषित यांनी कार्यक्रमास सुरुवात झाली. वैयक्तिक गीत संजय टोचर यांनी सादर केले. आपल्या ओघवत्या भाषणात प्रा. जोशी म्हणाले की, 'संघाने शंभर वर्षांच्या प्रवासात सार्वभौम, सर्वव्यापी आणि सर्वस्पर्शी रूप धारण केले आहे. दैनिक शाखांमधून देवदुर्लभ कार्यकर्ते घडत आहेत. अशा या कार्यकर्त्यांच्या माध्यमातून देश परम् वैभवाच्या दिशेने वाटचाल करीत आहे.' संघाच्या शताब्दी पर्वानिमित्त समाजात सामाजिक समरसता, कुटुंब प्रबोधन, पर्यावरण, नागरी कर्तव्ये आणि स्वदेशी या पंचपरिवर्तन अभियानांवर संघाने विशेष भर दिल्याचे त्यांनी सांगितले. कलम ३७० रद्द करणे, श्रीराम मंदिर निर्माण, समान नागरी कायदा आदी विषयांवर बोलताना त्यांनी प्रत्येक हिंदूने आपल्या घरात हिंदू संस्कार जपण्याची गरज अधोरेखित केली. 'आपले घर भारतात आहे, पण घरात भारत आहे का?' हा आत्मपरीक्षणाचा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. ग्राम पारवा हे ऐतिहासिक वारसा लाभलेले गाव असल्याचे सांगून प्रा. जोशी म्हणाले, 'छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेले हे गाव असून राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी दोनदा या ठिकाणी येऊन सामुदायिक प्रार्थनेचा संस्कार रुजविला. आजही येथे दररोज संघ शाखा व सामुदायिक प्रार्थना होत असल्याने हे गाव एकजूट व आदर्श आहे.' प्रमुख अतिथी गोपाल सावके यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हे राष्ट्रभक्तांचे संघटन आहे. देशाच्या एकात्मता, संस्कार आणि विकासासाठी संघाचे कार्य आज अधिक आवश्यक आहे.' कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार जिगर ठाकरे यांनी केले.या कार्यक्रमाला पारवा गावातील नागरिक, स्वयंसेवक व महिला उपस्थित होत्या. विजया दशमी व शस्त्र पूजनाच्या निमित्ताने वातावरण देशभक्तीमय झाले होते.

# शेतकऱ्यांचा तहसील कार्यालयावर मोर्चा

**■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■**

तालुक्यातील तऱ्हाळा कंझरा-वनोजा जिल्हा परिषद सर्कल मधील सर्व गावांसह पारवा सर्कल मधील काही राहिलेल्या गावांचा पोखरा योजनेत समावेश करण्यासाठी आज शेतकऱ्यांनी मंगरुळपीर तहसील कार्यालयावर मोर्चा काढला. यावेळी शेतकऱ्यांनी तहसीलदारांना आपल्या मागण्यांचे निवेदन देऊन शासनाचे लक्ष वेधले.



मोर्चादरम्यान शेतकऱ्यांनी शासनाकडून लहान मुलांना दिल्या जाणाऱ्या आहाराचे निकृष्ट दर्जाचे पॉकेट फोडून दाखवले. 'आहाराऐवजी ॲऊ द्वारे रक्कम द्या किंवा ही योजना बंद करा,' अशी ठाम मागणी आंदोलकांनी केली. शेतकऱ्यांनी पुढे म्हटले की, तालुक्यातील शेतरस्ते आणि पांदन रस्ते अत्यंत वाईट अवस्थेत असून त्यांची तातडीने मंजुरी व दुरुस्ती करावी. तसेच वन्य प्राण्यांमुळे पिकांचे प्रचंड नुकसान होत असल्याने शेतकऱ्यांना तार-जाळीचे कंपाऊंड सामूहिक पद्धतीने उपलब्ध करून देण्याची मागणीही करण्यात आली. ग्रामीण भागातील अल्पवयीन मुलांना दिला जाणारा निकृष्ट दर्जाचा आहार थांबवून त्याऐवजी ॲऊ प्रणाली लागू करावी, असेही शेतकऱ्यांनी निवेदनात नमूद केले आहे. दरम्यान, कर्जदार शेतकऱ्यांच्या कर्जांचे चुकीच्या पद्धतीने करण्यात आलेले पुनर गटण रद्द करण्याचीही मागणी करण्यात आली.

### पोखरा योजनेत समावेशासह विविध मागण्या

याप्रसंगी किशोर देशमुख, सागर म्हैसणे, अर्जुन सुर्वे, रंजित गावंडे, विलास लांभाडे, आशिष राऊत, धिरज राऊत, शिवा गावंडे, दयाराम राऊत, राम राऊत, संजय मुळे, शत्रुघन ठाकरे, वसंतराव राऊत, गजाननराव जाधव, दिलीप फुके, मदन गायकवाड, धर्मराज राजुरकर, कुणाल राऊत, बाळकृष्ण रोकडे, भुषण सुर्वे, पांडुरंग राऊत, वसंत राऊत, गोपाल सुर्वे, भीमराव कोकरे, शालिग्राम कोकरे, कोंडू खाडे, मदन राऊत, गोपाल वानखडे, गजानन फुके, ज्ञानेश्वर कातडे यांच्यासह अन्य शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ३ नोव्हेंबर रोजी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन

**वाशिम :** दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. नोव्हेंबर महिन्यातील लोकशाही दिन ३ नोव्हेंबर रोजी दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील राजे वाकाटक सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. नागरीकांनी जिल्हास्तरीय लोकशाही दिनातील तक्रार अर्ज जिल्हा/तालुका लोकशाही दिनामध्ये सादर केल्यानंतर विहीत नमुन्यात आवश्यक कागदपत्रांसह लोकशाही दिनामध्ये १५ दिवस आधी दोन प्रतीत पाठविणे आवश्यक आहे. असे निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे यांनी कळविले आहे.

# मातंग समाजाला राजकीय अस्तित्व निर्माण करण्यासाठी एकत्र येणे काळाची गरज
## मातंग समाजाच्या बैठकीत भाई जगदीश इंगळे यांचे प्रतिपादन

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

मातंग समाजातील विविध सामाजिक संघटनेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची मत्त्वपूर्ण बैठक दिनांक २६/सप्टेंबर रोजी शासकीय विश्राम भवनात मातंग समाजाचे जेष्ठ नेते शंकर दाभाडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली असून यावेळी बिगर सातबारा शेतकरी संघटनेचे प्रणेते भाई जगदीश कुमार इंगळे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की मातंग समाज हा अत्यंत प्रामाणिक आणि दिलेला शब्द पाळणारा आहे परंतु वाशिम जिल्ह्यतील राजकारणात लोकसंखेच्या प्रमाणात पाहिजे तसा सहभाग नाही त्यामुळे मातंग समाजाच्या सामाजिक कार्यकर्त्यांचे राजकीय पुनर्वसन झाले पाहिजे यासाठी या बैठकीचे आयोजन अखिल भारतीय मातंग समाज संघटनेचे राज्यकर्याध्यक्ष संजय वैरागडे यांनी केले आहे



या बैठकीत होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकी बाबत कोणत्या राजकीय पक्षांच्या सोबत गेले पाहिजे यावर सर्वांच्या प्रतिक्रिया घेण्यात आल्या असून सर्वांच्या सहमतीने माजी जिल्हा परिषद सदस्य अनिल कांबळे यांनी सांगितले की मातंग समाज हा एकजुटीने महायुती सोबत म्हणजे भारतीय जनता पक्षाच्या सोबत होता आणि मातंग समाजाच्या निर्णायक मतावर आमदार शाम खोडे यांना यशस्वी करण्यासाठी मातंग समाजाच्या सर्व पदाधिकारी यांचा सिंहाचा वाटा असल्याचे सांगून विधानसभेच्या निवडणुकीत मातंग समाज तुमच्या सोबत राहील परंतु स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत मातंग समाजाला राजकीय वाटा मिळाला पाहिजे असा करार आमदार शाम खोडे व राजू पाटील राजे यांच्या सोबत झाला होता.

त्यामुळे मातंग समाजाचे शिष्टमंडळ आमदार शाम खोडे व राजू पाटील राजे यांच्याशी चर्चा करेल व नंतर राजकीय निर्णय घेण्यात येईल असे बैठकीत ठरले असले तरी विनोद जोगदंड यांनी सांगितले की विधानसभेत झालेल्या करारा प्रमाणे जर मातंग समाजाला राजकीय वाटा मिळत असेल तर बाकीच्या राजकीय पक्षां पेक्षा मातंग समाजाची जमेची बाजू ठरेल त्यावर बैठकीचे अध्यक्ष शंकर दाभाडे यांनी सांगितले की कोणत्याही परिस्थितीत मातंग समाजाला राजकारणात माना सन्मानाचे स्थान मिळावे यासाठी सर्व समाजाने एकजूट होणे काळाची गरज आहे.

# अंतरीक्ष तीर्थ क्षेत्राचे उद्धारक मुनिश्री विमलहंस महाराज यांना आचार्य पदवी घोषित



**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

जिल्ह्यातील शिरपूर जैन स्थित श्री अंतरीक्ष पार्श्वनाथ तीर्थ क्षेत्राचे उद्धारक श्वेतांबर जैन मुनिश्री पंन्यास प्रवर श्री विमलहंस विजयजी महाराज साहेब यांना आचार्य पदवी घोषित करण्यात आली आहे.

प्रशांतमूर्ती गच्छाधिपती आचार्यदेव श्रीमद् विजय राजेंद्रसुरिश्वरजी महाराज यांनी २६ ऑक्टोबर रोजी जैन साधू महाराज यांच्या आचार्य पदवीची घोषणा केली आहे.मुंबईच्या मलाड उपनगरात चातुर्मासार्थ उपस्थित असलेले आचार्यदेव श्री राजेंद्रसुरिश्वरजी महाराज साहेब यांनी पंन्यास पदवी असलेल्या जैन साधू महाराज यांच्या आचार्य पदविंची घोषणा केली.सदर घोषणा पत्रात श्री विमलहंस विजयजी महाराज यांच्या सह ११ जैन श्वेतांबर साधू महाराजांना लवकरच ही आचार्य पदवी प्रदान करण्यात येणार असल्याचे आचार्यदेव श्री राजेंद्रसुरिश्वरजी महाराज यांनी पत्रकात म्हटले आहे.

आचार्यसम पंन्यास प्रवर श्री चंद्रशेखर विजयजी महाराज साहेब याचे परम शिष्य तसेच श्री अंतरीक्ष पार्श्वनाथ तीर्थ क्षेत्र शिरपूर जैनचे उद्धारक श्वेतांबर मुनिश्री पंन्यास प्रवर श्री विमलहंसविजयजी महाराज यांना आचार्य पदवी घोषित केल्याबद्दल अंतरीक्ष पार्श्वनाथ महाराज संस्थानचे विश्वस्तगण, शिरपूर जैन येथील भक्त गण, कर्मचारी बांधव तसेच जिल्ह्यासह अकोला, हिंगोली, अमरावती, बुलडाणा, जालना, छत्रपती संभाजीनगर, परभणी, नांदेड, जळगाव ाानदेश, मुंबई, अहमदाबाद, सुरत, बारडोली, गुजरात, नागपूर, वर्धा आदी विदर्भ, महाराष्ट्र राज्य व संपूर्ण भारतातील त्यांच्या भक्तगणात अत्यधिक आनंद व्यक्त होत आहे.



# प्रशासकीय बेजबाबदारपणाचा चार गावातील नागरिकांना फटका
## खचलेल्या पुलावरून ये जा करण्याची नागरिकांवर पाळी

**मंगरूळपीर :** तालुक्यातील जोगलदरी या गावालगत बांधण्यात आलेला पुल खचल्यामुळे सावरगांव कान्होबा, खापरी कान्होबा, साळंबी आणि जोगलदरी या गावातील कानिफनाथ महाराज मंदिरावर दर्शनाला जाणाऱ्या श्रद्धाळूंचे खचलेल्या पुलामुळे जीव धोक्यात आलेले आहे.

सध्याचे युग हे वेगवान असून प्रत्येक नागरिकाच्या घरी दळणवळणासाठी आता दुचाकी पासून तर चार चाकी वाहने असल्याने प्रवासी तथा मालवाहतूक करण्यासाठी मजबूत रस्ते आणि पूल असणे गरजेचे असताना जोगलदरी या गावी मात्र प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे दोन वर्षांपूर्वी पाऊस व नदीच्या प्रवाहाने वाहून गेलेले व त्यावेळी तात्पुरती डागडुजी केलेले पूल आता खचल्याने स्थानिक तथा उपरोक्त तीनही गावातील नागरिक आणि मंदिरावर येणाऱ्या श्रद्धाळूंना जीव धोक्यात घालून या खचलेल्या पुलावरून आवागमन करण्याची पाळी निर्माण झालेली आहे.

चैतन्य कानिफनाथ महाराजांच्या दर्शनासाठी तथा यात्रेकरिता वर्षाला लक्षावधी भाविक सावरगाव कान्होबा येथे येत असतात.

१९८४ मध्ये ४१ वर्षांपूर्वी शासनामार्फत बांधण्यात आलेला हा पूल तीन-चार वर्षांपासून जरजरावस्थेत होता, ज्याची दहा वर्षांपूर्वी करण्यात आली होती.

डिसेंबर २०२३ मध्ये तत्कालीन जि.प. पदाधिकारी चंद्रकांत ठाकरे यांनी प्रधानमंत्री ग्रामसडक योजना विभाग अमरावती या कार्यालयाकडे पाठपुरावा करून जोगलदरी येथील जरजर झालेला पूल बांधण्यासाठी पाठपुरावा केला होता. मात्र त्यावेळी हा पुल संबंधित विभागाला सुस्थितीत वाटल्याने ज्या ठिकाणी पुल अस्तित्वात नाही तिथे पूल बांधण्यास प्राधान्यक्रम दिल्या गेल्या जोगलदरी या गावा नजीकचे पुल त्यावेळी बांधले न गेल्याने ही परिस्थिती उद्भवल्याचे पुढे येत आहे.

मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, सार्वजनिक बांधकाम विभाग अथवा जिल्हा परिषद प्रशासनाने परिस्थितीचे गांभीर्य ओळखून जोगलदरी येथील खचलेल्या पुलाची तातडीने उभारणी करून संभाव्य अपघात वा जीवितहानी टाळण्यासाठी आवश्यक ते पावले उचलण्याची मागणी सावरगांव कान्होबा येथील सामाजिक कार्यकर्ते सुरेश राठोड यांनी प्रशासनाकडे केली आहे.

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १३ ■ अंक ३२८ ■ मंगळवार २८ ऑक्टोबर २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.००रु


### पिपरी ग्रामपंचायतीच्या सुविधा केंद्राच्या नुतणीकरणाचे लोकार्पण

# ग्रामपंचायतींच्या सर्वांगीण विकासासाठी विविध अभियानात सहभाग नोंदवावा

### -राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर

वर्धा जनमाध्यम : राज्य शासनाच्यावतीने ग्राम पंचायतींचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी विविध अभियान राबवून अभियानात उत्कृष्ठ कार्य करणा-या ग्राम पंचायतीना पुरस्कार देऊन गौरविण्यात येते यासाठी ग्राम पंचायतींनी अभियानात सहभागी होऊन पुरस्कार प्राप्त करुन घ्यावा व पुरस्काराच्या प्राप्त झालेल्या रक्केतून ग्राम पंचायतीचा सर्वांगीण विकास करावा, असे प्रतिपादन राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण, पाणी पुरवठा व स्वच्छता, ऊर्जा, महिला व बाल विकास राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी ग्राम पंचायत सुविधा केंद्र नुतणीकरणाच्या लोकार्पण सोहळ्यात केले.



पिपरी मेघे ग्राम पंचायत सुविधा केंद्र नुतणीकरणाचे लोकार्पण मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाला राज्याचे गृह (ग्रामीण), गृहनिर्माण, शालेय शिक्षण, सहकार व खनीकर्म राज्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर, संजय गाते, पिपरी मेघे च्या सरपंच वैशाली गौळकर, उपसरपंच गजानन वानखेडे, शितल भोयर, उमरी मेघे चे उपसरपंच सचिन खोसे, सालोड चे उपसरपंच आशिष कुचेवार, अजय गौळकर, सरपंच सतीश इखार, प्रदिप रौंदळे, संदिप कुत्तरमारे, वंदना शंभरकर, विद्या कळसाईत, वनिता कोठाळे, सागर नेहारे, वैशाली नोहाटे, कुमुद लाजुरकर, वैभव चाफले आदी उपस्थित होते.

ग्राम पंचायतीचा दर्जा सुधारावा, नागरिकांना आधुनिक सोई सुविधा निर्माण व्हाव्यात यासाठी शासनाच्यावतीने ग्रामपंचायातीसाठी विविध योजनेच्या माध्यमातून विकास निधी देण्यात येते सोबतच ग्राम समृध्द योजना राबविण्यात येत आहे. या योजनांचा ग्राम पंचायतींनी लाभ घेऊन विकासात्मक कामे करावी. आपले गाव आदर्श करुन राज्यात नावलौकिक करावे, असे पुढे बोलतांना मेघना साकोरे-बोर्डीकर म्हणाल्या. पिपरी ग्राम पंचायत शहरालगत असल्यामुळे नागरिकांचा चांगल्या सोई निर्माण करुन देण्यासाठी ग्राम पंचायतींनी भूयारी गटार योजनेसाठी प्रस्ताव सादर केल्यास तात्काळ मंजूर करण्यात येईल असे आश्वासन यावेळी मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी दिले.

जिल्ह्यातील सर्वात मोठी असलेल्या पिपरी मेघे ग्राम पंचायतीच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही येणा-या काळात ग्राम पंचायतीच्या असलेल्या समस्याचे निराकरण करुन ग्राम पंचायतीचे शून्य बिल करण्यासाठी १६ मेगा वॅटचा सोलर प्रकल्प सुरु करण्यात येईल. तसेच टाटा कन्सलटन्सीच्या माध्यमातून पिपरी मेघे परिसरात कौशल्य विकास केंद्र लवकर सुरु करण्यात येईल असे आश्वासन पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी यावेळी दिले. ग्राम पंचायत मार्फत सुरु करण्यात आलेल्या वाचनालयातील अभ्यासिकेकरीता फर्णीचरसाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येईल असेही पुढे बोलतांना डॉ. पंकज भोयर म्हणाले. यावेळी संजय गाते, सचिन खोसे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले

कार्यक्रमाला पिपरी ग्राम पंचायत परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वैशाली गौळकर यांनी केले तर संचालन विनोद महाजन यांनी केले.

# ठेकेदारांची बिले थकीत, ग्रामीण भागात पाणीपुरवठा ठप्प

### दिवाळीच्या उंबरठ्यावर नागरिक त्रस्त

**वर्धा जनमाध्यम :** त्रिमूर्ती नगर उमरी मेघे आणि सिंदी मेघे परिसरातील नागरिक गेल्या दहा दिवसांपासून पाण्याच्या गंभीर समस्येला सामोरे जात आहेत. पाण्याचा पुरेसा साठा असूनही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे ठेकेदारांची कोट्यवधी रुपयांची बिले वर्षानुवर्षे थकीत राहिल्याने, पाणीपुरवठ्याचे काम पाहणाऱ्या कर्मचाऱ्यांना पगार मिळत नसल्याची स्थिती निर्माण झाली आहे.

परिणामी पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना संतापाने धावपळ करावी लागत आहे. या पार्श्वभूमीवर शिवा संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुरेश पट्टेवार यांनी पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील तसेच वर्ध्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांना निवेदन देऊन ही समस्या तातडीने सोडविण्याची



मागणी केली आहे. त्यांनी जिल्हाधिकारी वान्मथी चंद्रमोहन यांच्या मार्फत पाठविलेल्या निवेदनात नमूद केले की, पाण्याच्या साठ्यात कमतरता नसतानाही केवळ थकीत बिलांमुळे प्रणाली ठप्प होणे ही शासनाकडून गंभीर दुर्लक्षाची बाब आहे. दरम्यान, संबंधित ठेकेदार आर्थिक संकटात असल्याने कामगारांना पगार थकलेले आहेत. पाणीपुरवठा कर्मचारी दिवाळीच्या काळात संपावर जाण्याची तयारी करत असल्याचे वृत्त असून, त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना सणासुदीच्या दिवशीही पाणी मिळण्याबाबत अनिश्चितता आहे. या संदर्भात तातडीने ठोस पावले उचलून ठेकेदारांची बिले निकाली काढून पाणीपुरवठा सुरळीत करावा, अशी नागरिकांची अपेक्षा आहे. जिल्ह्यातील ग्रामीण भागात पाणीपुरवठा प्रश्न दिवाळीच्या सणावर काळा डाग ठरत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

# आर्वीत कार्तिक एकादशीला भक्तीमय कीर्तन सत्संगाचे आयोजन

### डॉ. चारूदत्त आफळे महाराज यांचे बहारदार कीर्तन; डॉ. नारायण निकम यांचे सान्निध्य लाभणार

आर्वी जनमाध्यम : कार्तिक एकादशीच्या पावन पर्वानिमित्त श्री संत परमहंस तात्याजी महाराज देवस्थान, आर्वी येथे रविवार, २ नोव्हेंबर २०२५ रोजी संध्याकाळी ६ वाजता 'कीर्तन सत्संग'चे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात राष्ट्रीय किर्तनकार ह.भ.प. डॉ. चारूदत्त आफळे महाराज, पुणे यांचे भक्तीमय कीर्तन होणार असून, परिसरातील भाविकांमध्ये याविषयी उत्साहाचे वातावरण आहे. संत साहित्य विचारवंत ह.भ.प. प्रा. डॉ. नारायण निकम यांच्या पावन सान्निध्यात



हा सोहळा पार पडणार आहे. ते श्री संत तात्याजी महाराज भक्ती परंपरा आश्रम व ट्रस्टचे उत्तराधिकारी आणि मुख्य विश्वस्त आहेत. सकाळी श्रींच्या देवालयात श्री विठ्ठल मुर्तीला महाअभिषेक व महापूजा डॉ. निकम यांच्या हस्ते संपन्न होणार असून, दिवसभर दर्शनार्थींना प्रसाद वितरणाची व्यवस्था करण्यात आली आहे. श्री संत तात्याजी महाराज देवस्थान, आर्वी तर्फे मोठ्या संख्येने भाविकांनी या भक्तिसोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# प्राचार्य दिनकरराव मेघे स्मृती ट्रस्टतर्फे भारतीय लोकशाही समोरील आव्हाने या विषयावर व्याख्यान १ नोव्हेंबरला

**वर्धा जनमाध्यम :** प्राचार्य दिनकरराव मेघे स्मृती ट्रस्टतर्फे आयोजित प्राचार्य दिनकरराव मेघे स्मृती व्याख्यानमाला या मालिकेतील अठरावे पुष्प १ नोव्हेंबर रोजी सायंकाळी साडेपाच वाजता स्व. सत्यनारायण बजाज सार्वजनिक वाचनालय, मगनवाडी येथे होणार आहे.

या कार्यक्रमात वरिष्ठ पत्रकार निरंजन टकले भारतीय लोकशाही व सद्यस्थितीतील जन आंदोलनांपुढील आव्हाने या विषयावर आपले विचार मांडणार आहेत. कार्यक्रमाचे अध्यक्षपद डॉ. अंबादास मोहिते, सदस्य, महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय आयोग हे भूषविणार आहेत. लोकशाहीच्या आरोग्याविषयी व नागरी हक्कांबाबत चिंतनाचा धागा पुढे नेणारे हे व्याख्यान ठरणार असून, नागरिकांनी उपस्थित राहून विचारमंथनात सहभागी व्हावे, असे आवाहन प्राचार्य दिनकरराव मेघे स्मृती ट्रस्ट, वर्धा तर्फे डॉ. अभ्युदय मेघे यांनी केले आहे.

# गोवर्धन पूजेचा उत्सव भक्तिभावात साजरा

### माहेश्वरी भवनात अन्नकुट दर्शनासाठी गर्दी

**वर्धा जनमाध्यम :** दिवाळीच्या दुसऱ्या दिवशी पारंपरिक उत्साहात गोवर्धन पूजा मोठ्या भक्तिभावाने पार पडली. माहेश्वरी भवनात आयोजित या धार्मिक सोहळ्यात भगवान श्रीकृष्ण, गोवर्धन पर्वत आणि गोमातांची पूजा करून समाजबांधवांनी परमेश्वराप्रति



कृतज्ञता व्यक्त केली.गोवर्धन पूजेनिमित्त ५६ प्रकारचे स्वादिष्ट पदार्थ तयार करून भगवान श्रीकृष्णांना अर्पण करण्यात आले.

या अन्नकुट दर्शनासाठी सकाळपासूनच भाविकांची गर्दी उसळली होती. अन्नाचा डोंगर म्हणून ओळखला जाणारा हा नैवेद्य भक्तांसाठी अनोखी आकर्षण ठरला.सकल माहेश्वरी समाजाचे समन्वयक राजकुमार जाजू यांनी सांगितले की, अनेक वर्षांपासून हा सण प्रेम, एकता आणि निसर्गपूजेचा संदेश देतो. राजस्थानी, गुजराती आणि वैष्णव समाजातील परिवारांनी एकत्रितरित्या प्रसादाचा आस्वाद घेतला.भगवान श्रीनाथजींच्या कृपेमुळे बदलत्या हवामाना नंतरही वातावरण अनुकूल राहिले. हा सोहळा सुरळीत पार पाडताना समाज बांधवांमध्ये आनंद आणि समाधानाची लहर होती.या प्रसंगी श्रीमती रश्मी व सी.ए. राजेश राठी, श्रीमती कांचन मुंदडा आणि श्रीमती कृष्णा कुलधारिया यांनी तयार केलेली भगवान विठ्ठलांची रांगोळी तसेच पंढरपूर वारीची झांकीने कार्यक्रमाची शोभा वाढवली. भक्तांनी या कलाकृतींचे कौतुक करत अन्नकुटाचा प्रसाद ग्रहण करत दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.


### कार्यालय, ग्राम पंचायत, मनगांव, पं.स.समुद्रपूर, जि.प.वर्धा
### निविदा सूचना

सर्व नोंदणीकृत कंत्राटदारास सुचित करण्यात येते की, ग्राम पंचायत, मनगांव येथे सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात जिल्हा वार्षिक योजना जनसुविधा सन २००५-२६ अंतर्गत मंजुर प्राकलनानुसार कामाकरिता पंजीबध्द कंत्राटदाराकडून निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | योजनेचे नांव | कामाचे नांव | प्राकलनीय किंमत | तांत्रिक मंजूरी क्र. | १% अनामत रक्कम | निविदा फी | कामाचा कालावधी | निविदा स्विकृतीचा दिनांक | निविदा उघडण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा वार्षिक योजना जनसुविधेसाठी विशेष अनुदान सन २०२५-२६ | मौजा चिंचोली (ग्रा.प. मनगांव) येथील गावापासुन ते स्मशानभूमीपर्यत रस्ता बांधकाम करणे. ता.समुद्रपुर, जि.वर्धा | ९०००००/- | ३५२/ईई/ २०२५-२६ | ९००० | १००० | ३ महिने | दि.२७/१०/२५ ते ३/११/२५ ला दु.३.००वा. | दि.७/११/२५ ला किंवा ग्रामपंचायत सभेच्या दिवशी |

**अटी व नियम :-** सविस्तर अटी व शर्ती कार्यालयीन दिवशी व वेळेत ग्राम पंचायत कार्यालय येथे पाहण्यास उपलब्ध आहे.

**प्रशासक**
**ग्रामपंचायत, मनगांव**

**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत, मनगांव**


# शेतकऱ्यांच्या हक्कासाठी बच्चू कडूंचा रणघोष : ट्रॅक्टर रॅली वर्ध्यात दाखल

### कर्जमाफी, हमी दर, शेतमजुरांचे प्रश्न मांडण्यासाठी 'प्रहार'चं महाएल्गार आंदोलन

**वर्धा जनमाध्यम :** शेतकऱ्यांच्या हक्कासाठी लढा देणारे प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक अध्यक्ष आणि माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी पुन्हा एकदा आंदोलनाचा बिगुल वाजवला आहे. संपूर्ण कर्जमाफी, शेती उत्पादनांना हमीभाव आणि शेतमजूर, मच्छीमार, दिव्यांग, मेंढपाळ यांच्या मागण्यांसाठी त्यांनी काढलेली ट्रॅक्टर रॅली सोमवार, २७ ऑक्टोबर रोजी वर्धा जिल्ह्यात दाखल झाली. अमरावतीहून सुरू झालेल्या या ट्रॅक्टर रॅलीत शेकडो ट्रॅक्टर आणि हजारो कार्यकर्ते सहभागी झाले आहेत. आर्वी तालुक्यातील खरांगणा, वाढोणा, आंजीमार्गे ही रॅली सायंकाळी आर्वीत दाखल झाली. आज मंगळवार, २८ ऑक्टोबर रोजी ही रॅली सुकळी (बाई) येथून निघणार असून, ते पुढे जुनापानी चौक, पवनार, सेलू, केळझर मार्गे नागपूरच्या दिशेने रवाना होणार आहे. रॅलीदरम्यान शेतकरी वर्गाच्या न्याय्य मागण्या शासनापर्यंत पोहोचवण्याचा निर्धार



बच्चू कडू यांनी केला आहे. सरकारने शेतकऱ्यांचे कर्जमुक्तीचे आश्वासन दिले, पण अजूनही लाखो शेतकरी बँकांच्या नोटिशा झेलत आहेत, असे कडू यांनी सांगितले.या रॅलीच्या आयोजनात प्रहार पक्षाचे जिल्हाध्यक्ष विकास दांडगे, शैलेश खोसे, प्रीतम कातखेडे, मंगेश मुडे, सुरज घायवट, अमोल आव्हाड, भूषण येलेकार, विवेक धोंगडे, शुभम भोयर, विवेक चौधरी यांचा विशेष सहभाग आहे. सुकळी येथे कार्यकर्त्यांसाठी भोजन आणि निवासाची सुविधा करण्यात आली आहे.

# ९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन

### गझलकारांना रचना पाठविण्याचे आवाहन

### साताऱ्यात पुन्हा रंगणार मराठी गझलकट्टा

**वर्धा जनमाध्यम :** अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ, महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, शाखा शाहूपुरी आणि मावळा फाउंडेशन, सातारा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात दि. २, ३ व ४ जानेवारी रोजी गझल कट्टा अर्थात मराठी गझल मुशायरा यंदा संमेलनाची रंगत वाढविणार आहे. या तीन दिवसीय मुशायऱ्यात नव्याजुन्या पिढीतील गझलकार सहभागी होणार असून गझलकारांनी दि. १० नोव्हेंबरपर्यंत स्वरचित गझल संक्षिप्त परिचयासह पाठविण्याचे आवाहन गझल कट्टा संयोजन समितीद्वारे करण्यात आले आहे.



या गझल मुशायऱ्यात सहभागी होण्याकरिता गझलकारांनी पाठवलेली रचना गझलेच्या निकषांनुसार असावी. राष्ट्रीय एकात्मता व सामाजिक सलोख्याचा भंग होणार नाही, अशी गझल सादर करणे अपेक्षित असून सादरीकरणासाठी पाच मिनिटे दिली जातील. गझलकारांनी gazalkatta99satara@gmail.com या मेलवर स्वतःचा पत्ता, व्हाट्सप नंबर, ई-मेल यासह गझल पाठविणे अपेक्षित आहे. नियोजित वेळेत प्राप्त झालेल्या व परीक्षण समितीने निवड केलेल्या गझलेलाच या गझल कट्टयावर सादरीकरणासाठी संधी देण्यात येणार आहे. या तीन दिवसीय गझलकट्टयात १६ मुशायरे सादर होणार असून सहभागी गझलकारांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात येईल.

अधिक माहितीसाठी गझलकारांनी गझलकट्टा समन्वय समितीचे विश्वास कुलकर्णी (९१५८५०५२१८), संजय गोरडे (७२७६० ९१०११), शिव डोईजोडे (९८२२५ ५८८६१) किंवा संजय इंगळे तिगावकर (९७६५०४७६७२) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन ९९व्या अ.भा. मराठी साहित्य संमेलनाचे कार्याध्यक्ष विनोद कुलकर्णी, कोषाध्यक्ष नंदकुमार सावंत, गझलकट्टा प्रमुख कल्याण शिंदे, मुख्य समन्वयक हेरंब जोशी तसेच गझलकट्टा नियोजन समितीद्वारे करण्यात आले आहे.

# सामाजिक बांधिलकीतून संजय धारणे यांचा राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षात प्रवेश

### जिल्हा परिषद उमेदवारीची घोषणा; युवकांमध्ये उत्साहाची लहर

हिंगणघाट जनमाध्यम : समाजातील वंचित घटक, शेतकरी आणि सामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी सतत कार्यरत राहिलेले कोरा सर्कल (ता. समुद्रपूर) येथील सामाजिक कार्यकर्ते संजय धारणे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षात प्रवेश केला. त्यांच्या पक्ष प्रवेशामुळे स्थानिक राजकीय समीकरणांत नवचैतन्य निर्माण झाले आहे.



हा प्रवेश सोहळा राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे जिल्हाध्यक्ष अतुल वांदिले यांच्या प्रेरणादायी नेतृत्वाखाली आणि तालुका अध्यक्ष महेश झोटिंग पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी जीवन नारनवरे, गणेश नारनवरे, अशोक दोडके, जगदीश नारनवरे व सुभाष नारनवरे यांनी पक्षाचा झेंडा हातात घेत प्रवेश केला.या कार्यक्रमातच संजय धारणे यांची जिल्हा परिषद उमेदवारी जाहीर करण्यात आली. त्यानंतर कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचा जल्लोष उसळला. मनोगतात श्री धारणे म्हणाले, शेतकरी, विद्यार्थी, युवक आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी मी दीर्घकाळ संघर्ष केला आहे. समाजातील बदल घडविण्याची प्रेरणा मला राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या प्रामाणिक नेतृत्वातून मिळाली. त्यामुळेच आज पक्षात प्रवेश करून मी जनतेच्या सेवेसाठी नवी दिशा स्वीकारली आहे. या प्रसंगी पक्षाचे पदाधिकारी महेश झोटिंग पाटील, दशरथ ठाकरे, अशोक वांदिले, गजानन शेंडे, संजय लोणकर, गणेश वैरागडे, महादेव वांदिले, सोहन शेंडे, नामदेव वैरागडे, अशोक वैरागडे आदी मान्यवर उपस्थित होते.या पक्षप्रवेशानंतर कोरा सर्कल परिसरात राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाची संघटनात्मक ताकद वाढली असून तरुणांमध्ये नव्या आशा आणि आत्मविश्वासाची भावना दिसून येत आहे,


### कार्यालय नगर परिषद, आर्वी, जि.वर्धा
### विद्युत विभाग निविदा सूचना सन २०२५-२६

मुख्याधिकारी, नगर परिषद आर्वी यांचे वतीने खालील कामाकरीता कंत्राटदारांकडून द्वी-पाकिट पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहेत. तरी योग्य त्या कंत्राटदाराने दि.२८.१०.२०२५ ते दि.०४.११.२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत निविदा फॉर्म व बयाणा रकमेचा रोखपाल यांच्याकडे रोखीने भरणा करुन कोरे निविदा पत्रक विद्युत विभागातून घ्यावे. परिपूर्ण भरलेले सिलबंद पाकिट न.प.कडे दिनांक ०६.११.२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सादर करावे. निविदा शक्य झाल्यास उपस्थित कंत्राटदारांचे समोर उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नांव | निविदा दर | कोरे निविदा फॉर्म फी | निविदा बयाणा रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | न.प.आर्वी प्रशासकीय ईमारतीमधील १५ KVA क्षमतेच्या जनरेटरची दुरुस्ती करुन वार्षिक मेंटनन्स तसेच आवश्यकतेनुसार डिझेल पुरवठा करण्यासाठी करार करणेबाबत. | प्रति नग प्रमाणे सर्व करासहीत नमुद करावे. | ५००/- | १५००/- | ३० दिवस |

**अटी व शर्ती-**

१. सदर कामासंबंधीत अटी व शर्ती कार्यालयीन वेळेत विद्युत विभागात पहावयास मिळतील.
२. सदर कामाची निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार मुख्याधिकारी, नगर परिषद, आर्वी यांनी राखून ठेवलेले आहेत.

**स्वाक्षरी/-**
**प्रशासक तथा मुख्याधिकारी,**
**नगर परिषद, आर्वी,**
**जि.वर्धा**

## संक्षिप्त

### भाजपात गेलेले पदाधिकारी महिनाभरातच मनसेत परतले

**रत्नागिरी :** होय, नाही करता करता अखेरीस वैभव खेडेकर यांचा भाजपामध्ये प्रवेश झाला. राज ठाकरे यांच्या आदेशानुसार कोकणातील नेते वैभव खेडेकर यांना मनसेतून बडतर्फ करण्यात आले होते. वैभव खेडेकर यांनी भाजपमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला होता. परंतु, परंतु, वैभव खेडेकर यांचा पक्षप्रवेश दोन ते तीन वेळा रखडला होता. वैभव खेडेकर यांच्या भाजप प्रवेशाला काहींचा विरोध होता, त्यामुळे तो लांबल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू होती.



यातच आता वैभव खेडेकर यांच्यासोबत भाजपात गेलेले अनेक पदाधिकारी महिनाभरातच मनसेत परतल्याचे म्हटले जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, वैभव खेडेकर यांच्या सोबत पक्षातून बाहेर गेलेले अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते आता पुन्हा मनसेत परतले असल्याचे म्हटले जात आहे. झालेल्या गैरसमजांना मागे टाकत हे सर्व जण राज ठाकरे यांच्या भेटीसाठी मुंबईत येत आहेत. उपजिल्हाध्यक्ष, महिला पदाधिकारी तसेच विविध तालुक्यांतील कार्यकर्त्यांचा मोठा गट मनसेत परत आला आहे. राज ठाकरेंना सोडून गेलेले पदाधिकारी पुन्हा परतल्याने रत्नागिरी जिल्ह्यात मनसेचे संघटन पुन्हा जोमाने उभे राहण्याची चिन्हे असून रत्नागिरीचा गड पुन्हा मनसेकडे आल्याचे म्हटले जात आहे. आगामी काळात राज ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली पक्ष संघटन अधिक मजबूत होणार असल्याचे बोलले जात आहे.

### आदिवासींचे आरक्षण कोणतेही सरकार काढू शकत नाही-वळसे पाटील

**मुंबई/प्रतिनिधी :**आरक्षणाच्या मुद्यावरून आदिवासी जनतेची दिशाभूल सुरू आहे. जोपर्यंत राज्यघटना अस्तित्वात आहे तोपर्यंत कोणतेही सरकार आदिवासींचे आरक्षण काढून घेऊ शकत नाही असे प्रतिपादन माजी सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी केले आहे. आंबेगाव तालुक्याच्या आदिवासी भागातील गाव भेट दौरा आणि विविध विकासकामांच्या भूमिपूजन कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. यावेळी शिरूर लोकसभा मतदारसंघाचे माजी खासदार व म्हाडाचे माजी अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील हे उपस्थित होते. राज्यघटनेने आदिवासी समाजाला घटनात्मक आरक्षण दिले आहे.



सध्या इतर समाजांना आदिवासींमध्ये आरक्षण मिळावे अशी मागणी केली जात आहे. हाच मुद्दा पकडून आदिवासी समाजाला आरक्षणावरून दिशाभूल करण्याचा प्रयत्न सुरू आहे. मात्र, जोपर्यंत राज्यघटना अस्तित्वात आहे, तोपर्यंत आदिवासी समाजासह इतर समाजांना मिळालेले आरक्षण कोणतेही सरकार काढून घेऊ शकत नाही. असे ठाम मत माजी सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी मांडले. आंबेगाव तालुक्यातील नानवडे (ता. आंबेगाव) येथे गाव भेट दौरा आणि विविध विकासकामांच्या भूमिपूजन कार्यक्रमादरम्यान ते बोलत होते. यावेळी त्यांच्यासोबत शिरूर लोकसभा मतदारसंघाचे माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील उपस्थित होते. ते म्हणाले की, मी खासदार असताना प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत या भागातील अनेक रस्त्यांची कामे यशस्वीरीत्या राबवली. सध्या पुन्हा जिल्हा म्हाडाची सोडत निघाली आहे. यामध्ये आदिवासी लाभार्थ्यांसाठी काही घरे राखीव ठेवलेली असतात. त्यामुळे जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी अर्ज करून म्हाडाच्या घरे मिळवून घेण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले. गाव भेट दौ-याच्या निमित्ताने माळीण येथे बोलताना दिलीप वळसे पाटील यांनी विधानसभा निवडणुकीतील कमी मतदानाबाबत आपली खंत व्यक्त केली. मागील २५-३० वर्षांच्या कालावधीत या भागात केलेल्या कामांबाबत कोणी बोलत नाही, पण जी कामे झाली नाहीत त्या बाबतीत बोलून लोकांचा दिशाभूल करून डोकी फिरवण्याचे काम सुरू आहे. मतदारसंघातील विकासाचे काम पुढे नेण्यासाठी काही राजकीय धोरणे करावी लागली.

### युक्रेनचा रशियावर मोठा ड्रोन हल्ला
#### मॉस्कोतील दोन विमानतळ बंद

**मॉस्को :** रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्ध अद्यापही थांबण्याची चिन्हे दिसत नाहीत. तशातच युक्रेनने रशियाची राजधानी मॉस्कोवर सर्वात मोठा ड्रोन हल्ला केला आहे. रशियन अधिका-यांनी सोमवारी सांगितले की युक्रेनने २६-२७ ऑक्टोबरच्या रात्री मॉस्कोवर मोठा ड्रोन हल्ला केला. मॉस्कोवर ३४ ड्रोनच्या माध्यमातून



गोळीबार करण्यात आला.रविवारी रात्री स्थानिक वेळेनुसार रात्री १० वाजता सुरू झालेले हे ड्रोन हल्ले पाच तास चालले. रशियाने सोमवारी सांगितले की त्यांच्या हवाई संरक्षण प्रणालींनी रात्रीतून १९३ युक्रेनियन ड्रोन नष्ट केले गेले, ज्यात ३४ मॉस्कोला लक्ष्य करणारे आणि ४७ ब्रायन्स्क प्रदेशात होते. या हल्ल्यांमुळे मॉस्कोचे डोमोडेडोम आणि झुकोव्स्की विमानतळ काही काळासाठी बंद करावे लागले. या हल्ल्यात एक व्यक्ती ठार झाला आणि पाच जण जखमी झाले. रशियाच्या नैऋत्येकडील ब्रायन्स्क येथे युक्रेनियन ड्रोनने एका मिनीबसला धडक दिली, ज्यामध्ये चालकाचा मृत्यू झाला. त्याच बसमधील पाच प्रवासीही जखमी झाले, असे प्रादेशिक गव्हर्नर अलेक्झांडर बोगोमाझ यांनी टेलिग्राम अँपवर सांगितले. मॉस्को आणि ब्रायन्स्क प्रदेशात नष्ट केलेल्या ड्रोन व्यतिरिक्त, रशियन प्रणालींनी देशाच्या पश्चिम आणि दक्षिणेकडील इतर ११ प्रदेशांमध्ये ड्रोन पाडले, असे रशियन संरक्षण मंत्रालयाने टेलिग्रामवरील त्यांच्या अहवालात म्हटले आहे. रशियाचे अध्यक्ष आणि मॉस्कोचे महापौर सर्गेई सोब्यानिन यांनी टेलिग्रामवर घोषणा केली की मॉस्कोवरून उडणारे ड्रोन सहा तासांच्या आत पाडण्यात आले. हल्ल्यामुळे, हवाई सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी मॉस्कोच्या चार विमानतळांपैकी दोन, डोमोडेडोवो विमानतळ आणि लहान झुकोव्स्की विमानतळ, सुमारे अडीच तासांसाठी बंद ठेवण्यात आले.

### महाराष्ट्रात दरदिवशी 61 बालकांवर अत्याचार
#### एनसीआरबी अहवालात धक्कादायक माहिती

**मुंबई :** राज्यात बालकांवर होत असलेल्या अत्याचाराच्या गुन्ह्यांचा आलेख चिंताजनक पातळीवर पोहोचला आहे. राष्ट्रीय गुन्हे नोंद विभागाच्या (एनसीआरबी) अहवालानुसार राज्यात दररोज सरासरी ६१ बालकांवर अत्याचार होत असून, त्यापैकी २४ बालकांवर लैंगिक अत्याचार होत असल्याची धक्कादायक माहिती पुढे आली आहे. २०२३ मध्ये राज्यात बालकांवरील अत्याचाराचे एकूण २२ हजार ३९० गुन्हे नोंदवले गेले होते.




२०२२ च्या तुलनेत ते एक हजार ६२८ ने अधिक आहेत. संपूर्ण देशात नोंदवलेल्या गुन्ह्यांच्या तुलनेत महाराष्ट्राचा वाटा सुमारे १३ टक्के आहे. गुन्ह्यांच्या आकडेवारीनुसार मध्य प्रदेश २२ हजार ३९३ गुन्ह्यांसह प्रथम, तर महाराष्ट्र २२ हजार ३९० गुन्ह्यांसह दुस-या क्रमांकावर आहे. दर लाख बालकांमागील गुन्ह्यांचा दर लक्षात घेतल्यास महाराष्ट्र देशात दहाव्या स्थानी असून येथे दर लाख बालकांमागे ६१ गुन्हे नोंदले गेले आहेत. सर्वाधिक गुन्ह्यांचा दर अंदमान आणि निकोबार बेटे (१४३.४), दिल्ली (१४०.३), चंदीगड (९०.७), आसाम (८४.२) आणि मध्य प्रदेश (७७.९) मध्ये आहे. क्राय संस्थेच्या विश्लेषणानुसार महाराष्ट्रातील सर्वाधिक बालकांवरील गुन्ह्यांनुसार मुंबईत जिल्ह्यात (३,११०), ठाण्यात (१,६३८), पुण्यात (१,२३४), मीरा-भाईंदरमध्ये (१,०१६) आणि पुणे ग्रामीण (८७८) जिल्ह्यांमध्ये नोंदले गेले आहेत. लहान मुलांवरील वाढते अत्याचार रोखण्यासाठी पोलिसांनी ठोस उपाययोजना करण्याची गरज व्यक्त होत आहे. अपहरणांचे प्रमाण अधिक–राज्यातील गुन्ह्यांमध्ये १२ हजारांहून अधिक गुन्हे अपहरणाशी संबंधित आहेत. त्याचबरोबर, आठ हजारांहून अधिक गुन्हे लैंगिक अत्याचाराशी संबंधित आहेत, ज्यात मुंबईत १,११०, ठाणे ४४७, पुणे ४३१, पुणे ग्रामीण ४०० आणि मीरा भाईंदर-वसई विरारमध्ये ३३३ गुन्हे नोंदले गेले आहेत.

# यंदा शुभमंगलचे मुहूर्त कमी

## पुढील 2 महिन्यांत फक्त 5 तिथी

**अमरावती/प्रतिनिधी :**हिंदू संस्कृतीमध्ये तुळशी विवाहानंतर लग्नाचे मुहूर्त सुरु होतात. गुडघ्याला बाशिंग बांधून सज्ज असलेल्या उपवर वधू-वर, पालकांसह, नातेवाइक लग्नसोहळ्यांची लगबग सुरू करतात. पण, यंदाच्या-वर्षी लग्नासाठीचे शुद्ध मुहूर्त कमी आहेत.



कार्तिक शुक्ल पक्षातील एकादशीपासून ते कार्तिक शुक्ल पौर्णिमा पर्यंत तुळशी विवाह केला जातो. त्यानुसार २ ते ५ नोव्हेंबरपर्यंतच तुळशी विवाह असणार आहे. त्यानंतरच चातुर्मास-मध्ये थांबलेली लग्नसराई होते. पण, कार्तिक महिन्यात सूर्याचा वृश्चिक राशीत प्रवेश झाल्यानंतर लग्नाचे मुहूर्त सुरू होतात. यंदाच्या-वर्षी १६ नोव्हेंबरला सूर्याचा वृश्चिक राशीत प्रवेश होतो. पण, त्यानंतर कृष्ण त्रयोदयी, चतुर्दशी व अमावस्यांमुळे लग्नाचा पहिला मुहूर्त थेट २२ नोव्हेंबरला आहे. एरवी तुलसी विवाहानंतर लगेच सुरू होणारी लग्नसराई यावर्षी मात्र तब्बल १५ दिवसानंतर सुरू होणार असल्याने अनेकांचे नियोजन बदलणार आहे.

२२ नोव्हेंबरपासून सुरू झालेली लग्नसराई पुढे फक्त ५ डिसेंबर पर्यंत चालेल. शुक्राचा अस्त १४ डिसेंबर ते ३० जानेवारीपर्यंत आहे. त्या दरम्यान मुहूर्त नाहीत. त्यानंतरचे पुढील ३ दिवस सोडून ३ फेब्रुवारीला पुन्हा लग्नसराई सुरू होउ होणार असून १६ मार्चपर्यंत लग्नाचे विविध मुहूर्त आहेत. १९ मार्चला गुढीपाडवा असून त्यानंतर सुरू होणा-या हिंदू नववर्षांमध्ये २१ एप्रिल ते ११ जुलैपर्यंत लग्नाचे मुहूर्त आहेत. लग्नाचे हे मुहूर्त निघताच विवाहेच्छुकांसह ल?न्स, केटरींग व अन्य व्यावसायिकांकडून नियोजन सुरू झाल्याचे दिसून येत आहे.

**शुद्धमुहूर्ताचे प्रमाण कमीच-**नोव्हेंबर ते जूनपर्यंत यावेळी शुद्ध-मुहुर्त कमी असल्याने ठराविक कालावधीनंतर मुहूर्त आहेत. त्रिखंडात्मक सिंहस्थ ऑक्टोबर २०२६ पासून सुरू होत आहे, त्यामुळे यंदापासून पुढील दोन-तीन वर्षे लग्नासाठीच्या शुद्धमुहूर्ताचे प्रमाण कमीच राहिल.

**लग्नाचा पहिला मुहूर्त थेट २२ नोव्हेंबरला-**शुद्ध लग्न मुहूर्त कालावधी नोव्हेंबर : २२, २३, २५, २६, २७, ३० डिसेंबर : २, ५ फेब्रुवारी : ३, ५, ६, ७, ८, १०, ११, १२, २०, २२, २५, २६ मार्च : ५, ७, ८, १२, १४, १५, १६ २१ एप्रिल ते ११ जुलै २०२

**अडचणीप्रसंगी काढीव मुहूर्त-** डिसेंबर : १२, १३, १५ जानेवारी : २०, २३, २४, २५, २६

# फडणवीसांना खोटे बोलण्याचे व्यसन

## फलटण महिला डॉक्टरच्या आत्महत्येवरून राउतांचा फडणवीसांवर निशाणा

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या फलटण येथे झालेल्या महिला ड?क्टरच्या आत्महत्येच प्रकरण गाजत आहे. यात काही पोलिसांवरच गंभीर आरोप झाले आहेत. आज संजय राउत यांना या विषयावर विचारल्यानंतर ते बोलले. फडणवीस खोट बोलतात. त्यांना खोटे बोलण्याचे व्यसन जडले आहे. फडणवीसांनी संवेदनशील असलं पाहिजे. राज्याच्या मुख्यमंर्त्याने इतकं खोटं बोलू नये. विरोधकांवर लाथा घालून, शिव्या घालून राज्याचे प्रश्न सुटणार नाहीत असे संजय राउत म्हणाले. ज्या अर्थी जनतेचा रोष आहे. काही काळ हा विषय तुम्हाला गांभीर्याने पाहता आला असता. पण तुम्हाला राजकारण महत्वाच होतं. कालचा कार्यक्रम महत्वाचा होता. त्याच्यामुळे तुम्ही तिथे गेलात. एका महिला ड?क्टरची आत्महत्या हा विषय तुम्ही गांभीर्याने घेत नसाल, मूळात ही हत्या झाली याला तुम्ही जबाबदार आहात असा आरोप संजय राउत यांनी केला. त्या मुलीने आत्महत्या केली. तिला करायला भाग पाडली याचा अर्थ कायद्याची, गृहखात्याची भिती राहिलेली नाही. महाराष्ट्रात हे वारंवार होतय.



मुंबईच्या रस्त्यावर एका तरुणीची ज्या पद्धतीने हत्या केली, हा विषय गंभीर आहे. तुम्हाला इतर सर्व गोष्टी करायला वेळ आहे. इतर लोकांवर पाळत ठेवायला वेळ आहे. इतर लोकांच्या मागे इंटलेजिन्स लावायला वेळ आहे. भाजपच्याच लोकांचे फोन टॅप करायला वेळ आहे. पण महाराष्ट्राच्या कायदा-सुव्यवस्थेत असणारी अव्यवस्था सावरायला वेळ नाही अशी टीका संजय राउत यांनी केली.

**१ नोव्हेंबरचा मोर्चा अभूतपूर्व असेल-**दोन गोष्टी महत्वाच्या आहेत. आज उपशाखाप्रमुखांचा मेळावा आहे. आमची जमिनीवरची फौज आहे, त्यांना काय संदेश देतोय, याकडे सगळ्यांचे लक्ष आहे. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे त्यांना मार्गदर्शन करतील. मुंबईतून मोठ्या प्रमाणातून मुंबईतल्या उपशाखाप्रमुखांचा मेळावा आहे. १ नोव्हेंबरला मतदारच्या यादीतल्या घोळा संदर्भात सर्वपक्षीय मोर्चा निघतोय. दिल्लीला धडकी भरेल, निवडणूक आयोगाला घाम फुटेल अशा पद्धतीचा मोर्चा काढावा, यासाठी तयारी सुरु आहे. शरद पवार यांची राष्ट्रवादी, शिवसेना, मनसे, डावे पक्ष प्रत्येकजण मोर्चाच्या यशासाठी झटतोय. १ नोव्हेंबरचा मोर्चा अभूतपूर्व असेल असा दावा संजय राउत यांनी केला.

# ही जुलमी राजवट घराघरात एक डॉक्टर संपदा करतील

## जितेंद्र आव्हाड महायुतीविरोधात आक्रमक

**मुंबई/प्रतिनिधी :** सातारा जिल्ह्यातील फलटण उपजिल्हा रुग्णालयात कार्यरत असलेल्या एका तरुण महिला डॉक्टरच्या आत्महत्येमुळे राज्यातील वातावरण तापले आहे. यामुळे महाराष्ट्रात खळबळ उडाली आहे. या घटनेनंतर राजकीय वर्तुळातून विविध प्रतिक्रिया समोर येत आहेत. या प्रकरणातील आरोपी पोलिस उपनिरीक्षक गोपाळ बदने आणि पोलिस कर्मचारी प्रशांत बनकर या दोघांना पोलिसांनी अटक केली आहे. तसेच त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. या प्रकरणावरुन आता राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी भाष्य केले.



जितेंद्र आव्हाड यांनी त्यांच्या अधिकृत ट्वीटरवरुन एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी त्या महिला डॉक्टरचा एक फोटो शेअर केला आहे. या फोटोसोबत त्यांनी एक पोस्ट शेअर केली आहे. आज आवाज नाही उठवला तर ही जुलमी राजवट महाराष्ट्राच्या घराघरांमध्ये एक डॉ. संपदा करतील, असे जितेंद्र आव्हाड यांनी म्हटले आहे. पोलिस व प्रशासन आरोग्य विभागातील मधील वरिष्ठ- कनिष्ठ अधिका-यांनी लोकप्रतिनिधीच्या आशीर्वादाने एकत्र येउन केलेली संस्थात्मक हत्या आहे. आज आवाज नाही उठवला तर ही जुलमी राजवट महाराष्ट्राच्या घराघरांमध्ये एक डॉ. संपदा करतील असे जितेंद्र आव्हाड यांनी या पोस्टमध्ये म्हटले आहे. डॉ. संपदा मुंडे यांची आत्महत्या नसून संस्थात्मक हत्या आहे. एका शेतकरी आई-बापाने मोल मजुरी, उसतोडणी करून आपल्या लेकीला जिद्दीने घडविले ती कर्तबगार लेक म्हणजे डॉ. संपदा मुंडे! चुकीचे नियमबा अहवाल देण्यासाठी तसेच काही पी. एम रिपोर्ट बदलण्यासाठी डॉ. संपदा वर स्थानिक पोलिस प्रशासन व लोकप्रतिनिधी गेल्या वर्षभरापासून प्रचंड दबाव टाकत होते पण डॉ. संपदा कोणत्याही दबावाला न घाबरता आपली आरोग्यसेवा प्रामाणिकपणे करत होते. ती अनेक महिन्यापासून या प्रशासनातल्या असूरी शक्ती विरुद्ध नियतीचा लढा एकटी लढत होती.

# जैन बोर्डिंग प्रकरणात धर्मादाय आयुक्तालय दोषी ठरले पाहिजे

## प्रकाश आंबेडकर यांचा दावा

**पुणे/प्रतिनिधी :** जैन बोर्डिंग प्रकरणात आता व्यवहार रद्द झाल्याचे गोखले बिल्डरने मेलद्वारे कळवले आहे. जैन बांधवांना यामुळे एक प्रकारे दिलासा मिळाला आहे. परंतु पुढची प्रक्रिया ही धर्मादायच्या सुनावणीनंतर समोर येणार आहे. या प्रकरणात आता आज वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी जैन बोर्डिंगला भेट दिली. यावेळी त्यांनी धर्मादाय आयुक्तालय दोषी ठरले पाहिजे अशी प्रतिक्रिया माध्यमांशी बोलताना दिली आहे. धर्मादाय आणि ट्रस्टी यांच्या अधिकाराबाबत आंबेडकर यांनी भाष्य केले आहे.



आंबेडकर म्हणाले, या जुन्या ट्रस्टच्या जागा आहेत. त्या ट्रस्टच्या जागा जमीनदोस्त करण्याची परिस्थिती आहे. गरज नसताना विकल्या जातात. धर्मादाय आयुक्तकडे बाम्बे ट्रस्ट ऍक्ट आहे. त्याला परवानगी नसताना विकता येत नाही. ज्यांनी ट्रस्ट निर्माण केलेला असतो तो करत असताना ट्रस्ट डिड असतो. त्यात बदल करायचा असेल तर तो कोर्टाला आहे. महाराष्ट्र शासनाला नाही. याचा ट्रस्ट डिड मी वाचला आहे. त्या कालम मध्ये विकसित करता येते. मात्र विकण्याची परवानगी नाही. धर्मादाय आयुक्तलयला पण विकण्याची परवानगी देता येत नाही. जेव्हा संपत्ती आपण ट्रस्ट करतो तेव्हा त्यावर मालकी करता येत नाही. शासनाची मालकी असल्यामुळे शासनाला पण अधिकार नाही. तो अधिकार हाय कोर्टाला देण्यात आला आहे. उद्या सुनावणी आहे. ट्रस्टी आहेत त्यांनी याचा विचार करावा. त्यांनी एक कलम दाखवून दिले तरी ट्रस्टीला हे विकता येणार नाही. उद्या हे प्रकरण हाय कोर्टात गेले तर धर्मादाय आयुक्तवर ताशेरे ओढतील. उद्या सुनावणी एक तर स्थगित ठेवतील. धर्मादाय आयुक्तलय यामध्ये दोषी ठरल पाहिजे. ट्रस्ट म्हणजे मालक नाही. बिल्डर गोखले यांनी व्यवहार रद्द केला आहे. त्याबाबत बोलताना ते म्हणाले, त्यांना कळलेअसेल की कोर्ट हे रद्द करेल. आपली बदनामी होउ नये. हे त्यांनी ओळखले असेल आणि बाहेर पाडाव म्हणून त्यांनी केल असेल. हे सगळे ट्रस्टी क?लिफाईड आहे. आता नवीन ट्रस्ट केली पाहिजेल. आता या जागेचे मालक हे सरकारच्या वतीने धर्मादाय आहेत. त्यामुळे या प्रॉपर्टीच जे काही बरे वाईट होईल ते धर्मादायच्या अधिकारातून होईल.

# प्रमोद महाजन यांची हत्या पैशाच्या हव्यासापोटी

## सारंगींच्या दाव्यानंतर प्रकाश महाजनांचा दावा

**मुंबई/प्रतिनिधी :** प्रकाश महाजन यांनी स्वर्गीय भाजप नेते प्रमोद महाजन यांच्या हत्येवरून सनसनाटी खुलासा केला आहे. प्रवीण महाजन आपल्या भावाला प्रमोद महाजन यांना केवळ पैशांसाठी ब्लॅकमेल करत होते. ज्या व्यक्तीच्या माध्यमातून हे ब्लॅकमेलिंग चालत होते ती व्यक्ती आजही जिवंत आहे, त्यामुळे त्याचे नाव घेत नाही, असे म्हणत सनसनाटी दावा केला. प्रमोद महाजन यांची हत्या ही फक्त पैशांच्या हव्यासातून आणि मत्सरातून झाल्याचे प्रकाश महाजन म्हणाले.

सारंगी महाजन यांनी गोपीनाथ मुंडेंच्या वारसावरून पंकजा मुंडे यांच्यावर बोचरी टीका करताना बिघडलेली मुलगी असा उल्लेख केला होता. धनंजय मुंडे यांच्यावरही तोफ डागली होती. यानंतर आता प्रकाश महाजन यांनी सारंगी महाजन यांच्यावर सडकून प्रहार करत त्यांना भूतकाळाची आठवण करून देत लाज वाटत नाही का? अशीही विचारणा केली आहे.प्रकाश महाजन म्हणाले की प्रमोद महाजन यांना ब्लॅकमेल केले जात होते. प्रवीण महाजनने भावाचे आयुष्य उद्ध्वस्त केले. प्रमोद राक्षस असला तरी त्याला गोळ्या घालायचा अधिकार कोण दिला? केवळ पैशांसाठी, लोभासाठी, आणि स्वार्थासाठी हा खून झाला. ठाण्यातील अनेक लोकांना याची माहिती आहे काही आजही जिवंत आहेत. ते पुढे म्हणाले, प्रवीण महाजन स्वतः काही काम करत नव्हता. नोकरीला जायचे नाही, कंपनीकडून पगार वाढ मागायचा, पैसे मागायचे एवढाच त्यांचा उद्योग होता. शेवटी जेव्हा मनुष्य एकटा पडतो, अपराधभाव आणि लोभ त्याला खातो तसेच झाले. त्याच्या मृत्यूचे खरे कारण हाच भूतकाळ होता.



**गोपीनाथ यांनी प्रवीणच्या विरोधात साक्ष दिली-**महाजन म्हणाले की गोपीनाथ मुंडे यांनी प्रवीण महाजन यांच्या विरोधात साक्ष दिली होती. त्या क्षणापासून एक वैर पेटले आणि आज जी बदनामी, हीच त्याच वैराची सावली आहे. ते पुढे म्हणाले की मुंडे साहेबांनी सारंगी आणि प्रवीण यांच्या नावावर विश्वास ठेवून जमीन घेतली होती. आज त्याच जमिनीवरून केस करून पंकजा मुंडेवर डाग लावले जात आहेत. केवळ महाजन हे आडनाव असल्यामुळे लोक गप्प आहेत, पण जर धनंजय आणि पंकजांनी आवाज उठवला, तर उद्या वकीलसुद्धा त्यांना मिळणे कठीण होईल.प्रकाश महाजन यांनी सारंगी महाजन यांच्यावर अत्यंत कठोर शब्दांत हल्ला चढवला. ते म्हणतात, सारंगीला वाटते पंकजा बिघडलेली आहे. पण तुम्ही परळीला जा आणि लोकांना विचारा, कोण बिघडलेले आहे ते कळेल. तुम्हाला रक्ताचे नातं नसू शकते, पण मला आहे. वडील गेल्यावर त्या मुलीवर किती संकटे आली हे मला ठाउक आहे आणि तुम्ही केवळ स्वार्थासाठी तिच्यावर बोट ठेवता? ते पुढे म्हणाले की तुम्हाला गोपीनाथ मुंडेंचा फोन गेल्यानंतर ऑस्ट्रेलियाचा व्हिसा मिळतो, तुम्हाला प्रमोद महाजनने सांगितल्यावर अमेरिकेचा व्हिसा मिळतो, त्यावेळी तुम्हाला प्रवीण महाजन, गोपीनाथ मुंडे चालत होते, त्यांच्या मुलाची बदनाम करताना थोडी सुद्धा तुम्हाला लाज वाटत नाही का? अशीही विचारणा त्यांनी सारंगी महाजन यांना केली. ते पुढे म्हणाले तुमचा नवरा काही काम करत नव्हता, तरीही फोंडा सारखा वकील तुम्हाला कसा परवडला? गावोगावी पुस्तके घेउन फिरता आणि इतरांच्या चरित्रावर चिखलफेक करता. ज्याची लाज वाटली पाहिजे त्याचाच अभिमान तुम्ही बाळगता. प्रवीण महाजन यांनी जर खरोखर पुस्तक छापले, तर त्यात स्वतःच्याही काही नग्न सत्यांचा फोटो ठेवायला हवा होता.

# महायुतीचे शेतकरी पॅकेज थोतांड

**मुंबई/प्रतिनिधी :**महायुती सरकारने राज्य दिवाळखोरीत काढले असल्याने त्यांच्याकडे योजनांसाठी पैसाच नाही. पंतप्रधान आवास योजनेसाठी पैसे नाहीत, लाडकी बहिण योजनेसाठी पैसे देउ शकत नाही. पंतप्रधान महाराष्ट्रात येणार म्हणून शेतक-यांना ३२ हजार कोटींचे पॅकेज जाहीर केले, हे पॅकेज फसवे आहे हे आम्ही आधीच सांगितले होते आता या पॅकेजचा फोलपणा समोर येत आहे. हे पॅकेज एक थोतांड आहे. शेतक-यांना सरसकट हेक्टरी ५० हजार रुपये द्यावे, रब्बी हंगामासाठी बियाणे व खते मोफत द्यावीत तसेच कर्जमाफी करावी. एक मुख्यमंत्री व दोन उपमुख्यमंत्री यांनी दिल्लीत जाउन राज्यासाठी विशेष पॅकेज आणावे, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे.



- काँग्रेसचा घणाघात,
- तात्काळ कर्जमाफीची मागणी
- फडणवीस सरकारने राज्य दिवाळखोरीत काढले
- प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांचा आरोप

प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, जैन बोर्डिंगची जमीन केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ गिळंकृत करु पहात होते पण हे प्रकरण चव्हाट्यावर आल्याने मुरलीधर मोहोळ यांना वाचवण्यासाठी तो व्यवहार रद्द करावा लागला आहे. परंतु, हा व्यवहार रद्द करून चालणार नाही, तर या व्यवहारात जे लोक सहभागी होते त्या सर्वांवर कारवाई झाली पाहिजे. जमीन हडप करण्याच्या कटात कोण कोण होते याचा पर्दाफाश झाला पाहिजे, असेही काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले. भाजपा ही वॉशिंग मशीन आहे.अजित पवार, छगन भुजबळ यांच्यासह अनेकांवर भाजपाने भ्रष्टाचाराचे आरोप केले होते पण त्यांनाच पक्षात व सत्तेत सहभागी करून पवित्र करुन टाकले आहे. फलटणच्या घटनेत माजी खासदाराचा उल्लेख होत असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना क्लिन चिट देणे म्हणजे त्यांचा या कटात सहभाग असल्याचा पुरावाच असल्याचेही हर्षवर्धन सपकाळ यांनी सांगितले. कायदा सुव्यवस्था वेशीवर टांगली गेली आहे त्यामुळे राज्याला किमान पूर्ण वेळ गृहमंत्री असणे गरजेचे आहे पण फडणवीस यांना गडचिरोलीतील खाणीत जास्त रस असून पंतप्रधानपदावर नजर असल्याने कायदा सुव्यवस्था, विकास व महिला सुरक्षा याच्याशी त्यांचा काहीही संबंध राहिलेला नाही, अशी टीका सपकाळ यांनी केली. फलटण उपजिल्हा रुग्णालयातील महिला डॉक्टरने केलेली आत्महत्या अत्यंत गंभीर व संवेदनशील आहे. राहुल गांधी यांनी त्याच अनुषंगाने आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. देवेंद्र फडणवीस हे कुचकामी गृहमंत्री ठरेल आहेत, त्यांच्या काळात महिला सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. तर दुसरीकडे फडणवीस यांच्या गृहमंत्रीपदाच्या काळात कोयता गँग, आका, खोक्या ही देणगी त्यांनी राज्याला दिली आहे.

# मराठी भाषा भवन रखडले, पण भाजप कार्यालयाची फाईल राफेलच्या वेगाने हलली

**मुंबई/प्रतिनिधी :**केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे सोमवारी मुंबई दौ-यावर आले असून त्यांच्या हस्ते दक्षिण मुंबईत महाराष्ट्र भाजपच्या नवीन कार्यालयाचे भूमिपूजन पार पडत आहे. यावरून शिवसेनेच्या (उबाठा) व राष्ट्रवादी काँग्रेसच्या(शरद पवार) नेत्यांनी सरकारवर आरोप केले आहेत. तसेच हे भाजपा कार्यालय बांधण्यासाठी जमीन बळकावल्याचा आरोपही केला आहे. शिवसेनेचे (उबाठा) खासदार संजय राउत म्हणाले मुंबईतले मराठी भाषा भवन रखडले आहे, अतिवृष्टीग्रस्त शेतक-यांच्या मदतीची फाईल सरकार दरबारी पडून आहे. मात्र, भाजप कार्यालयासाठी वेगाने सूत्र हलली.

संजय राउत म्हणाले मरीन लाइन्सला अद्याप मराठी भाषा भवन होउ शकलेले नाही. भूमिपूजन होउनही मराठी भाषा भवन अडकून पडले आहे. त्याकडे कोणाचेही लक्ष जात नाही. मात्र, आज केंद्रीय गृहमंत्री मुंबईत येउन भाजपच्या पंचतारांकित कार्यालयाचे भूमिपूजन करत आहेत. मराठवाड्यातील शेतक-यांच्या मदतीची फाईल अजून हलली नाही. दिवाळी झाली तरी शेतक-यांना मदत मिळाली नाही. मात्र, भाजपाच्या पंचतारांकित हेडक्वार्टरची फाईल राफेलच्या वेगाने हलली. हे सगळे इतक्या वेगाने कसे झाले याचे रहस्य त्याच जमिनीखाली दडले आहे. अमित शाह आज भूमिपूजन करत आहेत. त्यासाठी ते कुदळ मारतील तेव्हा हे रहस्य बाहेर येईल. दुस-या बाजूला या भाजपा कार्यालयाबाबत राष्ट्रवादीचे (शरद पवार) आमदार रोहित पवार म्हणाले, राज्यात जमीन घोटाळे जोमात असताना आज मुंबईत भूमिपूजन होत असलेल्या भाजप



## विरोधकांचा टोला

कार्यालयाच्या जागेबाबत देखील वेगवेगळ्या चर्चा चालू आहेत. सदरील जागा महाराष्ट्र हाउसिंग फायनान्स कॉर्पोरेशनची ९९ वर्षे लीजवर घेतलेली जागा असून इमारत धोकादायक आहे असे दाखवून ती ताब्यात घेउन पाडण्यात आली आणि त्या ठिकाणी भाजपा कार्यालयाचे भूमिपूजन होत असल्याची चर्चा आहे. आमदार रोहित पवार म्हणाले एकीकडे पुण्यातील जैन बोर्डिंग प्रकरणात मोठ्या प्रमाणात रोष असताना भाजपा कार्यालयाच्या जागेबाबतच चर्चा चालू असेल तर जनतेत चुकीचा संदेश जाउ शकतो, त्यामुळे भाजप नेत्यांनी यावर खुलासा करणे योग्य राहील.

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# एक लक्षवेधी निवाडा

अलीकडे न्यायालयात एक वेगळा खटला उभा राहिला आणि त्याचा निकाल महत्वपूर्ण ठरला. त्याची नोंद घेण्याची गरज आहे. शोभित कुमार मित्तल विरुद्ध उत्तर प्रदेश राज्य या खटल्यातील वैवाहिक वादावर सुनावणी करताना, भारतीय दंड संहितेच्या कलम ४९८अ (आता भारतीय दंड संहितेच्या कलम ८४, २०२३) च्या गैरवापरावर सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा एकदा चिंता व्यक्त केली. न्यायालयाने म्हटले आहे, की आजकाल सासू, म्हणजेच मुलाची आई आणि पती खोट्या तक्रारींमुळे त्यांच्या पर्नीपासून खूप सावध असतात. आम्ही अनेक तक्रारी फेटाळून लावल्या आहेत. आम्ही असे म्हणत नाही, की प्रत्येक केस खोटी आहे; परंतु कलम ४९८अ खूप कठोर आहे आणि त्याचा गैरवापर होण्याची शक्यता आहे. वर नमूद केलेल्या प्रकरणात एका महिलेने तिच्या लग्नाच्या दीड महिन्याच्या आत 'कलम ४९८ अ' अंतर्गत दाखल केलेल्या तक्रारीचा समावेश होता. न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना आणि आर. महादेवन यांच्या खंडपीठाने या खटल्याची सुनावणी करताना कुटुंबातील सर्व सदस्यांना वैवाहिक वादात अडकवण्याच्या प्रवृत्तीविरुद्ध इशारा दिला आणि म्हटले, की विशिष्ट तपशिलाशिवाय छळाचे केवळ सामान्य आरोप कोणत्याही व्यक्तीविरुद्ध फौजदारी कारवाई सुरू करण्यासाठी पुरेसे नाहीत. याच काळात, पूजा रासने विरुद्ध दिल्ली राज्य आणि इतर या खटल्याची सुनावणी करताना दिल्ली उच्च न्यायालयाने म्हटले, की भारतीय दंडसंहितेचे कलम ४९८अ महिलांना वैवाहिक क्रूरता आणि हुंड्याच्या छळापासून संरक्षण देण्यासाठी महत्वाचे असले, तरी पतीच्या नातेवाइकांविरुद्ध व्यापक आणि निराधार आरोपांद्वारे केला जाणारा त्याचा गैरवापर रोखला पाहिजे. आरोप प्रथमदर्शनी सिद्ध झाले, तरच खटला पुढे चालू ठेवला पाहिजे. असा दृष्टिकोन निष्पाप व्यक्तींना अनावश्यक खटल्यांपासून आणि वैवाहिक वादांमुळे होणाऱ्या त्रास, छळ आणि अपमानापासून संरक्षण देतो. मे २०२४ मध्ये न्यायमूर्ती जे. बी. पार्डीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या खंडपीठाने संसदेला भारतीय दंड संहिता, २०२३ च्या कलम ८५ आणि ८६ मध्ये सुधारणा करण्याचा विचार करण्याचे आवाहन केले. खंडपीठाने म्हटले, की या तरतुदी केवळ भारतीय दंड संहितेच्या कलम ४९८अ आणि त्याच्या अर्थ लावण्याच्या प्रक्रियेची प्रतिकृती आहेत. २०१० मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती दलवीर भंडारी आणि जे. एस. राधाकृष्णन यांच्या खंडपीठाने सरकारला भारतीय दंड संहितेच्या कलम ४९८अ, हुंडाविरोधी कायद्याचा पुनर्विचार करण्याचे आवाहन केले होते. कलम ४९८अ अंतर्गत खोट्या तक्रारींच्या वाढत्या संख्येबद्दल चिंता व्यक्त करताना खंडपीठाने म्हटले, की कलम ४९८अ अंतर्गत प्राप्त होणाऱ्या मोठ्या संख्येने केलेल्या तक्रारी खऱ्या नाहीत आणि त्या गुप्त हेतूने दाखल केल्या जातात. लोकांचे मत विचारात घेऊन कायदेमंडळाने यथा मुद्याकडे लक्ष देण्याची आणि कायद्यात योग्य बदल करण्याची वेळ आली आहे. न्यायालयाने ही प्रक्रिया सुरू करण्यासाठी केंद्रीय कायदा मंत्र्यांना निर्णयाची प्रत पाठवली. महिला मूक, पीडित आणि चुकीचे काम करण्यास असमर्थ असतात, या समजुतीचा न्याय प्रशासनावर प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष परिणाम झाला आहे; परंतु सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाला १५ वर्षे उलटूनही कलम ४९८अ च्या तरतुदींमध्ये कोणतेही बदल झालेले नाहीत. या संदर्भात, २२ जुलै रोजी शिवांगी बन्सल प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय महत्त्वाचा आहे. २०२२ मध्ये मुकेश बन्सल विरुद्ध उत्तर प्रदेश राज्य प्रकरणात अलाहाबाद उच न्यायालयाने जारी केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे सर्वोच्च न्यायालयाने समर्थन केले. उच्च न्यायालयाने हंड्यासाठी छळाच्या प्रकरणांमध्ये पोलीस तत्काळ अटक करणार नाहीत, तसेच दोन महिन्यांचा कूलिंग ऑफ कालावधी असेल, ज्या दरम्यान तोडगा काढता येईल आणि पोलीस आरोपांची पडताळणी करू शकतील, असे म्हटले. हे लक्षात घेण्यासारखे आहे, की हा निर्णय अचानक आलेला नाही. अशा अनेक प्रकरणांमध्ये, न्यायालये कायद्याचा गैरवापर लक्षात घेऊन तरतुदी देत आहेत. २०१४ मध्ये, अर्नेशकुमार विरुद्ध बिहार प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते, की अशी तक्रार मिळाल्यावर, पोलीस आरोपीला ताबडतोब अटक करणार नाहीतः परंतु प्रथम फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४१ (१) (बी) (२) अंतर्गत अटक आवश्यक आहे याची खात्री करून घेतली जाईल. यासाठी कारणे आणि पुरावे द्यावे लागतील. या पुराव्यासह एक चेकलिस्ट न्यायिक दंडाधिकाऱ्यांना सादर करावी लागेल. राजेश शर्मा विरुद्ध उत्तर प्रदेश राज्य प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने जिल्हा पातळीवर कुटुंब कल्याण समिती स्थापन करण्याचे निर्देश दिले. समितीकडे तक्रारी पाठवल्या जातील आणि त्यांच्या अहवालाशिवाय कोणालाही अटक केली जाणार नाही, असेही म्हटले. तथापि, २०१८ मध्ये 'सोशल क्शन फोरम फॉर ह्यूमन राइट्स' विरुद्ध 'यूनियन ऑफ इंडिया' या प्रकरणात, सर्वोच्च न्यायालयाच्या तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने सर्व प्रकरणे समितीकडे पाठवण्याचा आदेश मागे घेतला. २०१४ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने एका निकालात स्पष्टपणे म्हटले, की पत्ती आणि त्याच्या इतर नातेवाइकांविरुद्ध अस्पष्ट आणि सामान्य आरोपांवर आधारित खटला दाखल केला जाऊ शकत नाही. त्यासाठी ठोस पुराव्यांसह विशिष्ट आरोपांची आवश्यकता आहे. सर्वोच्च न्यायालयाने असेही म्हटले होते, की न्यायालयांनी वैयक्तिक द्वेषाचा फायदा घेण्यासाठी किंवा निष्पाप नातेवाइकांना त्रास देण्यासाठी कायद्याचा गैरवापर केला जाणार नाही, याची खात्री करावी. एखाद्या दंडाधिकाऱ्याने अटकेचे कारण न नोंदवता न्यायालयीन कोठडी वाढवल्यास त्याच्याविरुद्ध विभागीय कारवाई करावी. न्यायालयाची चिंता वैध आहे; परंतु या निर्णयात अनेक विरोधाभासही आहेत, कारण न्यायालयाचे निर्णय अनेकदा एकमेकांच्या विरोधात असतात. कोणत्याही कायद्याचा गैरवापर रोखणे आवश्यक आहे. यासाठी खोटे खटले दाखल करणाऱ्यांवर खटला चालवला पाहिजे आणि शिक्षा झाली पाहिजे. विडंबन म्हणजे महिलांच्या संरक्षणासाठी बनवलेल्या कायद्याला बहुतेकदा महिलांच बळी पडतात. प्रत्येक प्रकरणात दोन महिन्यांचा कूलिंग-ऑफ कालावधी योग्य आहे का, हे देखील विचारात घेण्यासारखे आहे. हे लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे की प्रत्येक आरोप खोटा नसतो. जिथे खरा छळ होत असेल, तिथे दोन महिन्यांचा कालावधी देणे पीडितेच्या अधिकाराविरुद्ध जाऊ शकते.

# कायद्याचे राक्षसी कलम

**आवश्यक वस्तू कायदा हे सरकारच्या हातातील असे शस्त्र आहे, की जे वापरून सरकार शेतकऱ्यांना सहज नामोहरम करू शकते. बिन दिक्कत गळा कापू शकते. या कायद्याचा वापर सरकारने वारंवार केला आहे. त्यामुळेच शेतकऱ्यांना वाजवी भाव मिळू शकला नाही. शेतकऱ्यांच्या पिढ्या नासवण्याचे काम या कायद्याने केले आहे.**

आवश्यक वस्तू अध्यादेश इंग्रज सरकारच्या काळात लागू करण्यात आला होता. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर देखील आपल्या सरकारने तो अध्यादेश कायम ठेवला. या अध्यादेशाचे कायद्यात रूपांतर करण्यासाठी घटनादुरुस्ती करण्यात आली होती. पुढे देशात आणीबाणी लागू असताना हा कायदा परिशिष्ट ९ मध्ये टाकण्यात आला. म्हणजे या बाबत न्यायबंदी लावण्यात आली. आर आय कोईल्हो यांनी २००७ साली दिलेल्या निकालाने न्यायालयात दाद मागण्याचे दार किंचित किलकिले झाले आहे.हा कायदा किती भयानक आहे, हे या कायद्याच्या कलम तीन वरून कोणाच्याही लक्षात येईल.

**राक्षसी तरतुदी**

(३) उपकलम (२) अंतर्गत जारी केलेल्या कोणत्याही अधिसूचनेद्वारे, त्या अनुसूचीतील संबंधित आवश्यक वस्तूविरुद्ध अशी नोंद करण्याचे निर्देश दिले जाऊ शकतात की, ती वस्तू त्या अधिसूचनेत नमूद केलेल्या कालावधीपुरती, जो कोणत्याही परिस्थितीत सहा महिन्यांपेक्षा जास्त असू नये, आवश्यक वस्तू मानली जाईल: तथापि, केंद्र सरकार सार्वजनिक हितासाठी आणि नमूद करावयाच्या कारणांसाठी, राजपत्रात अधिसूचना करून, त्या ङकालावधीस सहा महिन्यांपेक्षा पुढेही वाढ देऊ शकते.(४) केंद्र सरकार घटनापत्राच्या सातव्या अनुसूचीतल्या समवर्ती यादीतील(यादी- ३, प्रविष्टी क्र. ३३) नुसार, संसदेला कायदा करण्याचा अधिकार असलेल्या कोणत्याही वस्तूबाबत उपकलम (२) मधील अधिकारांचा उपयोग करू शकते.(५) उपकलम (२) अंतर्गत जारी केलेली प्रत्येक अधिसूचना, शक्य तितक्या लवकर, दोन्ही सभागृहांच्या पटलावर ठेवण्यात येईल.

**आवश्यक वस्तूंच्या उत्पादन, पुरवठा, वितरण इत्यादींच्या नियंत्रणाबाबत अधिकार**

(१) जर केंद्र सरकारच्या मताने एखाद्या आवश्यक वस्तूचा पुरवठा कायम ठेवणे किंवा वाढवणे, किंवा तिचे न्याय्य किमतीत व समप्रमाणात वितरण व उपलब्धता सुनिश्चित करणे आवश्यक अथवा योग्य ठरते, डकिंवा भारताच्या संरक्षणासाठी किंवा लष्करी कार्यक्षमता प्रभावी ठेवण्यासाठी कोणतीही आवश्यक वस्तू सुरक्षित करणे आवश्यक असल्यास, केंद्र सरकार आदेशाद्वारे त्या वस्तूंच्या उत्पादन, पुरवठा, वितरण तसेच त्या संबंधातील व्यापार व वाणिज्यावर नियंत्रण किंवा प्रतिबंध लागू करू शकते.

(२) उपकलम (१) मध्ये प्रदान केलेल्या अधिकारांच्या सर्वसाधारणतेवर मर्यादा न आणता, त्या अंतर्गत करण्यात आलेल्या आदेशामध्ये खालील तरतुदी आहेत. कोणत्याही आवश्यक वस्तूच्या उत्पादन किंवा निर्मितीवर परवाने, परमीट्स किंवा अन्य मार्गांनी नियंत्रण; कोणतीही पडिक अथवा शेतीयोग्य जमीन, ती इमारतीला लागून असो वा नसो, यावर सर्वसाधारणपणे किंवा निर्दिष्ट अन्नपिकांची लागवड करणे, आणि अशा पिकांच्या लागवडीचे जतन किंवा वाढ करणे;

**आवश्यक वस्तू कोणत्या किमतीत खरेदी किंवा विक्री केली जाईल यावर नियंत्रण;**

कोणत्याही आवश्यक वस्तूचा साठा, वाहतूक, वितरण, विल्हेवाट, खरेदी, वापर किंवा उपभोग यांचे परवाने, परमीट्स किंवा अन्य मार्गांनी नियमन; विक्रीसाठी सामान्यतः ठेवली जाणारी कोणतीही आवश्यक वस्तू विक्रीपासून रोखणे. मनाई करणे;कोणत्याही आवश्यक वस्तूचा साठा धारण करणाऱ्या किंवा तिच्या उत्पादन, खरेदी-विक्री व्यवसायात गुंतलेल्या व्यक्तींना ? त्याच्याकडे साठ्यात असलेली किंवा त्याने उत्पादित/प्राप्त केलेली संपूर्ण किंवा निर्दिष्ट मात्रा विकण्याचे; किंवा ज्याची उत्पादने किंवा प्राप्ती होण्याची शक्यता आहे, ती संपूर्ण किंवा निर्दिष्ट मात्रा प्राप्त झाल्यावर विकण्याचे निर्देश, केंद्र सरकार, राज्य सरकार किंवा त्यांचे अधिकारी/प्रतिनिधी, किंवा अशा सरकारी नियंत्रित/मालकीच्या संस्थेला किंवा आदेशात निर्दिष्ट केलेल्या इतर कोणत्याही व्यक्तीस/वर्गास, वा निर्दिष्ट परिस्थितीत.

स्पष्टीकरण १: या कलमान्वये अन्नधान्ये, खाद्यतेल बियाणे किंवा खाद्यतेल यांसंबंधी आदेश करताना, त्या क्षेत्रातील संभाव्य उत्पादनाचा विचार करून, उत्पादकाने विकायची मात्रा ठरवली जाऊ शकते, तसेच उत्पादकाकडे असलेल्या अथवा त्याच्या लागवडीखाली असलेल्या क्षेत्रफळाच्या आधारावर ग्रेडनिहाय मात्रा निश्चित केली जाऊ शकते.

स्पष्टीकरण २: या कलमान्वये 'अन्नधान्ये' या अभिव्यक्तीचा अर्थ व त्यात तांदूळ, गहू, मैदा, तांदूळ/गव्हाचे पीठ, विविध धान्ये, कडधान्ये यांचा समावेश होतो.

कोणत्याही आवश्यक वस्तूच्या उत्पादन, पुरवठा किंवा वितरणात गुंतलेल्या, अथवा त्या संदर्भातील व्यापार किंवा वाणिज्य करणाऱ्या व्यक्तींना, त्यांच्या व्यवसायासंबंधी अशी पुस्तके, हिशेब व नोंदी राखण्याचा व तपासणीसाठी सादर करण्याचा, आणि आदेशाने निर्दिष्ट केलेली माहिती पुरवण्याचा निर्देश; परवाने, परमीट्स किंवा इतर कागदपत्रे देण्याबाबत तरतूद करणे व त्यासाठी शुल्क आकारणे; तसेच आदेशात नमूद केल्याप्रमाणे अशा कागदपत्रांच्या अटींचे पालन सुनिश्चित करण्यासाठी सिक्युरिटी जमा करणे, अटींचे उल्लंघन झाल्यास संपूर्ण किंवा काही रक्कम जप्त करणे, आणि अशा जप्तीबाबत निर्दिष्ट प्राधिकरणाकडून निर्णय घेणे; कोणत्याही गौण किंवा पूरक बाबींबाबत तरतूद; विशेषत: खालील बाबींबाबत: अधिकृत व्यक्तीस इमारती, विमान, जहाज, वाहन, अन्य प्रवासी साधन किंवा पाळीव प्राण्यांमध्ये प्रवेश, तपासणी किंवा तपशील पाहणी करण्याचा अधिकार; अशा वस्तूंचा जप्तीचा अधिकार — ज्याबाबत त्या अधिकृत व्यक्तीस असा विश्वास असेल की आदेशाचे उल्लंघन झाले आहे/होत आहे/होणार आहे; आणि त्या वस्तूंसह आढळणारी पॅकेजिंग/डबे/पात्रे; अशा विमान, जहाज, वाहन किंवा प्राण्यांचा जप्ती अधिकार, जर अधिकृत व्यक्तीस असा विश्वास असेल की ते या कायद्यांतर्गत जप्तीस पात्र आहेत; अशा हिशेबवही व कागदपत्रांचा जप्ती अधिकार — जे या कायद्यावरील कोणत्याही कार्यवाहीस उपयुक्त/संदर्भीय असू शकतात; आणि अशा दस्तऐवजांच्या मालकास अधिकृत अधिकाऱ्याच्या उपस्थितीत त्यांची प्रत अथवा उतारा घेण्याचा अधिकार;

नियंत्रणासाठी इतर तरतुदी (उपकलम 3A)

(3A) या कायद्यांतर्गत आदेशाव्दारे विक्री केलेल्या कोणत्याही आवश्यक वस्तूची किंमत सरकार निश्चित करू शकते, आणि त्या ठरविलेल्या किंमतीनुसारच पैसे दिले जातील.

(हा अधिकृत शासकीय अनुवाद नाही.)

या कायद्याने शेतकऱ्यांना विकलाग केले. हा कायदा व्यक्ती स्वातंत्र्य, व्यावसाय स्वातंत्र्य आणि जगण्याचे स्वातंत्र्य हिरावून घेतो. आवश्यक वस्तू कायदा तात्काळ रद्द करण्यात यावा.



**अमर हबीब**

## 'मिले सूर मेरा तुम्हारा' चे रचनाकार अनंतात विलिन

भारतीय जाहिरात विश्वातील प्रभावशाली आणि सर्जनशील व्यक्तिमत्व असलेल्या पद्मश्री पुरस्कार विजेते पीयूष पांडे यांचे ७० व्या. वर्षी निधन झाले देशांतील जाहिरातींना एक वेगळेपण प्रदान करण्यात पांडे यांचे महत्वाचे योगदान होते ओगिल्वी इंडियामध्ये त्यांनी ४० वर्षाहून अधिक काळ काम केले होते तरुणपणी सुरुवातीला क्रिकेटपटू, टी टेस्टर आणि बांधकाम मजूर म्हणून काम केले पांडे यांनी १९८२ साली ओगिल्वी कंपनीत प्रवेश केला २७ व्या. वर्षी जाहिरात क्षेत्रात पदार्पण करत इंग्रजीचा दबदबा असलेल्या या क्षेत्रात पांडे यांनी आपल्या लेखणीने स्वतःचे वर्चस्व प्रस्थापित केले त्यांनी जाहिरातींना दिलेले शब्द भारतीय लोकांना कायमचे लक्षात राहणार आहेत एशियन पेंट्ससाठी हर खुशी में रंग लाये, कॅडबरीसाठी कुछ खास है, ठंडा मतलब कोका कोला, फेविकॉल, हमारा बजाज या टॅग लाईनचे जनक आणि हचसाठी पग श्वांनाचे कॅम्पेन अशा कितीतरी उत्पादनांना कायम लक्षात राहतील अशा जाहिराती पीयूष पांडे यांनी दिल्या त्यांचा जन्म १९५५ साली जयपूर येथे झाला पांडे यांचे बंधू प्रसून प्रसिद्ध दिग्दर्शक असून बहिण ईला अरुण गायिका आणि अभिनेत्री आहेत अत्यंत मोजक्या शब्दांत, नेमका संदेश पोहचविण्यात त्यांचा हातखंडा होता त्यामुळे शब्दांचा किमयागार म्हणून देखिल ते पुढे आले होते मिले सुर मेरा तुम्हारा हे गाजलेले गित ही त्यांनीच लिहिले आहे. त्यांच्या जाण्याने एका जाहिरात क्षेत्रातील गुरुला आपण मुकल्याची भावना वक्त होत आहे.

**राजू जाधव,**
मांगूर जि. बेळगांव

## देश सेवेची शतक महोत्सवी वाटचाल

१९२५ विजयादशमी या दिवशी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना नागपूर येथे झाली. राष्ट्रप्रेम, देशहित, धर्म, संस्कार, नीतिमत्ता, माणुसकी ही मूल्य जपणाऱ्या स्वयंसेवक यांनी एकत्र येऊन ही संस्था सुरू केली कोणताही राजकीय फायदा किंवा आर्थिक फायदा होण्यासाठी म्हणून ही संस्था निर्माण झाली नसल्याने ती नोंदणीकृत नाही आहे.ही नोंदणीकृत संस्था नसल्याने त्यावेळेच्या सरकार ने राष्ट्र ध्वज लावण्यास बंदी घातली होती. ह्यावरून संघाला वेळोवेळी लक्ष केले जात होते आणि होत आहे. जातपात, धर्म, पंथ, भाषा, प्रांत, लिंग यांच्या भेद न करता, अस्मानी आणि सुलतानी संकटात तत्परतेने धावून जाणारे आणि मदत करणारे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक असतात. ह्या सत्कार्माशी काडीचाही संबंध नसलेले पण सत्तेच्या हव्यासापाट पोटी काँग्रेसने राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर बंदी घालण्याचा प्रस्ताव व कारवाई अनेक वेळा केली आहे पण त्यांच्या हाती काहीच लागलं नाही. ब्राह्मणी संघटना म्हणून त्याचा अपप्रचार करून संघाला बदनाम करण्याचा प्रयत्न केला गेला. सत्तेसाठी सर्व नीतिमत्ता विसरून संघ विरोधी काँग्रेसी विचार धारेला अनेक राजकीय पक्षांनी पाठिंबा देऊन त्यांच्या हो ला हो म्हणत राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर बंदी घालण्याची मागणी जोर धरू लागली आहे. संविधानावर विश्वास असतांना परवानगी नसतांना मोर्चा काढून गैर कृत्य करतांना पाहून खूप दुःख झाले. संघावर बंदी या आधीही घातली गेली होती या सर्वांच्यावर न्यायालयीन कारवाईत आर. एस. एस. तावून सुलाखून निघाला आहे. काँग्रेस ने संघावर १९४८ रोजी पहिली बंदी घातली होती त्यावेळी ही नोंदणीकृत संस्था नाही हे कारण देण्यात आले होते पण सर्वोच्च न्यायालयाच्या निकालात ही संस्था सामाजिक सांस्कृतिक स्वयंसेवी संस्था असल्याचे नमूद केले. ही संस्था म्हणजे स्वयंसेवक एकत्र येऊन काम करतात. २६ / ११ च्या मुंबई हल्ल्यात, मालेगाव बॉम्बस्फोट तसेच इतर अनेक हल्ल्यात आर.एस.एस.चा हात असल्याचे सरकारने सांगितले होते पण ठोस पुरावा नसल्याने ते काही टिकू शकले नाही. मुंबई हल्ल्याच्यावेळी हवालदार ओगळे यांनी जीवाची बाजी लावून कसाब सारख्या आतंकवाद्याला पकडून या हल्ल्यामागे कोण आहे हे जगासमोर आणले. भगवा आतंकवाद या फेक नेरिटीच्या आधारे वेळोवेळी संघाला बदनाम करण्याचं काम करत येत आहे. संघाच्या कार्यपद्धतीवर त्यांच्या संस्कृती पालनावर, त्यांच्या गणवेशावर वेळोवेळी टीका करण्यात आली आहे. या सर्वापेक्षा संघ स्वयंसेवक करत असलेली मदत ही किती मोठी आहे याचा देखील विचार करत नाही. अतिशय शिस्तप्रिय, नैतिकता आणि सत्कर्म करणारे स्वयंसेवक यामुळे विचलित होत नाही व आपले कार्य निष्ठेने करत राहतात हेच त्यांचं यश आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ स्थापन झाल्यानंतर त्याच्यासारखी एकही संस्था गेल्या शंभर वर्षात निर्माण झाली नाही किंवा वाढली नाही हे संघाचं खूप मोठं यश आहे. विरोध करणाऱ्यांनी हाही मुद्दा लक्षात घ्यायला पाहिजे. संघाचे विचार, संस्कार हे पिढी दर पिढी पुढे चालत आले आहे. त्या वाटचालीला आज १०० वर्ष पूर्ण झाले आहे. कोणी कितीही विरोध केला तरी स्वयंसेवकांचे मनोधैर्य कधीच खचणार नाही शंभर वर्ष काय अनेक शतके संघ राहणार आहे.

**लीना मकरंद गाडगीळ**
पनवेल

## अरेरे! पुन्हा पुन्हा तेच तेच!

तीनच दिवसांपूर्वी ओडिशातील पुरी जिल्ह्यातील जनकदेईपूर रेल्वे स्थानकाजवळ रेल्वे रुळांवर विश्वजीत साहू नावाच्या १५ वर्षीय मुलाचा 'रील' बनवत असताना ट्रेनच्या जोरदार धडकेत जागीच मृत्यू झाला. मन विषण्ण करणारी ही घटना ताजी असतानाच आता जळगावच्या पाळधी गावातील रेल्वे रुळावर रील तयार करताना हर्षवर्धन नन्नवरे आणि प्रशांत खैरनार या दोन १८ वर्षीय तरुणांचा रेल्वेच्या धडकेत मृत्यू झाल्याची मन हेलावून टाकणारी घटना समोर आली आहे. वास्तविक सोशल मीडियावरच्या विविध प्लॅटफॉर्मवर अधिकाधिक लाईक्स आणि कमेंट मिळविण्यासाठी तरुणाईला चित्रविचित्र रील बनवण्याचे वेड लागले असून या वेडापायी यापूर्वीही अनेकांनी रीलसाठी धोकादायक स्टंट करताना आपला जीव गमावले आहेत. त्यातही रेल्वे रुळांवर रीलसाठी जीव गमावणाऱ्यांची संख्या अधिक आहे. असे म्हणतात की रस्त्यातून चालताना पुढच्याला ठेच लागली की मागचा शहाणा होतो. पण ही म्हण बेभान होऊन रील बनवणाऱ्या या कोवळ्या मुलांना लागू होत नाही असेच या प्रकारच्या पुन्हा पुन्हा होणाऱ्या घटनांवरून वाटत राहते. रील बनवण्याच्या या वाढत्या नादामुळे स्वतःला मृत्यूच्या दारात लोटणाऱ्या आणि समाजमन सुन्न करणाऱ्या या घटना केव्हा आणि कशा थांबणार आहेत हाच खरा प्रश्न आहे.

**प्रदीप अनुसया शंकर मोरे**

## हे वेगळेपण कशासाठी ?

भारताने पंथनिरपेक्ष शासनप्रणालीचा अवलंब केल्याने या ठिकाणी अनेक पंथ वर्षोनुवर्षे गुण्यागोविंदाने नांदत आहेत, त्यांचे सण, उत्सव आनंदाने साजरे करत आहेत. भारतात सर्व पंथीयांना कायद्याचे संरक्षण आहे, प्रत्येकाला धर्मस्वातंत्र्य आहे; मात्र कायद्यासमोर सर्व समान आहेत. असे असताना मुस्लिमांना त्यांचे वेगळेपण जपण्यास सरकारच साहाय्य करत असल्याचे दिसून येत आहे. साल २०११ मध्ये झालेल्या जनगणनेनुसार उर्दू भाषिकांची संख्या १ लाख २५ हजारापेक्षा अधिक असलेल्या ठिकाणी 'उर्दू घर' उभारण्याची योजना साल २०२२ साली सरकारच्या अल्पसंख्यांक विभागाने आणली आहे. ज्यानुसार ठाण्यातील भिवंडी विभागात सरकारी खर्चाने उर्दू घर उभारण्यात येणार आहे. उर्दू घरासाठी लागणारा २५०० चौरसमीटरचा भूखंड ठाणे जिल्हाधिकाऱ्यांनी नुकताच अल्पसंख्यांक विभागाच्या ताब्यात दिला आहे. या ठिकाणी उर्दू घर उभारण्यासाठी पुरेसा निधी देण्याचे आश्वासन राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहे त्यामुळे लवकरच भिवंडी परिसरात सरकारी खर्चातून भव्य असे उर्दू घर उभारले जाणार आहे. कायद्यासमोर सर्व धर्म समान असताना अल्पसंख्यकांसाठी आज स्वतंत्र कायदे आहेत, स्वतंत्र आयोग आहे, आरक्षण आहे. आता तर सरकार ठिकठिकाणी उर्दू घरेही उभारणार आहे. या सर्वांतून सरकार कुठेतरी बहुसंख्यांक हिंदूंवर अन्याय करत असल्याची भावना आज व्यक्त केली जात आहे. आज उर्दू घरे उभारली जात आहेत उद्या इसाई घरे उभारली जातील. अन्य पंथीयही यासाठी आंदोलने करतील. आजमितीला राज्यात गावोगावी तर शहरात गल्लीबोळांत मशिदी उभारण्यात आल्या आहेत. मदरसे आहेत असे असताना आणखी उर्दू घर कशासाठी ? भाषिक तत्वावर अशा वास्तू उभारल्या जाणार असतील तर १ लाख २५ हजारापेक्षा अधिक हिंदूंची संख्या असलेल्या ठिकाणी हिंदूंसाठी संस्कृत भवन का उभारले जात नाही. सरकार एकीकडे शाळा महाविद्यालयांतून विद्यार्थ्यांना सर्व धर्म समानतेची शिकवण देते आणि वर्तणुकीतून मात्र बहुसंख्यांकांना सापत्न वागणूक देते अशी चर्चा यानिमित्ताने केली जात आहे.

**जगन घाणेकर,**
घाटकोपर, मुंबई

## फलटणच्या घटनेने गृहखात्याची अब्रू वेशीवर

सातारा जिल्ह्याच्या फलटणमधील उपजिल्हा रुग्णालयात कार्यरत असलेल्या महिला डॉक्टरने पोलिसांच्या बलात्कार आणि मानसिक छळाला कंटाळून आत्महत्या केल्याचे नुकताच उघडकीस आल्याचे वृत्त आहे. या घटनेमुळे संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडाली असून गृहखात्याची अब्रू वेशीवर टांगली गेली आहे. या प्रकारामुळे पुन्हा एकदा कायदा व सुव्यवस्थेचा बोजवारा उडाल्याचे समोर आले आहे महिलांच्या बाबतीत आशा घटना घडल्या तर त्यांनी नोकरी करायची की नाही हा देखिल प्रश्न उपस्थित केला जात आहे. कुंपणचं जर शेतं खात असेल तर सर्वसामान्यांचे काय ? विश्वास कोणावर ठेवायचा खाकी वर्दीतील गुंडांच्या मुसक्या आवळल्या पाहिजेत यातील गुन्हेगारांना फाशीच्या तख्तावर पोहचिवण्यासाठी गृहखात्याने सर्वतोपरी प्रयत्न केले पाहिजेत पोस्टमार्टम रिपोर्ट बदलण्यासंदर्भात आणि फिटनेस प्रमाणपत्र देण्यासाठी राजकीय दबावातून पोलीसांनी महिला डॉक्टरांचा छळ केल्याचे त्यांच्या कुटुंबीयांनी आरोप केल्याचे बोलले जात आहे. सबळ पुराव्यांअभावी यातील गुन्हेगार सहिसलामत सुटतात आणि पुन्हा समाजात उजळमाथ्याने फिरुन असले गुन्हे करण्यास तयार होतात त्यामुळे मयत व्यक्तींना न्याय मिळत नसल्याचे यापुर्वी देखिल घडलेल्या घटनेवरुन अधोरेखित झाले आहे पण आताची घटना गंभीर आणि सरकारच्या अखत्यारीतील आहे त्यामुळे सरकारचा कस लागणार आहे सदरक्षणाय खलनिग्रहनाय हि टॅग लाईन घेवून महाराष्ट्रातील पोलीस दल कार्यरत आहे. सज्जनांचे रक्षण आणि दुर्जनांचा नाश करणे हे पोलिसांचे कर्तव्य आहे.

पण सद्या या दलात उलटच घडत आहे गुंड, मवाली, बलात्कारी अशा दुर्जन प्रवृत्तींना मोकाट सोडून सज्जनांना त्रास देण्याची प्रवृत्ती बळावत आहे त्यामुळे महाराष्ट्र पोलिसांची प्रतिमा मलिन झाल्याचे पाहायला मिळत आहे वेळीच अशा खाकी वर्दीतील नराधमांच्या मुसक्या आवळल्या पाहिजेत तरचं यासारख्या घटनेवर आळा बसेल.


**राजू जाधव**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# पुसद नगर परिषदेने टाकलेल्या दगड मीक्स मुरुममुळे नागरिक व विद्यार्थ्यांना मनस्ताप

## स्थापत्य नगर अभियंता अचमारे यांची कंत्राटदारासोबत मिली भगत का?

जनमाध्यम प्रतिनिधी



पुसद - पुसद नगर परिषद अंतर्गत प्रभाग क्रमांक १४ मधील विदर्भ लोकनेते स्व. गोदाजीराव उर्फ बाबासाहेब मुखरे यांच्या हवेली समोर तसेच माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या नवीन पुसद येतील जुन्या बंगल्यावर जवळ डांबरी रोड मध्ये पडलेल्या खड्ड्यामध्ये मुरूम ऐवजी मोठमोठाले दगड टाकून खड्डा बुजवल्यामुळे ये-जा करणाऱ्या नागरिकांना व शाळेत जाणाऱ्या विद्यार्थियांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

सविस्तर वृत्त असे की पुसद नगर परिषदेने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी पावसाळ्यामध्ये संपूर्ण नगरपरिषद अंतर्गत असलेल्या प्रभागातील डांबरीकरण रोडमध्ये पडलेल्या खड्ड्यांमध्ये मुरूम पुरवठा करण्यासाठी कंत्राट दिला आहे, हा कंत्राट पुसद येथील कंत्राटदारांना डावलुन मंगरूळपीर येथील कंत्राटदार नामे-सागर वासुदेवराव धोटे रा.मंगरुळपिर जि.वाशिम यांना दिनांक २८/०३/२०२५ रोजी (४०,०००००) चाळीस लाख रुपयाचा कंत्राट हा ३३,७००% कमी दराने (१२-बारा) महिन्यासाठी नगरपरिषद प्रभागातील अनेक डांबरीकर रोडवर पडलेले खड्डे हे बुजविण्याकरिता देण्यात आलेला आहे.

परंतु हे कंत्राटदार नगर अभियंता आचमारे यांचे आशीर्वादाने थातूर-मतूर बारीक मुरूम टाकण्याऐवजी मोठमोठाले दगड मीक्स असलेला मुरूम टाकून नगरातील नागरिकांची गैरसोय तथा शारीरिक हाल करून विद्यार्थ्यांची परेशानी करत आहे, हे बुजवण्यात आलेले खड्डे यामध्ये स्व.बाबासाहेब उर्फ गोदाजीराव मुखरे यांच्या हवेली समोरील कोषटवार शाळेचा रोड तसेच बोरगडी कडे जाणारा रविराज नगर पुलाजवळील रोड येथील टाकलेला मुरूम सर्व पाण्याने वाहून गेला आहे, तसेच भीमवाडी परिसर, देशमुख नगर, सेवालाल चौक, महावीर नगर, स्टेट बँक परिसर नवीन पुसद, आंबेडकर वार्ड, वसंत नगर, गांधी नगर, शंकर नगर, मोती नगर, वासवी नगर, ईटावा वार्ड या ठिकाणी मुरूम टाकण्यासाठी ठेका देण्यात आला आहे.परंतु नगरपरिषद मधील स्थापत्य नगर अभियंता अचमारे यांचे कामावर दुर्लक्ष असून कंत्राटदार सोबत मिली भगत असल्याचे नागरिकांमध्ये बोलल्या जात आहे. नगर अभियंता शुभम अचमारे हे नगरपरिषद येथे कार्यरत झाले तेव्हापासून एकही काम व्यवस्थित झालेले नाही उलट त्यांचे होत असलेल्या कामावर दुर्लक्ष करत असल्यामुळे नागरिकांचे व विद्यार्थ्यांचे हाल होत आहे व त्यांना शारीरिक मनस्ताप सुद्धा सहन करावा लागत आहे.

अशी नागरिकानी खंत व्यक्त केली आहे की आम्ही नगर परिषदेला रोड, नाली, आणि पाण्याचा टॅक्स भरतो परंतु आम्हाला त्याबदल्यात उत्तम सुविधा दिल्या जात नाही किंवा मिळत नाही त्यामुळे या विषयाकडे जिल्हाधिकारी यवतमाळ यांनी लक्ष घालून पुसद नगर वासीयांचे व विद्यार्थ्यांचे होत असलेले हाल थांबवावे अशी पुसद शहरातील नागरिकांची मागणी आता जोर धरु लागली आहे.



# माजी प्राध्यापक नयनाताई सोलंकी (भगत) यांचे निधन

जनमाध्यम प्रतिनिधी

राळेगाव - येथील कला वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयाच्या माजी प्राध्यापिका श्रीमती नयनाताई सोलंकी (भगत) यांचे आज दुःखद निधन झाले. त्या महाविद्यालयाचे माजी प्राचार्य श्री. सिद्धार्थ भगत यांच्या पत्नी होत. नयनाताई यांनी आपल्या अध्यापन कारकिर्दीत विद्यार्थ्यांमध्ये लोकप्रियता मिळवली होती. त्यांच्या निधनाने राळेगाव परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. त्यांच्या पश्चात पती सिद्धार्थ भगत आणि मुलगा निनाद भगत असा परिवार आहे. भगत कुटुंबीयांवर या निधनामुळे दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# विदर्भ राज्यस्तरीय खो-खो स्पर्धेला रंगणार जल्लोष नव जयहिंद मंडळाचे आयोजन

## ३१ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर दरम्यान अभ्यंकर कन्या शाळेच्या प्रांगणात होणार स्पर्धा

जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ : क्रीडा क्षेत्रात नावलौकीक प्राप्त केलेल्या यवतमाळ येथील नव जयहिंद मंडळा तर्फे स्व. चिंतामणी भाऊ पांडे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ राज्यस्तरीय (विदर्भ) खो-खो स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा ३१ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर २०२५ दरम्यान आर्णी मार्गावरील अभ्यंकर कन्या शाळेच्या प्रांगणात भव्यदिव्य पद्धतीने पार पडणार आहे.

या स्पर्धेमध्ये संपूर्ण विदर्भातील पुरुष आणि महिला गटातील एकूण २९ नामांकित संघांचा सहभाग राहणार असून, सकाळी ७ ते दुपारी १ आणि सायंकाळी ४ ते रात्री १२ या वेळेत सामने खेळविण्यात येणार आहेत. देशभरात दर्जेदार कबड्डी आणि खो-खो स्पर्धांचे आयोजन करणारे नव जयहिंद मंडळ हे राज्यातील अग्रगण्य क्रीडा संस्थांपैकी एक मानले जाते. मंडळामध्ये शेकडो खेळाडू कबड्डी, खो-खो आणि मल्लखांब या देशी खेळांचा नियमित सराव करतात. या खेळाडूंच्या प्रतिभेला वाव मिळावा, यासाठी मंडळाच्या वतीने वेळोवेळी विविध स्पर्धा आयोजित केल्या जातात. या राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये नागपूर शहर पोलीस, विदर्भ युथ क्रीडा मंडळ काटोल, राजापेठ स्पोर्टिंग क्लब अमरावती, अनंत क्रीडा मंडळ अकोला, बुलढाणा जिल्हा खो-खो असोसिएशन, वत्सगुल क्रीडा मंडळ वाशीम, गडचिरोली, चंद्रपूर, वरोरा, परतवाडा, राळेगाव, हिंगणा आदी ठिकाणांहून नामवंत संघ सहभागी होत आहेत.



स्पर्धेसाठी सहभागी खेळाडूंसाठी निवास व भोजनाची उत्तम व्यवस्था करण्यात आली आहे. प्रेक्षकांसाठी आसनव्यवस्था तसेच मैदानावर आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. स्पर्धेतील पुरुष व महिला गटातील विजयी संघांसाठी प्रथम पारितोषिक ५१,०००, द्वितीय ३१,०००, तृतीय २१,००० आणि चतुर्थ पारितोषिक ११,००० इतकी बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. याशिवाय विजयी आणि उपविजयी संघातील प्रत्येक खेळाडूला वैयक्तिक बक्षिसे दिली जाणार आहेत. तसेच उत्कृष्ट संरक्षक, उत्कृष्ट आक्रमक आणि स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू या विशेष पारितोषिकांचाही समावेश आहे. या राज्यस्तरीय स्पर्धेत मुंबई टायटल स्पर्धेतील खेळाडू फैजान पठाण (काटोल), अल्टीमेट खो-खो स्पर्धक लकी सिंगर, ओडिशा जगन्नाथ टीमचा मनोज घोटेकर, खेलो इंडिया सुवर्णपदक विजेती कोमल महाजन, श्रुती ढाकरगे, तसेच भारतीय खो-खो संघ प्रशिक्षण शिबिरात सहभागी ऐश्वर्या ढोके यांच्यासह अनेक राष्ट्रीय पातळीवरील खेळाडू सहभागी होणार आहेत. या भव्य क्रीडा सोहळ्याचे साक्षीदार व्हावे आणि खेळाडूंना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष विनायकराव बोदडे, उपाध्यक्ष बाळासाहेब दौलतकार, सचिव प्रशांत वानखडे तसेच प्रा.विकास टोणे, प्रदीप वानखडे, अमोल बोदडे, अविनाश जोशी, जयंत चतुर, सुनील वानखडे, विलास किनवटकर, कैलास शिंदे, नमोद बल्लाळ, सचिन दरेकर, अजय निनगुरकर, पंकज रोहणकर, अमोल ढोणे आदींनी केले आहे.

# शेतकऱ्यांना मदतीचा हात..! पांढरकवडा कृषी उत्पन्न बाजार समितीचा उपक्रम कौतुकास्पद

## ५१ हजारांचा धनादेश मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी प्रदान

## संचालक रजनीकांत बोरेले, विजय चव्हाण यांच्या हस्ते धनादेश सुपूर्द

जनमाध्यम प्रतिनिधी

पांढरकवडा : अतिवृष्टीमुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या मदतीसाठी पांढरकवडा कृषी उत्पन्न बाजार समितीने सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवत अत्यंत संवेदनशील पाऊल उचलले आहे. समितीच्या वतीने ५१ हजार रुपयांचा धनादेश मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी देण्यात आला.

हा धनादेश अपक्ष संचालक व व्हिसल ब्लोअर रजनीकांत डालूरामजी बोरेले आणि संचालक व समन्वयक जनता पार्टी नेते विजय चव्हाण (मारेगाव) यांच्या हस्ते जिल्हा निबंधक अधिकारी, यवतमाळ यांना प्रदान करण्यात आला. या मदतीची रक्कम मुख्यमंत्री सहाय्यता निधीत जमा करण्यात आली असून ती शेतकऱ्यांच्या मदतीसाठी वापरली जाणार आहे.



अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांचे पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. यामुळे शेतकऱ्यांची दिवाळी ही 'काळी दिवाळी' ठरली असताना, बाजार समितीने "फुल नाही पण फुलाची पाकळी" म्हणून ही आर्थिक मदत दिली. समितीची आर्थिक स्थिती अत्यंत मर्यादित असतानाही शेतकऱ्यांच्या दु:खात सहभागी होण्याचा निर्णय घेतल्याने सर्वत्र कौतुक व्यक्त होत आहे. या उपक्रमामागे सभापती विनोद डंभारे, उपसभापती संजय नईनवार, संचालक व शिवसेना नेते हरीहर लिंगनवार यांची प्रमुख भूमिका राहिली आहे. तसेच या उपक्रमाला पालकमंत्री संजय राठोड (शिंदे शिवसेना गट) व खासदार प्रतिभा धानोरकर (काँग्रेस) यांचे मार्गदर्शन लाभले. धनादेश सुपूर्द केल्यानंतर रजनीकांत बोरेले यांनी आपल्या भावना व्यक्त करताना म्हणाले."शेतकरी हा आपल्या देशाचा कणा आहे.

शेतकरी संकटात असताना आपण सगळ्यांनी एकत्र उभं राहणं हीच खरी सेवा आहे. या कार्यात सहभागी होण्याची संधी दिली व धनादेश माझ्या हस्ते दिल्याबद्दल मी सभापती विनोद डंभारे विजय चव्हाण, राकेश नेमणवार, संतोष बोडेवार, सचिव सुरेश खानदानकर यांच्यासह समितीचे सर्व संचालक यांचा आभारी असल्याचे मत व्यक्त केले आहे. शेतकऱ्यांच्या संकटकाळात साथ देणारा हा संवेदनशील उपक्रम सहकार भावनेचा उत्तम आदर्श म्हणून पुढे आला आहे.

# कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी काँग्रेस आक्रमक

## शेतक-यांच्या विविध मागण्यांसाठी काँग्रेसचे निवेदन

जनमाध्यम प्रतिनिधी

वणी - कापूस आणि सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या तातडीच्या प्रश्नांकडे शासनाने दुर्लक्ष केल्यामुळे सोमवारी काँग्रेसतर्फे प्रशासनाला निवेदन देण्यात आले. सीसीआय कापूस खरेदी नोंदणीसाठी तात्काळ मुदतवाढ द्यावी, मारेगाव तालुक्यातील मार्डी येथे कापूस खरेदी केंद्र सुरू करावे, तसेच नाफेडमार्फत सोयाबीन खरेदी नोंदणी प्रक्रिया तात्काळ सुरू करावी, अशी मागणी करण्यात आली. हे निवेदन काँग्रेसचे प्रदेश सचिव संजय खाडे यांच्या नेतृत्त्वात देण्यात आले.

दुपारी सुमारे १२ वाजता काँग्रेसचे कार्यकर्ते व पदाधिकारी तहसिल कार्यालयात दाखल झाले. यावेळी त्यांनी उपविभागीय अधिकारी यांची भेट घेऊन शेतकऱ्यांच्या अडचणींबाबत सविस्तर चर्चा केली आणि नंतर अधिकृतरित्या निवेदन सादर केले. हंगाम 2025-26 मधील कापूस खरेदी केंद्र शासनाच्या आधारभूत दरानुसार सीसीआयमार्फत कार्यरत राहणार आहे. मात्र सध्या खरेदी नोंदणीची अंतिम मुदत 31 ऑक्टोबर 2025 निश्चित आहे. ग्रामीण भागातील अनेक शेतकऱ्यांकडे अँड्रॉइड मोबाईल किंवा इंटरनेटची सोय नसल्याने ऑनलाइन नोंदणी करण्यात अडचणी येत आहेत. तसेच मार्डी परिसरात सीसीआय खरेदी केंद्र सुरु नसल्याने शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसत आहे, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तसेच, नाफेडमार्फत सोयाबीन खरेदीची नोंदणी प्रक्रिया अद्याप सुरु नसल्याने शेतकऱ्यांना बाजारात अत्यल्प दराने सोयाबीन विक्री करावी लागत आहे. त्यामुळे शासनाने नोंदणी प्रक्रिया तातडीने सुरू करावी, अशी मागणी काँग्रेसतर्फे करण्यात आली आहे. यावेळी काँग्रेसचे कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वेचक



## मनसेचा नगरपरिषदेवर नजर! प्रत्येक प्रभागात उमेदवार उतरवून ताकदीने लढणार : संजय पाटील बिजोरे

उमरखेड - येणाऱ्या नगरपरिषद निवडणुकीत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने (मनसे) शहरातील प्रत्येक प्रभागात उमेदवार उभे करून निवडणूक पूर्ण ताकदीने लढविण्याचा निर्धार केला असल्याची घोषणा मनसे शहराध्यक्ष संजय पाटील बिजोरे यांनी केली. शहरातील शासकीय विश्रामगृह येथे आयोजित बैठकीत त्यांनी मनसे कार्यकर्त्यांना आगामी निवडणुकीसाठी सज्ज राहण्याचे आवाहन केले. यावेळी संघटनात्मक दृष्टीने काही महत्वाच्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या. शहर उपाध्यक्षपदी अमोल लामटिळे, महेश काळबांडे आणि संजय जाधव यांची निवड करण्यात आली. नियुक्तीपत्रे मनसे जिल्हा उपाध्यक्ष डेव्हिड शहाणे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. या बैठकीत प्रभागनिहाय चर्चासत्र घेऊन संभाव्य उमेदवारांची प्राथमिक चाचणी व चर्चा करण्यात आली. मनसेच्या उमरखेड शहरातील संघटनेने नगरपरिषद निवडणुकीत प्रभावी पर्याय म्हणून जनतेसमोर उभे राहण्याचा संकल्प केला आहे. यावेळी शहरातील पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अतिवृष्टी मदतीचे गतीने वितरण सुरू

यवतमाळ - जिल्ह्यात अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या शेती नुकसानीबाबत बाधित शेतकऱ्यांना आर्थिक मदतीचे वितरण गतीने सुरू असून, तांत्रिक कारणांमुळे मदत मिळाली नसेल तर संबंधित शेतकरी बांधवांनी तत्काळ आपल्या तलाठी किंवा कृषी सहाय्यकांशी संपर्क साधून आवश्यक माहिती सादर करावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. जून ते ऑगस्ट 2025 या कालावधीत झालेल्या अतिवृष्टीमुळे 2 लाख 10 हजार 976.58 हेक्टर क्षेत्रातील पिकांचे नुकसान झाले असून, 2 लाख 13 हजार 722 शेतकरी बाधित झाले आहेत. यासाठी शासनाने 23 सप्टेंबर 2025 रोजी 183 कोटी 67 लाख 82 हजार रुपयांचा निधी मंजूर केला आहे. या कालावधीत 1 लाख 84 हजार 661 शेतकऱ्यांच्या याद्या ई-पंचनामा पोर्टलवर अपलोड करण्यात आल्या असून, त्याची टक्केवारी 86 टक्के आहे. आतापर्यंत 1 लाख 45 हजार 395 शेतकऱ्यांच्या खात्यात 115 कोटी 80 लाख 7 हजार रुपये डीबीटीद्वारे जमा करण्यात आले आहेत. दरम्यान, सप्टेंबर 2025 मधील अतिवृष्टी व पुरामुळे 3 लाख 73 हजार 552.86 हेक्टर क्षेत्रातील पिकांचे नुकसान झाले असून, 2 लाख 58 हजार 868 शेतकरी बाधित झाले आहेत. या नुकसानीसाठी शासनाने 18 ऑक्टोबर 2025 रोजी 262 कोटी 8 लाख 45 हजार रुपयांचा निधी मंजूर केला आहे. यापैकी 1 लाख 69 हजार 744 शेतकऱ्यांच्या याद्या पोर्टलवर अपलोड झाल्या असून (78 टक्के), 1 लाख 15 हजार 761 शेतकऱ्यांच्या खात्यात 126 कोटी 9 लाख 85 हजार रुपयांची मदत डीबीटीद्वारे जमा करण्यात आली आहे. अद्याप काही शेतकऱ्यांना मदत मिळालेली नाही. याचे कारण म्हणून मयत शेतकऱ्यांच्या वारसांचे संमतीपत्र न मिळणे, तसेच खाते क्रमांकाची माहिती तलाठी किंवा कृषी सहाय्यकांकडे जमा न करणे ही प्रमुख कारणे असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे संबंधित शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रे तातडीने सादर करून मदत वितरण प्रक्रियेला गती द्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

## तरुणाला बेदम मारहाण

यवतमाळ : क्षुल्लक कारणावरून झालेल्या भांडणाचा वचपा काढीत एका तरूणाला तिघांनी लाथाबुक्यांनी बेदम मारहाण केली. तसेच त्याच्यावर लोखंडी कड्याने हल्ला केला. या हल्यात संबंधीत तरूणाच्या डोक्याला आणि हाताला गंभीर दुखापत झाली. ही घटना २५ ऑक्टोबरला सायंकाळी ५.३० वाजताच्या सुमारास उमरखेड येथील हुतात्मा गार्डन येथे घडली. अक्षय कैलास कांबळे (२९) रा. उमरखेड असे या मारहाणीत जखमी झालेल्या तरूणाचे नाव आहे. घटनेनंतर त्याने याप्रकरणी उमरखेड पोलिसात तक्रार दिली. त्यावरून आरोपी हर्षल गणेश वाठोरे (१९), दर्शन धुळे (२३), तेजस खंदारे (२२) आणि महेश बंडू काळे (२२) सर्व रा. उमरखेड यांच्याविरूध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

# केळापूर–पारवा रस्ता खड्डेमय ; सार्वजनिक बांधकाम विभाग झोपेत ?

## रस्त्याच्या दुर्दशेकडे प्रशासनाचे दुर्लक्ष, नागरिक त्रस्त

जनमाध्यम प्रतिनिधी

पांढरकवडा - केळापूर ते पारवा या राज्य मार्गावरून प्रवास करणे म्हणजे आता जीवाशी खेळल्यासारखे झाले आहे. केवळ वर्षभरापूर्वी डांबरीकरण झालेले हे काम सध्या पूर्णपणे उखडून खड्डेमय झाले आहे. मोठमोठे खड्डे आणि उंचसखल पृष्ठभागामुळे वाहनचालकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

या मार्गावरून दररोज शेकडो वाहने विशेषतः ओव्हरलोड ट्रक नांदेडच्या दिशेने जातात. त्यामुळे रस्त्याचे अस्तित्वच संपुष्टात आले आहे. खड्ड्यांमुळे दररोज लहानमोठे अपघात होत असून, दुचाकीस्वार आणि पादचारी यांचा जीव धोक्यात आला आहे. स्थानिक नागरिकांनी अनेकदा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या



अधिकाऱ्यांना लेखी तक्रारी केल्या, परंतु केवळ आश्वासनांपलीकडे काहीच झाले नाही. २४ डिसेंबर २०२४ रोजी स्थानिक प्रसारमाध्यमांनी हीच बाब उचलून धरली होती, तरीही विभागाने कोणतीही सुधारात्मक कारवाई केलेली नाही. रस्त्याची एवढी वाईट अवस्था असूनही संबंधित ठेकेदार व विभागीय अधिकारी यांच्यावर कोणतीही चौकशी अथवा जबाबदारी निश्चित झालेली नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. नागरिकांचे म्हणणे आहे की, "रस्त्याच्या दुर्दशेकडे प्रशासनाने तत्काळ लक्ष देऊन दुरुस्ती केली पाहिजे, अन्यथा मोठ्या आंदोलनाचा इशारा देण्यात येईल."

# विजयानंद देवतळे राज्यस्तरीय 'समाज भूषण' पुरस्काराने सन्मानित

जनमाध्यम प्रतिनिधी



घाटंजी - डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्यिक विचार मंच (महाराष्ट्र रत्नागिरी भारत) यांच्या वतीने दिनांक २५ ऑक्टोबर २०२५ रोजी आर्णी येथील महालक्ष्मी लॉन येथे आयोजित डॉ. बाबासाहेब आंबेडकर राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्यात यवतमाळ येथील विजयानंद चक्रधर देवतळे यांना त्यांच्या उल्लेखनीय समाजकार्यासाठी 'समाज भूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार विजयानंद देवतळे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्यिक विचार मंचचे संस्थापक अध्यक्ष मनोज जाधव सर आणि संपादिका भावनाताई खोब्रागडे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

विजयानंद चक्रधर देवतळे, जे यवतमाळचे रहिवासी आहेत, त्यांना हा प्रतिष्ठित 'समाज भूषण' पुरस्कार समाजात केलेल्या महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना कृतिशील रूप दिल्याबद्दल देण्यात आला. या समारंभासाठी स्वागत अध्यक्ष म्हणून अनेक मान्यवर उपस्थित होते, ज्यात संध्याताई खरतडे, श्रीमती सुमनताई मनवर, संगीता ताई कानंदे, सुनिता कांबळे यांचा समावेश होता. तसेच, प्रेमानंद देवतळे, ह. सु. भगत, परसराम खरतडे, मनोहर बहादे, पंकज भवरे यांसह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या साहित्यिक आणि सामाजिक विचारांचा वारसा जपणाऱ्या आणि समाजात रचनात्मक कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्यात आला, ज्यामुळे उपस्थित नागरिकांना प्रेरणा मिळाली.

> माजी सामाजिक न्यायमंत्री श्री शिवाजीराव मोघे यांच्यासोबत गेली 30 वर्ष खाजगी सचिव म्हणून काम करत विविध सामाजिक कार्य केले त्याचाच गौरव या माध्यमातून करण्यात आला हा माझा गौरव नसून समाजकार्याचा सन्मान आहे.
> **– विजयानंद देवतळे**

# संत सावता माळी पतसंस्थे कडून मुख्यमंत्री निधीत ११ हजारांची मदत

जनमाध्यम प्रतिनिधी

पुसद : यवतमाळ जिल्ह्यातील अग्रगण्य संत सावता माळी नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने मुख्यमंत्री सहाय्यता निधीस ११,००० रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली. सहकारी संस्थेचे जिल्हा उपनिबंधक नानासाहेब चव्हाण यांच्या आवाहनानुसार पतसंस्थेचे अध्यक्ष आत्माराम जाधव यांनी हा धनादेश जिल्हा उपनिबंधक कार्यालयाचे अधीक्षक जी.एस. राठोड यांना सुपूर्द केला.

अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदत करण्याच्या हेतूने हा निधी देण्यात आला. संत सावता माळी पतसंस्था मागील अठरा वर्षांपासून जिल्ह्यात कार्यरत असून तिच्या पाच शाखा उत्तम रीतीने कार्यरत आहेत. यापूर्वी कोरोना काळात संस्थेने हजाराहून अधिक नागरिकांना



मोफत किराणा किट वाटप केले होते, तसेच पार्डी येथील आगीत नुकसान झालेल्या कुटुंबालाही आर्थिक मदत दिली होती.पतसंस्था साडेचार हजार सभासदांच्या विश्वासावर आधारित असून तेरा वर्षांपासून 'अ' वर्ग ऑडिट मिळवत आहे. एनपीएचे प्रमाण अत्यल्प असून मागील तीन वर्षांपासून संस्थेने सभासदांना ११ टक्के बोनस दिला आहे. नुकत्याच झालेल्या सर्वसाधारण सभेत १० टक्के लाभांश जाहीर करण्यात आला. नागरिकांनी सचोटीने कार्य करणाऱ्या अशा विश्वासार्ह पतसंस्थांवर विश्वास ठेवावा, असे आवाहन अध्यक्ष आत्माराम जाधव यांनी केले.

# जिल्हा वार्षिक योजनेची प्रलंबित कामे तातडीने पुर्ण करा : जिल्हाधिकारी

जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ : जिल्हा वार्षिक योजनेतून विभागांची विविध विकासविषयक कामे मंजूर केली जातात. त्यासाठी आर्थिक तरतूद देखील दिली जाते. विभागांनी मागील वर्षाची मंजूर आणि प्रलंबित कामे तातडीने पुर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी विकास मीना यांनी दिले.

महसूल भवन येथे जिल्हाधिकाऱ्यांनी सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना, अनुसूचित जाती उपयोजना, आदिवासी उपयोजनेंतर्गत मागील वर्षी मंजूर कामे व या कामांवर झालेला खर्च, या योजनांचे चालू आर्थिक वर्षाचे प्रस्ताव, खासदार विकास कार्यक्रम, आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत मंजूर कामांची प्रगती व या सर्व योजनांवरील अखर्चीत निधीचा आढावा घेतला. त्यावेळी त्यांनी सदर निर्देश दिले. बैठकीला प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पुसद अमोल मेतकर, उपवनसंरक्षक धनंजय वायभासे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष धोत्रे, जिल्हा नियोजन अधिकारी सुधाकर आडे, सहाय्यक आयुक्त समाजकल्याण मंगला मुन यांच्यासह सर्व विभागाचे जिल्हास्तरीय अधिकारी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत गेल्या आर्थिक वर्षात विभागांना मंजूर निधी व कामे तसेच कामांच्या प्रगतीचा आढावा घेतला. ज्या विभागांची कामे अद्यापही प्रलंबित आहेत, त्यांनी ती तातडीने पुर्ण करण्याचे निर्देश दिले. येत्या काळात जिल्हा परिषद व पंचायत समीती सार्वत्रिक निवडणुकीची आचारसंहिता लागण्याची शक्यता असल्याने कामे करण्यावर निर्बंध येतील, त्यामुळे कामांना गती देण्याच्या सूचना त्यांनी केल्या.

# कर्ज न फेडणाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई सुरूच : क्षितिज तायडे

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ - राजलक्ष्मी पतसंस्थेकडून घेतलेले कर्ज फेडण्यास टाळाटाळ करणाऱ्यांविरुद्ध संस्थेच्या हितासाठी कायदेशीर कारवाई सुरूच ठेवली जाईल, असे संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक क्षितिज तायडे यांनी स्पष्ट केले. यवतमाळ येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

तायडे म्हणाले की, "कर्ज घेताना नियम पाळले जातात, तसेच कर्जफेडीची जबाबदारीही कर्जदाराचीच असते. ठेवीदारांच्या पैशाचे संरक्षण करणे ही आमची जबाबदारी आहे. त्यामुळे थकीत कर्जदारांनी आंदोलनाच्या धमक्या देऊन किंवा खोट्या तक्रारी करून संस्थेवर दबाव टाकण्याचा प्रयत्न करू नये. अशा लोकांविरुद्ध कायदेशीर कारवाई केली जाईल." दरम्यान, कर्ज वसुली प्रकरणी उच्च न्यायालयाने जिल्हा न्यायालयाचा निकाल रद्द करून राजलक्ष्मी पतसंस्थेच्या बाजूने निर्णय दिला आहे. या निर्णयाने संस्थेच्या पारदर्शक आणि कायदेशीर कामकाजाला दुजोरा मिळाल्याचे तायडे यांनी सांगितले. संस्थेचे अध्यक्ष संध्याताई तायडे, संचालक सुनील देशपांडे, अरविंद तायडे, सखाराम सवनकर, मोहम्मद लुकमान, वनिता सुरजुसे व नितीन भागवते आदी उपस्थित होते. तायडे यांनी पुढे सांगितले की, "संस्थेविरुद्ध खोटे आरोप किंवा बदनामीकारक वक्तव्ये करणाऱ्यांवरही कायदेशीर कारवाई केली जाईल. ठेवीदारांनी चुकीच्या प्रचाराला बळी न पडता संस्थेवर विश्वास ठेवावा."

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# शेकडो ट्रॅक्टरसह बच्चू कडूंचा ताफा नागपूरकडे रवाना!

## बेलोऱ्यातून महाएल्गार आंदोलनाची सुरुवात. सरकारविरोधात शेतकऱ्यांचा ज्वालामुखी फुटला! काँग्रेसचा आंदोलनाला पाठिंबा..

**बेलोरा (ता. चांदूरबाजार)/ वार्ताहर**

शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसाठी, शेतमालाला हमीभाव, मच्छीमार, शेतमजूर, दिव्यांग आणि मेंढपाळ बांधवांच्या न्याय्य मागण्यांसाठी सुरू झालेल्या 'महाएल्गार आंदोलनाला' आज निर्णायक वळण लागले आहे. बेलोऱ्यातून शेकडो ट्रॅक्टरसह बच्चू कडूंचा ताफा नागपूरच्या दिशेने रवाना झाला. तत्पूर्वी बच्चू कडू यांनी बेलोरा येथे आई स्व. इंदिराबाई आणि स्व. बाबारावजी कडू यांच्या समाधीचे दर्शन आणि आशीर्वाद घेतला.तसेच बेलोरा गावातील मंदिरात पूजन करून आंदोलनाला सुरुवात केली. या ताफ्यातील प्रत्येक ट्रॅक्टरवर शेतकऱ्यांचा आक्रोश आणि असंतोष जणू पेट घेत आहे.प्रत्येक ट्रॅक्टर वर 'जय जवान जय किसान' हा नारा लिहिलेला ध्वज डौलाने फडकत



आहे.

**शेतकऱ्यांचा संताप, सरकारकडे तुफानी रोष-** निवडणुकीपूर्वी 'सातबारा कोरा करू' म्हणून गाजवलेली सरकारची घोषणा आज केवळ फसवणुकीचा दस्तऐवज ठरली आहे.अतिवृष्टी, ढगफुटी, बाजारात शेतमालाला न मिळणारा भाव या सगळ्याचा जबर फटका बसलेल्या शेतकऱ्यांच्या मनात आज प्रचंड रोष आहे.केंद्र सरकारच्या आयात-निर्यात धोरणामुळे कापसावरील आयातशुल्क माफ करण्यात आलं आणि त्यामुळे परदेशी कापूस देशात घुसला. याचा फटका देशातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना बसत असून, त्यांचे उत्पादन अक्षरशः रस्त्यावर आले आहे.सोयाबीनचा शासकीय हमीभाव ५३३० रुपये असूनही शेतकऱ्यांना केवळ ५०० ते ३००० रुपयांत आपली सोयाबीन विकावी लागत आहे. सरकारने दिलेली 'शेतकऱ्यांची दिवाळी उजळवू' ही घोषणा आज काळोखात बुडालेली दिसत आहे.कापूस घरी येण्याआधीच व्यापारी यांना विकावा लागत आहे

**मेंढपाळ व मच्छीमारही मैदानात-** मराठवाडा आणि विदर्भातील मेंढपाळ बांधवांनी गेल्या पाच दिवसांपासून आपले बैल, शेळ्या-मेंढ्या, जनावरे घेऊन नागपूरकडे कूच केली आहे. 'आमचं पोट शेतावर अवलंबून, आणि शासनाचं धोरण



आमच्याच विरोधात!' अशी त्यांची भूमिका आहे. दिवसरात्र चालत असलेले हे मेंढपाळ व मच्छीमार समाजाचे तांडे आता आंदोलनाचे प्रतिक बनले आहेत.

**सरकारकडे दुर्लक्ष, शेतकऱ्यांची 'आरपार' भूमिका-** शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्यांकडे वारंवार दुर्लक्ष करणाऱ्या सत्ताधाऱ्यांवर बच्चू कडू आणि त्यांचे समर्थक आता थेट आरपारच्या लढाईच्या तयारी मध्ये आहेत.नागपूरमध्ये होणाऱ्या या महाएल्गार आंदोलनाला संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकरी संघटनांचा उत्स्फूर्त पाठिंबा मिळत असून, राज्य सरकारला आता जनतेच्या रोषाचा सामना करावा लागणार, हे निश्चित आहे.'शासनाच्या घोषणांवर शेतकऱ्यांचा विश्वास संपला आहे.आता त्यांचा तिरंगा म्हणजेच त्यांचा आवाज बनला आहे.'महाएल्गार आंदोलन हा केवळ मोर्चा नाही तो शेतकऱ्यांच्या अस्तित्वाची लढाई आहे! शिस्तबद्ध पद्धतीने निघालेल्या या ताफ्याने आज वर्धा येथे मुक्काम केला. उद्यापासून दिनांक २८ नागपूरच्या दिशेने क्रांतीचा झेंडा घेऊन हा मोर्चा पुढे निघणार आहे.बच्चू कडू स्वतः ट्रॅक्टर चालून नेतृत्व करत आहे, तर त्यांच्या ट्रॅक्टरवर फडकणारा राष्ट्रध्वज तिरंगा आज शेतकऱ्यांच्या आशा-आकांक्षेचं, नव्या क्रांतीचं प्रतीक बनला आहे.'आता ही लढाई अंतिम टप्प्यात आली आहे. आमच्या पिढ्या जगवायच्या असतील, तर ही आरपारची लढाई लढायलाच हवी!'या महाएल्गार आंदोलनात मेंढपाळ बांधवांनी शेकडो शेळ्या मेंढ्या घेऊन बच्चू कडू यांच्यासोबत चालायला सुरुवात केली,पोलिसांचा चोक बंदोबस्त महा एल्गार आंदोलनाची धास्ती घेऊन पोलिसांनी कडेकोट बंदोबस्त ठेवला होता.

**काँग्रेसचा पाठिंबा -** शेतकऱ्यांसाठी उभारण्यात आलेल्या बच्चू कडू च्या आंदोलनाला काँग्रेसकडून देखील पाठिंबा देण्यात आला आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी पत्रक काढून बच्चू कडूच्या आंदोलनाला पाठिंबा दिला. बच्चू कडू यांनी भ्रमणध्वरीवरून हर्षवर्धन सपकाळ यांच्याशी संपर्क साधत आभार देखील मानले. शेतकरी आंदोलनात सहभागी होण्याची विनंती केली.



## वलगाव वृद्धाश्रमात 'दीपोत्सव स्नेहमीलन' उत्साहात
# दिवाळी फराळ, नवे कपडे आणि भक्तीगीतांचा सुरेख संगम!

**अमरावती/का.प्र.**

'भेटी लागी जीवा लागलीसे आस' या शीर्षकाखाली विदर्भ कुंभार समाज सुधार समिती, अमरावती आणि श्री संत गोरोबा काका समाजोन्नती बहुउद्देशीय समिती यांच्या संयुक्त विद्यमाने, श्री संत गाडगेबाबा बाबा वृद्धाश्रम, वलगाव येथे 'वृद्धाश्रम दीपोत्सव स्नेहमीलन' कार्यक्रम मोठ्या उत्साहात झाला.

दरवर्षीप्रमाणे यंदाही दिवाळीनिमित्त आयोजित या कार्यक्रमात वृद्धाश्रमातील वृद्ध बंधू-भगिनींसाठी कुंभार समाज व सहभागी इतर समाजबांधवांनी घरी बनवलेल्या खास दिवाळी फराळाचा एकत्र आस्वाद घेतला. यावेळी, 'गोपाला गोपाला'च्या जयघोषात एक आनंदी वातावरण निर्माण झाले होते. मनोरंजन आणि भेटवस्तू वृद्धाश्रमाचे व्यवस्थापक बोरसे साहेब आणि समितीचे सहसचिव मधुकरराव खांडेकर गुरुजी यांनी त्यांच्या



सुमधुर आवाजात भक्ती गीते, भावगीते व भजने गाऊन उपस्थितांचे मनोरंजन केले. फराळानंतर वृद्ध बांधवांसाठी आणलेले नविन कपडे भेट म्हणून देण्यात आले; यामध्ये महिलांना साडी-चोळी आणि पुरुषांना धोतर, पायजमा-शर्ट यांचा समावेश होता. तसेच, सायंकाळच्या मिष्ठान्न भोजनाची सोय देखील करण्यात आली होती.

'आंतरिक ओढ' आणि 'समाधान' याप्रसंगी बोलताना मान्यवरांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. 'गेल्या दहा वर्षांपासून सातत्याने होणारी ही भेट आता केवळ कर्तव्यपूर्तीची भावना राहिली नसून, ही आपल्या भेटीची आंतरिक ओढ आहे,' अशी भावना त्यांनी व्यक्त केली. वृद्धांसोबत घालवलेल्या वेळेमुळे केवळ वृद्धांनाच नव्हे, तर येथे आलेल्या सर्वांनाच मनःशांती आणि आत्मशांती लाभते, असे मनोगतात नमूद करण्यात आले. जीवन आणि नियतीबद्दल बोलताना, संत तुकाराम महाराजांच्या 'ठेविले अनंते तैसेचि राहावे, चित्ती असो द्यावे समाधान' या अभंगाचा उल्लेख करण्यात आला. 'ईश्वराने ज्या स्थितीत ठेवले त्यात समाधान मानून हेच आपल्यासाठी सर्वोत्तम आहे, ही भावना मनी जोपासावी. त्यामुळे दुःखाची तीव्रता कमी होईल,' असा आशावाद मान्यवरांनी व्यक्त केला. कार्यक्रमास विदर्भ कुंभार समाज सुधार समितीचे अध्यक्ष सुधाकर शेंडोकार, उपाध्यक्ष ॲड. गजानन तांबटकर, सचिव सुरेंद्र सरोदे, कोषाध्यक्ष सतिशराव गावंडे, युवाध्यक्ष रमेश अंबुलकर, महिला अध्यक्षा प्रभा भागवत तसेच समाजोन्नती समितीचे कार्याध्यक्ष सुरेश नांदुरकर, सचिव डॉ. श्रीराम कोल्हे, इ.मा.स चे अध्यक्ष इंजि. वासुदेव चौधरी यांसह दोन्ही समितीचे तसेच इतर समाजातील अनेक सदस्य आणि महिला मंडळाच्या सदस्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. वृद्धाश्रमाचे व्यवस्थापक बोरसे साहेब सपत्नीक यांनी शेवटी सर्व उपस्थितांचे आभार मानले आणि दिवाळीच्या शुभेच्छा देऊन कार्यक्रमाची सांगता केली.

## शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती येथे
# 'आउटडोअर अँटेना आणि रडार उपकरणांवरील कार्यशाळेचा समारोप'

**अमरावती/का.प्र.**

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती येथील इलेक्ट्रॉनिक्स आणि दूरसंचार अभियांत्रिकी विभागात 'आउटडोअर अँटेना आणि रडार उपकरणांचे डिझाइन, फॅब्रिकेशन आणि फील्ड टेस्टिंग' या विषयावर आधारित तीन दिवसीय कार्यशाळेचा यशस्वी समारोप झाला. या कार्यशाळेत तृतीय वर्षातील सुमारे ६४ विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

या कार्यशाळेचा उद्देश विद्यार्थ्यांना अँटेना आणि रडार तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील प्रात्यक्षिक अनुभव आणि सैद्धांतिक ज्ञान देणे हा होता. आर.एफ. एक्वा सोल्युशन्स, पुणे येथील तज्ज्ञ अनिरुद्ध कुलकर्णी यांनी या कार्यशाळेत मार्गदर्शन



केले.कार्यशाळेत अँटेना डिझाईन व फॅब्रिकेशन पद्धती, सॉफ्टवेअर तुलना, तसेच विविध प्रकारच्या अँटेनांचे डिझाईन शिकवण्यात आले. 'एअर ट्रॅफिक मॅनेजमेंट'मधील प्रायमरी रडार, मरीन रडार एम्युलेटर, ट्रॅकिंग रडार अँटेना यांवर सत्रे घेण्यात आली. तसेच 'एक्स बँड मरीन रडार' आणि रडार एम्युलेटर वर प्रत्यक्ष हँड-ऑन सत्रे आयोजित करण्यात आली.विद्यार्थ्यांना सिग्नल एनालायझरद्वारे ॲनालॉग, डिजिटल सिग्नल आणि लिकेज रेडिएशन पॅरामीटर्सचे मापन, तसेच GPS आणि मॅपिंग सॉफ्टवेअर वापरून आरएफ सर्वेक्षण तंत्र शिकविण्यात आले.

या कार्यशाळेचे समन्वयन प्रा. श्वेता मेश्राम यांनी केले, तर विभागप्रमुख डॉ. पी. आर. देशमुख यांनी मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आशिष महाले यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत, अशा कार्यशाळा विद्यार्थ्यांच्या जागतिक तांत्रिक उत्कृष्टतेसाठी उपयुक्त असल्याचे नमूद केले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. पी. एल. पाईकराव, प्रा. डी. बी. माहेश्वरी, प्रा. व्ही. आर. राऊत, तसेच विद्यार्थी समन्वयक वेदांत चावरे, सिद्धेश गोटे, साहिल देशमुखयांनी विशेष परिश्रम घेतले. सर्व विद्यार्थ्यांना प्रशिक्षण प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.

## मंगेश राऊत यांचे निधन

**तिवसा** - तालुक्यातील भारवाडी येथील सत्यदेवबाबा आश्रमशाळा येथील शिक्षक



मंगेश मधुकरराव राऊत (रा.शिवनगरी, तिवसा)यांचे रात्री दीर्घ आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ४६ वर्षाचे होते.मंगेश राऊत हे अतिशय मनमिळाऊ स्वभावाचे व कुणाच्याही मदतीला धावून जाणारे, विद्यार्थी प्रिय शिक्षक होते. त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.त्यांच्या मागे आई,वडील, पत्नी व दोन मुले असा आप्त परिवार आहे.

# शेकडो कार्यकर्ते ट्रॅक्टरने नागपूरच्या मोर्चासाठी रवाना



**आसेगाव पूर्णा/वार्ताहर**

प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष माजी आमदार बच्चु कडू यांच्या नेतृत्वात २८ ऑक्टोंबर रोजी नागपूर येथे एल्गार मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या मोर्चात शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चात आसेगाव पूर्णा व टाकरखेडा पूर्णा येथील शेतकऱ्यासह शेकडो प्रहार कार्यकर्ते ट्रॅक्टरने नागपूरच्या मोर्चात सहभागी होण्यासाठी सोबत शिदोरी घेऊन रवाना झाले आहे.

शेतकरी योध्दा शरद जोशी यांच्या अंगार मळ्याची माती कपाळाला लावून शेतकऱ्यांचे मरण हे च शासनाचे धोरण या अन्यायाविरोधात नागपूर येथे २८ ऑक्टोंबर २०२५ रोजी प्रहार जनशक्ती पक्षाचे प्रमुख माजी आमदार बच्चुभाऊ कडू यांच्या नेतृत्वात व शेतकरी संघटनेच्या वतीने जाहिर नाम्यातील वचनांप्रमाणे ठाम मागण्या राज्यात ओला दुष्काळ जाहीर करा, शेतीमालाला एम. एस. पी. २० टक्के बोनस देण्यात यावे, संपूर्ण कर्जमाफी करण्यात यावी, शेतकऱ्यांची सरसकट ३ लाखा पर्यत कर्ज माफी करण्यात यावी आणि इतर प्रलंबित असलेल्या मागण्याची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी. या मागण्या साठी जात पात, धर्म, पंथ आणि पक्षपात बाजूला ठेवून आसेगाव पूर्णासह टाकरखेडा पूर्णा, तळणीपूर्णा, खैरी दोनोळा, रावळगाव येथील शेतकरी बांधवांसह, प्रहारचे कार्यकर्ते ट्रॅक्टरने आज २७ ऑक्टोबरला सकाळी दहा वाजता टाकरखेडा पूर्णा येथील निळकंठ मंगल कार्यालयात जमा झाल्यानंतर दुपारी बारा वाजता नागपूरच्या दिशेने रवाना झाले. यावेळी प्रहार जनशक्ती पक्षाचे अजय तायडे, मोहन भाऊ नेरकर, विलास तायडे, सतीश वसु यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

## राष्ट्रीय स्वयंमसेवक संघाच्या निमित्य मोफत एकात्मिक योग शिबिर
# 'योगामुळे प्रत्येक घरात आरोग्य येतें' - दिनेशजी राठोड

**अमरावती/क्रा.प्र.**

राष्ट्रीय स्वयंमसेवक संघाच्या शताब्दी वर्षांच्या पूर्ततेनिमित्त ८ आणि ९ नोव्हेंबर २०२५ रोजी होणाऱ्या मोफत एकात्मिक योग शिबिर आणि योग महासंमेलनाच्या तयारीसंदर्भात अमरावतीत महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत कार्यक्रमाची रूपरेषा, आयोजन समिती, व्यवस्था आणि जनसहभाग वाढविण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीचे अध्यक्षस्थान सामाजिक कार्यकर्ते नानक रामजी नेभानी यांनी भूषवले, तर मुख्य मार्गदर्शन चंद्र कुमार (लप्पीभैया) जाजोदिय, पतंजली योगपीठ हरिद्वारचे कॉर्पोरेट सदस्य यांनी केले. बाळू पाटील



(मुंबई) यांचीही उपस्थिती होती. प्रांतीय प्रभारी दिनेशजी राठोड यांनी मार्गदर्शन करताना सांगितले, 'योग हे केवळ शरीराचे संतुलन नव्हे, तर मन आणि आत्म्याचे संतुलन साधण्याचे साधन आहे. या शिबिराच्या माध्यमातून आपण निरोगी, जागरूक आणि सुसंस्कृत समाजनिर्मितीच्या दिशेने पुढे जात आहोत.'बैठकीत प्रांतीय कोषाध्यक्ष प्रदीपजी काटेकर, प्रल्हादजी सुलतान, युवा भारतचे प्रांतीय प्रभारी शंकरजी नागपुरे,पतंजली किसान सेवा समितीचे प्रभारी साबळेजी, प्रांतीय सदस्य अशोकजी मुंदडा प्रशांतजी पानपालिया आदींची उपस्थिती होती.या बैठकीत निर्णय घेण्यात आला की १ नोव्हेंबरपासून १८ जिल्ह्यांतील योगसाधक गाडगेबाबा समाधी मंदिरातून प्रचार यात्रेची सुरुवात करतील. नव्याने नियुक्त जिल्हा संरक्षक कमल किशोर मलानी यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी देणगीदारांना जोडण्याचे आश्वासन दिले.

भारत स्वाभिमान जिल्हा प्रभारी योगेश राठी यांनी पतंजली योगपीठाच्या कार्याची माहिती दिली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नानक राम नेभाना आणि चंद्र कुमार जाजोदिया यांनी ५ लाख रुपये तर कमल किशोर मलानी यांनी १ लाख रुपये देणगीची घोषणा केली.बैठकीत शिबिराच्या निवास, भोजन, स्वागत, प्रसिद्धी व तांत्रिक व्यवस्था यांसाठी विविध समित्यांच्या जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या. व्यासपीठाचे संचालन गिरधरजी देशमुख (पतंजली योग समिती जिल्हा प्रभारी) यांनी केले, तर संतोषजी चांडक यांनी आभार प्रदर्शन केले.महिला पतंजली जिल्हा प्रभारी अर्चनाताई डोईफोडे यांनी स्वागतगीताने पाहुण्यांचे स्वागत केले.शेवटी सर्व उपस्थित कार्यकर्त्यांनी एकमताने संकल्प केला की आगामी एकात्मिक योग शिबिर आणि योग महासंमेलन ऐतिहासिक, प्रेरणादायी आणि समाजहिताचे ठरेल.या बैठकीस नंदकिशोरजी राठी, हरिहरजी गिलोरकर, राजूभाऊ डांगे, नेहा काकपुरे, भीमरावजी सांगोळे, गणेशजी रामेकर, नरेंद्रजी गावंडे आदींची उपस्थिती होती.

# चारित्र्य प्रमाणपत्राशिवाय कंत्राटी कर्मचाऱ्याऱ्यांची भरतीच नको

## महापालिका आयुक्ताने जारी केले आदेश

**अमरावती/का.प्र.**

रिक्त पदांमुळे महापालिकेच्या वेगवेगळ्या कार्यालयांत कंत्राटी कर्मचारी मोठ्या संख्येने असून, त्यातही महत्त्वाची बाब म्हणजे राजकीय कार्यकर्तेच कर्मचारी बनले आहेत. त्यामुळे बेलगाम होत चाललेले हे कर्मचारी आता विभागप्रमुखांसाठीही डोकेदुखी ठरले असल्याचे चित्र आहे. आतापर्यंत कार्यकर्ते कर्मचारी म्हणून रूजू होत होते. आता मात्र कंत्राटी कर्मचारी उघडपणे राजकीय पक्षांमध्ये प्रवेश घेत असल्याचे दिसून येत आहे. अग्निशमन विभागात नुकताच असा प्रकार घडलेला आहे. अगदी गुन्हेगारी प्रवृत्तीचेही कर्मचारी महापालिकेत कार्यरत असल्याची धक्कादायक माहिती मिळताच मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांनी चारित्र्य प्रमाणपत्राशिवाय कर्मचाऱ्यांची भरती करू नये, असे आदेश जारी केले आहेत.

अग्निशमन विभागासह उद्यान विभागातील सात ते आठ कंत्राटी कर्मचाऱ्यांनी एका राजकीय पक्षात प्रवेश घेतल्याची तक्रार आयुक्त सौम्या शर्मा यांच्याकडे प्राप्त झाली होती. त्यामुळे आयुक्तांच्या आदेशानंतर दोन दिवसांपूर्वीच त्या कर्मचाऱ्यांना कार्यमुक्त करण्यात आले. शिवाय आता प्रत्येक कंत्राटी कर्मचाऱ्याला चारित्र्य प्रमाणपत्र सादर करावे लागणार आहे; अग्निशमन उपकेंद्रातील एका कर्मचाऱ्याचा गत सप्टेंबर महिन्यात झालेल्या व्यापाऱ्याच्या अपहरण प्रकरणात सहभाग



असल्याचे उघड झाले होते. त्यामुळे त्याला अटकही करण्यात आली. गंभीर बाब म्हणजे त्याला अटक झाली असतानाही तो कर्तव्यावर कार्यरत असल्याचो दाखविण्यात आले. याशिवाय बांधकाम विभाग, स्वच्छता विभाग, झोन कार्यालयांतही राजकीय कार्यकर्ते कंत्राटी कर्मचारी म्हणून कार्यरत आहे. महापालिकेत बड्या बनून नेत्यांच्या बैठकीला संबंधित कर्मचारी, कार्यकर्ते बिनदिक्कतपणे काम सोडून नेत्यांच्या अवतीभोवती वावरत असल्याचे दिसून येते. अनेक कंत्राटी कर्मचारी गरजवंत असून, महिनोमहिने त्यांना वेतन मिळत नसतानही ते प्रामाणिकपणे सेवा देत आहेत; त्यामुळे राजकीय आणि गुन्हेगारी प्रवृत्तीच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांवर आयुक्तांनीच वचक निर्माण करणे आवश्यक आहे, अशी अपेक्षा अधिकारी व कर्मचारी वर्गाकडून व्यक्त होत आहे.

# एनएसयुआय प्रदेश उपाध्यक्षपदी संकेत कुलट, जिल्हाध्यक्षपदी सर्वेश खांडे यांची नियुक्ती

**अमरावती/का.प्र.**

अमरावती (प्रतिनिधी) दि. २६ : अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या नेतृत्वाखाली नॅशनल स्टुडंट्स युनियन ऑफ इंडियाच्या (एनएसयुआय) महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी संकेत कुलट व अमरावती जिल्हाध्यक्षपदी सर्वेश खांडे यांची नियुक्ती झाली आहे.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, राष्ट्रीय नेत्या सोनिया गांधी, काँग्रेसचे नेते राहुल गांधी, एनएसआयचे राष्ट्रीय प्रभारी कन्हैया कुमार आणि एनएसयुआयचे राष्ट्रीय अध्यक्ष वरुण चौधरी यांच्या मान्यतेने तसेच राष्ट्रीय सचिव व महाराष्ट्र प्रभारी अक्षय यादव क्रांतीवीर आणि राष्ट्रीय सचिव व महाराष्ट्र प्रभारी कांता ग्वाला यांच्या सहमतीने ही नियुक्ती करण्यात आलेली आहे. याशिवाय एनएसयुआयचे प्रदेशाध्यक्ष सागर साळुंखे, माजीमंत्री यशोमतीताई ठाकूर, माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख, अमरावती शहर काँग्रेस कमिटी अध्यक्ष बबलू शेखावत, अमरावती ग्रामीण जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख, माजी महापौर विलास इंगोले, माजी महापौर मिलिंद चिमोटे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी प्रवक्ते दिलीप एडतकर आणि प्रदेश उपाध्यक्ष भैय्या पवार यांच्या संमतीने ही निवड झाली आहे.

संकेत कुलट व सर्वेश खांडे यांच्या नियुक्तीमुळे काँग्रेसच्या विद्यार्थी चळवळीला नवे बळ मिळणार आहे, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. संकेत कुलट व सर्वेश खांडे धडाडीचे आणि समर्पित कार्यकर्ते असून विद्यार्थ्यांच्या हक्कांसाठी, शिक्षण सुधारणेसाठी आणि सामाजिक न्यायासाठी लढणारे युवा नेतृत्व आहे. उभयतांची निवड विद्यार्थी चळवळीला नवे वळण देणारी संधी आहे, असे विद्यार्थी वर्तुळात मानले जात आहे.

# सीआयएचे अधिकारी किरियाको यांचा गौप्यस्फोट !

अमेरिकेची गुप्तहेर संस्था सीआयएचे एक माजी अधिकारी जॉन किरियाको यांनी एका वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत पाकिस्तानबाबत बरेच गौप्यस्फोट केले आहेत.जॉन किरियाको हे बरीच वर्षे सीआयएच्या पाकिस्तानमधील दहशतवाद्यांच्या विरोधातील मोहिमेचे प्रमुख होते. पाकिस्तानच्या अणूबॉम्बचे जनक अब्दुल कादिर खान यांच्या विषयी एक खळबळजनक दावा किरियाको यांनी आपल्या मुलाखतीत केला.

अब्दुल कादिर खान यांची हत्या करण्याची योजना सीआयएने तयार केली होती. मात्र सौदी अरेबियाच्या हस्तक्षेपामुळे सीआयएला ती योजना अंमलात आणता आली नाही, असा दावा किरियाको यांनी आपल्या मुलाखतीत केला.ते म्हणाले की अब्दुल कादिर खान यांना संपवणे हे अमेरिकेसाठी अतिशय सोपे काम होते, अमेरिकेला खान यांच्या बाबतीतील बारीकसारीक माहिती होती.ते कुठे राहतात, ते दिवसभर काय करतात याची बित्तंबातमी अमेरिकेला होती.किरियाको यांचा एक सहकारी अब्दुल कादिर खान यांच्या बरोबर काम करत होता, त्यामुळे त्यांना संपवणे आमच्यासाठी अतिशय सोपे होते, असे किरियाको यांनी मुलाखतीत सांगितले.अब्दुल कादिर खान यांच्या अणूविषयक कार्यक्रमाला सौदी अरेबियाचा मजबूत पाठिंबा असल्याने, सौदी सरकारच्या अधिकाऱ्यांनी अमेरिकेला विनंती केली की खान यांना हात लावू नका.सौदी अरेबियाने पाकिस्तानच्या अणूविषयक कार्यक्रमाला आर्थिक पाठबळ पुरवल्याचे त्यावेळी बोलले जात होते.त्यामुळे खान यांना हात लावू नका अशी विनंती सौदी अरेबियाने, अमेरिकेला केली असेल तर ती गोष्ट समजण्यासारखी होती. मुलाखतीत किरियाको यांनी असाही खळबळजनक दावा केला की पाकिस्तानचे माजी अध्यक्ष परवेझ मुशर्रफ यांनी पाकिस्तानच्या परमाणू शस्त्रागाराचा ताबा अमेरिकेकडे सोपवला होता.अमेरिकेने पाकिस्तानला प्रचंड प्रमाणात लष्करी आणि आर्थिक मदत पुरवून मुशर्रफ यांना खरेदी केले होते, असाही दावा करून त्यांनी पुढे सांगितले की अमेरिका जे काही सांगेल त्याला मुशर्रफ हे निमुटपणे संमती देत होते.मुशर्रफ यांच्या सारख्या हुकूमशहा बरोबर काम करणे, अमेरीकेला आवडत होते, कारण त्यांच्या बरोबर काम करताना पाकिस्तानातील जनता आणि मिडिया यांची काळजी करण्याचे कारण नव्हते.११ सप्टेंबर २००१ रोजी अमेरिकेतील वर्ल्ड ट्रेड सेंटरवर अतिरेक्यांनी भीषण हल्ला केल्यानंतर अमेरिकेला पाकिस्तानच्या अण्वस्त्र सुरक्षिततेविषयी चिंता वाटू लागली होती.अमेरिकेला वाटणारी काळजी दोन कारणांवर



आधारित होती.

पहिले कारण म्हणजे पाकिस्तानचे तत्कालीन अध्यक्ष परवेझ मुशर्रफ हे त्यांच्या पदावर रहातील की नाही याबाबत अमेरिकेला शंका वाटत होती.परवेझ मुशर्रफ हे अध्यक्षपदावरून जाऊन त्यांच्या जागी एखादी अतिरेकी व्यक्ती पाकिस्तानमध्ये सत्तेवर आल्यास पाकिस्तानची अण्वस्त्रे धोक्यात सापडणार होती.अमेरिकेला दुसरी शंका अशी वाटत होती की पाकिस्तानची अण्वस्त्रे सुरक्षित राखण्याइतकी ताकद तत्कालीन पाकिस्तानी सत्ताधाऱ्यांमध्ये आहे का? पाकिस्तानची अण्वस्त्रे अतिरेकी संघटनांच्या हातात पडण्याची भीती अमेरिकेला सतत सतावत होती.पाकिस्तानचे तत्कालीन अध्यक्ष परवेझ मुशर्रफ यांनी पाकिस्तान मधील अण्वस्त्रांच्या सुरक्षेबाबत अमेरिकेला हमी देऊनही अमेरिकेला त्याबाबत खात्री वाटत नव्हती.पाकिस्तानला भेट देणारा प्रत्येक अमेरिकन अधिकारी अण्वस्त्रांच्या सुरक्षेविषयी चिंता व्यक्त करत होता.भूतकाळात पाकिस्तानकडून अणुविषयक तंत्रज्ञान गुप्तपणे काही देशांना पुरवण्यात आल्याबद्दल अमेरिकेकडून पाकिस्तानला प्रश्न विचारले जात होते.अमेरिकेचा रोख अर्थातच पाकिस्तानच्या अणूबॉम्बचे जनक अब्दुल कादिर खान यांच्या दिशेने होता.परंतु अमेरिकेकडे त्याविषयी ठोस पुरावा नव्हता.अब्दुल कादिर खान यांच्या संशयास्पद कारवायांविषयीची माहिती २००२ सालापासून बाहेर येऊ लागली होती.अब्दुल कादिर खान यांनी अणूविषयक तंत्रज्ञान गुप्तपणे उत्तर कोरियाला पुरवल्याचा दाट संशय अमेरिकेला होता.परंतु पाकिस्तानकडून असे सांगण्यात येत होते की पारंपरिक शस्त्रे विकसीत करण्यासाठी उत्तर कोरियाला पाकिस्तानने सहकार्य केले असले तरी अण्वस्त्रांच्या बाबतीत मात्र कोणतेही सहकार्य केलेले नाही.अर्थात अमेरिकेला अब्दुल कादिर खान यांच्या बद्दल वाटणारा संशय त्यानंतरही कायम होता.खान यांच्या संशेयास्पद कारवायांची चौकशी करण्यात यावी म्हणून पाकिस्तानवर अमेरिकेकडून दडपण आणले गेले.२००३ मध्ये इंटरनॅशनल ॲटोमिक एनर्जी एजन्सीने जेंव्हा इराणच्या अणूविषयक कार्यक्रमाची तपासणी केली तेंव्हा इराणने चोरट्या मार्गाने अणुविषयक तंत्रज्ञान मिळवल्याचे उघडकीस आले.त्यावरुन हे तंत्रज्ञान अब्दुल कादिर खान यांनीच इराणला गुप्तपणे पुरवल्याच्या संशयाला बळ प्राप्त झाले.सप्टेंबर २००३ मध्ये पाकिस्तानचे तत्कालीन अध्यक्ष परवेझ मुशर्रफ हे जेव्हा संयुक्त राष्ट्रांच्या परिषदेला हजर राहण्यासाठी अमेरिकेला गेले होते तेव्हा अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष बुश यांनी त्यांना एका बाजूला घेऊन विचारले की अमेरिकन गुप्तहेर संस्था सीआयएचे संचालक जॉर्ज टेनेट यांच्यासाठी ते थोडा वेळ काढू शकतील का? तुम्ही त्यांना भेटणे अतिशय गरजेचे असल्याचे बुश यांनी मुशर्रफ यांना सांगितले. 'इन द लाईन ऑफ फायर' या आपल्या पुस्तकात मुशर्रफ यांनी नमूद केल्याप्रमाणे, मुशर्रफ हे ज्या हॉटेलमध्ये उतरले होते तेथे सीआयएचे संचालक जॉर्ज टेनेट यांनी त्यांची भेट घेतली.टेनेट यांनी काही कागद आपल्या बॅगेतून बाहेर काढले आणि ते कागद मुशर्रफ यांच्या समोर ठेवले.त्या कागदांवर पाकिस्तानच्या पी-१ सेन्ट्रिफ्यूजची ड्रॉइंग्ज काढण्यात आली होती.ती ड्रॉइंग्ज अब्दुल कादिर खान यांच्या मार्गदर्शनाखाली काढण्यात आली होती.

त्या कागदांवर खान यांचे नाव नसले तरी त्या पाठीमागे खानचं असणार हे उघड होते.ते कागद मी बरोबर घेऊन जातो म्हणजे मला त्या बाबतीत चौकशी करता येईल असे मुशर्रफ यांनी टेनेट यांना सांगितले.टेनेट यांनी त्याला संमती दिली.सीआयएचे माजी अधिकारी जॉन किरियाको यांनी आपल्या मुलाखतीत केलेले गौप्यस्फोट, अमेरिका आणि पाकिस्तान यांच्यातील संबंधांवर प्रकाश टाकणारे आहेत.त्यामधून जगाला ज्ञात नसलेल्या अनेक गोष्टी बाहेर आल्या आहेत.

**अभय गोखले**

# विज्ञानरत्न डॉ.जयंत नारळीकर

जगप्रसिद्ध खगोल - भौतिक शास्त्रज्ञ आणि विज्ञानकथा लेखक, पद्मविभूषण स्वर्गीय डॉ जयंत नारळीकर यांना यंदाचा मरणोत्तर विज्ञानरत्न पुरस्कार जाहीर झाला आहे. विज्ञानरत्न हा वैज्ञानिक क्षेत्रातील सर्वोच्च पुरस्कार समजला जातो. डॉ जयंत नारळीकर यांना मरणोत्तर का होईना हा पुरस्कार मिळाल्याने खगोलप्रेमींना कमालीचा आनंद झाला आहे. कारण या पुरस्कारावर त्यांचा हक्कच होता. डॉ जयंत नारळीकर यांना हा पुरस्कार त्यांच्या हयातीतच मिळाला असता तर आणखी आनंद झाला असता पण असो देर आये दुरुस्त आये असे म्हणत या पुरस्काराचे स्वागत करायला हवे. डॉ जयंत नारळीकर यांचे याच वर्षी २० मे रोजी वयाच्या ८६ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले होते. त्यांच्या निधनाने बहुविध प्रतिभेचे धनी असलेले व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले. डॉ जयंत नारळीकर यांचा जन्म १९ जुलै १९३८ रोजी कोल्हापूर येथे कोल्हापूर येथे झाला. त्यांचे वडील रँग्लर विष्णू वासुदेव नारळीकर हे प्रसिद्ध गणीततज्ञ होते. ते वाराणसी येथील बनारस विश्व



विद्यापीठाच्या गणित विभागाचे प्रमुख होते तर आई सुमती या संस्कृत विदुषी होत्या. वाराणसी येथे शालेय शिक्षण पूर्ण केलेल्या नारळीकर यांनी १९५७ साली विज्ञानाची पदवी प्राप्त केली. (बीएस्सी ) त्यानंतर ते उच्च शिक्षणासाठी ब्रिटनमधील केम्ब्रिज येथे गेले. तिथे त्यांनी बीए, एमए आणि पीएचडी या पदव्या मिळवल्या. शिवाय रँग्लर आणि खगोल शास्त्राचे टायसन मेडल आणि इतर अनेक बक्षिसे मिळवली. त्यांचे पिएचडीचे गाईड डॉ फ्रेड हॉईल यांच्या साथीने त्यांनी स्थिर स्थिती सिद्धांतावर संशोधन केले व जगप्रसिद्ध बिग बँग सिद्धांताला आव्हान देणारा नवा सिद्धांत तयार केला. १९६६ साली नारळीकर यांचा विवाह मंगला राजवाडे ( गणितज्ञ ) ह्यांच्याशी झाला. त्यांना तीन मुली आहेत गीता, गिरिजा लीलावती. १९७२ साली ते मुंबईत परतले. तिथे त्यांनी टाटा मूलभूत संशोधन संस्थेच्या खगोलशास्त्र विभागाचे प्रमुख म्हणून जबाबदारी स्वीकारली. १९८८ साली त्यांची पुणे येथील आयुका संस्थेचे संचालक म्हणून नियुक्ती झाली. डॉ जयंत नारळीकर यांनी पाच दशकांहून अधिक काळ खगोल आणि भौतिक शास्त्रात संशोधन केले. त्याच बरोबर सतत पुस्तके लिहिण्याचा कार्यक्रमही चालू ठेवला. डॉ जयंत नारळीकर हे रुढार्थाने साहित्यिक नसले तरी त्यांनी केलेले लेखन हे दर्जेदार साहित्यिकापेक्षा कमी दर्जाचे नाही. विज्ञानकथेसारखा वेगळा प्रवाह मराठी साहित्यात रुजविण्याचे मोठे काम त्यांनी केले. विज्ञानासारखा रुक्ष आणि अवघड विषय ललित साहित्याच्या अंगाने मांडून त्याला सर्वसामान्य वाचकांपर्यंत पोहचवण्याचे अवघड व महत्वाचे कार्य त्यांनी केले. त्यांनी केलेले विज्ञानविषयक लेखन व सुरस विज्ञान कथा यामुळे विद्यार्थ्यांना विज्ञानाची गोडी लागली. खगोल शास्त्रात सातत्याने संशोधन करत असताना डॉ जयंत नारळीकरांनी लेखनही चालू ठेवले. त्यांनी अनेक विज्ञानकथा लिहिल्या. त्यांची यक्षाची देणगी, अंतराळवीर, भस्मासुर, टाइम मशीनची किमया, प्रेषित, अभयारण्य, याला जीवन ऐसे नाव, वामन परत आला, गणितातील गमतीजमती, नभात हसरे तारे, नव्या सहस्त्रकाचे नवे विज्ञान, विज्ञान आणि वैज्ञानिक, विज्ञानगंगेचे अवखळ वळणे, विज्ञानाची गरुडझेप, विज्ञानाचे रयचिते ही पुस्तके गाजली. त्यांनी लिहिलेले आकाशाशी जडले नाते व अंतराळ आणि विज्ञान ही पुस्तके प्रचंड गाजले. ही पुस्तके म्हणजे त्यांच्या दर्जेदार साहित्याचे उत्तम उदाहरण आहेत. तीन नगरातील माझे विश्व हे त्यांचे आत्मचरित्रही प्रसिध्द आहे. यक्षाची देणगी या त्यांच्या पहिल्याच पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला होता. सामान्य माणसाला खगोल शास्त्र समजवण्यासाठी त्यांनी अनेक वर्ष प्रयत्न केले. आपल्या लेखनातून त्यांनी अंधश्रद्धा दूर करण्याचाही प्रयत्न केला. बहुविध प्रतिभेचे धनी असलेले डॉ जयंत नारळीकर यांच्यासारख्या व्रतस्थ व्यक्तीमत्वास ९४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद मिळाले हा त्यांच्या बहुविध प्रतिभेचा गौरव होता. डॉ जयंत नारळीकर यांच्यासारखे जेष्ठ विज्ञानविषयक लेखक साहित्य संमेलनाचे अध्यक्ष बनल्यामुळे विज्ञान साहित्याला अधिकाधिक प्रतिष्ठा लाभली तसेच विज्ञानाचा प्रसार होण्यास व तरुण पिढीमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होण्यास त्यांच्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा खूप उपयोग झाला.

**श्याम बसप्पा ठाणेदार**

# शांत झालयं घरटं

आठवणी माणसाला लाभलेलं एक वरदान ! ह्या गत स्मृतींच्या आधारानेच तर जीवन चालू राहतं. आठवणींच्या हिंदोळ्यावर बसून उंच उंच झोके घेत. सर्व कर्तव्ये निभावल्यावर उराशी जपायच्या त्या मधुर सुंदर आठवणी.पुढची वाटचाल सुगंधी करणाऱ्या, प्रेरणा देणाऱ्या ह्या आठवणी. नुकतीच दिवाळी संपत आली. परदेशातून आलेली मुले सुना नातवंड यांनी घर गोकुळ बनलं परंतु सुट्ट्या संपल्यात घराकडे आलेली लेकरं आपापल्या दिशेने उडून जातील आणि मग कधी परतणार या वाटेकडे आई-वडिलांचे डोळे लागतील.

मुलांच्या प्रगतीत बाधा येऊ नये म्हणून त्यांना भावनात्मक होऊन थांब न म्हणणारे मनातल्या मनात घुसमटणारे वृद्ध दांपत्य सोबत तर कुठे एकटेच आठवणीच्या गोतावळ्यात दंग होतील.स्मृतींच्या उद्यानात तो/ती स्वतःच्याच मनाशी संवाद साधत बसले होते. निवांतपणा, जबाबदाऱ्यांची हलकी झालेली बंधने, भरपूर मोकळा वेळ.कधी मुलामुलींचे बालपणीचे दिवस आठवतात.भरलेल उबदार घर, सौख्यदायी ! शाळा-कॉलेजमधले रम्य दिवस ,कधी



सोनेरी यश तर कधी अपयशाचे कडू घोट गिळत करीअरची सुरवात होऊन जम बसेपर्यंतच झालेला विवाह.. मुलगा/मुलगी हो म्हणत नातेवाईकांनी उधळलेली स्तुती-सुमने ! नावाचे घातलेले बारसे, किलबिल.. चिवचिवाट अनं संसारात मग्न ! आता शांत झालेलं घरटंष्ठकिती आठवणींचे पदर गुंफलेत हे घरटे विणताना ष्ठकधी ऊन पाऊस ,कधी सुख-दुःख , मान–सन्मान ष्ठसगळे आघात सहन करत मनात जपून ठेवलेल्या आठवणींचा गोफ बनतो ष्ठमन ह्या आठवणींचा धांडोळा घ्यायला आतुर असतंष्ठ अगदी मनाच्या डोहात खोल तळाशी डोकावून हाताशी काय लागतंय त्याचा अंदाज बांधत..मनाच्या अल्बम मधील एकेका फोटोवर स्थिरावेलष्ठ. परदेशातले लाखोंच्या घरात सांगणारे करोडो पर्यंत जाणारे पॅकेज हे खरोखरच भारतात मिळणाऱ्या मिळकतीपेक्षा कुटुंबाबरोबर राहण्यापेक्षा मोठे आहे ? किंवा मग घरट सोडून गेलेल्या पक्षांना बंनलो नावाच घरट मिळालं की, आपल्या जुन्या घरट्यात परतण्याची इच्छाच होत नसावी ? महत्त्वाची बाब म्हणजे तिथे मिळणारे उत्पन्न विचार केला असता खरोखर इथे मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा परवडणारे आहे तरी का ? परिवर्तन जगाचा नियम आह. मुलांना पंख फुटली की उडू द्यावं लागतं परंतु सरते शेवटी आठवणींच्या गोतावळ्यात स्वतःला अडकून घ्यायचं का ? मोबाईल नामक डबड्यामधून व्हिडिओ कॉल होत असला तरी शेवटच्या क्षणी रक्ताचा तरी स्पर्श मिळतो का ? तुटपुंजा मिळकतीत माझी मुलं माझ्या मुलांचे शिक्षण करत आपल्या इच्छा आकांक्षा डावलून समदं आयुष्य घालवलेल्या आई-वडिल मुलांसमोर हरलेले असतात का ? असे अनेक प्रश्न पडत असून आठवणींना बांध घालणं अवघडच...!

**कंचन मुरके,** अमरावती

# ॲनिमेशन : कल्पनाशक्ती, तंत्रज्ञान आणि समाजाचा बदलता चेहरा

२८ ऑक्टोबर हा दिवस जगभरात 'आंतरराष्ट्रीय ॲनिमेशन दिन' म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे मूळ १८९२ सालच्या फ्रान्समध्ये दडलेले आहे, जेव्हा एमिल रेनॉ यांनी पॅरिसमधील 'म्युझियम ग्रेव्हिन' येथे 'Pantomimes Lumineuses' हा जगातील पहिला ॲनिमेटेड फिल्म शो सादर केला. त्या घटनेने मानवाच्या कल्पनाशक्तीला आणि दृश्य तंत्रज्ञानाला एक नवीन दिशा दिली. त्या स्मरणार्थ युनेस्कोच्या आंतरराष्ट्रीय ॲनिमेशन संघटनेने (ASIFA) २८ ऑक्टोबर हा दिवस ॲनिमेशनचा जागतिक उत्सव म्हणून मान्यता दिली. आज हा दिवस केवळ कलाविष्काराचा सन्मान नाही, तर मानवी सर्जनशीलता, सामाजिक परिवर्तन, आणि सांस्कृतिक संवादाचे प्रतीक बनला आहे. ॲनिमेशन म्हणजे केवळ बालकांचे मनोरंजन नव्हे; ते एक सांस्कृतिक, शैक्षणिक आणि समाजशास्त्रीय माध्यम आहे. चलतचित्रांच्या माध्यमातून कल्पनांना जीवन देणारे हे कला-साहित्य मानवी मनोविज्ञान, सामाजिक मूल्ये आणि सांस्कृतिक अभिव्यक्ती यांचे एकत्रित रूप आहे. समाजशास्त्रीय दृष्टीने पाहता, ॲनिमेशन हे केवळ दृश्य कलारूप नसून, समाजातील विचारप्रवाह, सत्तासंबंध, लिंगभेद, वर्गभेद आणि सांस्कृतिक ओळख यांचे प्रतिबिंब आहे.

ॲनिमेशनचा इतिहास हा मानवाच्या कल्पनाशक्तीच्या प्रगतीचा इतिहास आहे. गुहेतील चित्रांपासून ते डिजिटल 3D आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित दृश्यांपर्यंतची ही उत्क्रांती म्हणजे सर्जनशीलतेचा प्रवास आहे. समाजशास्त्रज्ञ मॉरिस हाल्बवाच्स यांनी मांडलेल्या 'सामूहिक स्मृती' (Collective Memory) या संकल्पनेनुसार, प्रत्येक समाज आपल्या इतिहास आणि संस्कृतीचे संरक्षण आठवणींमधून करतो. ॲनिमेशन ही त्या स्मृती जिवंत ठेवण्याची आधुनिक पद्धत आहे. पौराणिक कथा, लोककथा, ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वे आणि सामाजिक विचार हे सर्व आज ॲनिमेशनच्या माध्यमातून नव्या पिढीकडे पोहोचत आहेत. भारतातील ॲनिमेशनचा प्रवास स्वतंत्र आणि बहुआयामी आहे. १९५६ साली माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या फिल्म विभागाने 'The Banyan Deer' हा पहिला भारतीय ॲनिमेशन चित्रपट प्रदर्शित केला. त्यानंतर राम मोहन, भिमसेन, जी.के. गोखले, कैलाश रेखी यांनी भारतीय ॲनिमेशनला जागतिक ओळख दिली. 'रामायण', 'हनुमान', 'पंचतंत्र कथा', 'छोटा भीम', 'मोटू पतलू', 'शक्तिमान', 'आर्यन' यांसारख्या ॲनिमेशन मालिका भारतीय संस्कृती, नैतिकता आणि सामाजिक विचारांना दृश्यरूप देतात. या कलाकृतींनी ग्रामीण आणि नागरी समाजातील मुलांपर्यंत सांस्कृतिक वारसा पोहोचवण्याचे कार्य केले आहे.

समाजशास्त्रीयदृष्ट्या ॲनिमेशन ही सामाजिकरणाची प्रक्रिया घडविणारे माध्यम आहे. एमिल दुर्खीम यांच्या मते, समाजातील प्रत्येक संस्था सामाजिक



ऐक्य वाढवते. ॲनिमेशनमधून मुलां मध्ये नैतिक मूल्ये, सहानुभूती, प्रामाणिकपणा, सहकार्य आणि पर्यावरणाबद्दलची जाणीव विकसित होते. उदा. 'पंचतंत्र कथा' अथवा 'जातक कथा' यांवर आधारित ॲनिमेशनमधून जीवनमूल्ये अत्यंत सोप्या व रंजक पद्धतीने सांगितली जातात. ॲनिमेशनमधील दृश्य आणि भावनिक सादरीकरणामुळे बालकांच्या मनावर त्या मूल्यांचा दीर्घकालीन प्रभाव पडतो. परंतु ॲनिमेशन केवळ मूल्यसंस्कारच रुजवत नाही; ते समाजातील असमानता, सत्तासंबंध आणि विचारसरणी देखील प्रतिबिंबित करते. अनेक लोकप्रिय ॲनिमेशन चित्रपटांमध्ये पाश्चात्त्य विचारसरणी, पुरुषप्रधानता आणि उपभोगतावादी जीवनशैलीचे दर्शन घडते. पियरे बोर्द्यू (Pierre Bourdieu) यांच्या 'सांस्कृतिक भांडवल' (Cultural Capital) या संकल्पनेनुसार, समाजातील कलामाध्यमे ही सत्ता आणि वर्गसंघर्षाशी निगडित असतात. ॲनिमेशनही त्याला अपवाद नाही. डिस्ने, पिक्सार, ड्रीमवर्क्स यांसारख्या कंपन्यांनी जगभरात सांस्कृतिक कल्पना पसरवल्या पण त्या प्रामुख्याने पाश्चात्त्य मूल्यांवर आधारित आहेत. परिणामी, स्थानिक संस्कृती आणि परंपरा हळूहळू बाजूला पडतात. तथापि, भारतीय ॲनिमेशनने या प्रवाहाला वेगळी दिशा दिली आहे. भारतीय निर्मात्यांनी लोककथांवर, आणि भारतीय नैतिक तत्त्वांवर आधारित कथा मांडल्या. 'छोटा भीम' सारख्या कथांमध्ये भारतीय सामाजिक मूल्ये, कुटुंबव्यवस्था आणि नैतिकतेचे दर्शन घडते. अशा प्रकारे ॲनिमेशन समाजातील संस्कृतीचा प्रसार आणि सांस्कृतिक ओळख जपण्याचे कार्य करते. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, अनिमेशन हे एक सांस्कृतिक संवादाचे साधन आहे. समाजातील वेगवेगळ्या गटांना एकत्र आणणारे, त्यांच्या कथा आणि भावना मांडणारे हे माध्यम विविधता टिकवून ठेवते. उदा. आदिवासी जीवन, पर्यावरणीय प्रश्न, महिला सक्षमीकरण, आणि सामाजिक न्याय या विषयांवरील ॲनिमेशन चित्रपटांद्वारे सामाजिक जाणीवा अधिक प्रभावीपणे पोहोचतात.

## 'आंतरराष्ट्रीय ॲनिमेशन दिन'

ॲडोर्नो आणि हॉर्कहायमर यांनी 'Culture Industry' ही संकल्पना मांडताना दाखवले की, आधुनिक माध्यमे उपभोगवादी संस्कृती वाढवतात. ॲनिमेशन उद्योग याच प्रवृत्तीचे आधुनिक रूप आहे. लोकप्रिय पात्रांवर आधारित खेळणी, कपडे, खाद्यपदार्थ, आणि मोबाइल गेम्स यांच्या विक्रीमुळे ॲनिमेशन हे भांडवलशाही संस्कृतीचे प्रमुख साधन बनले आहे. या प्रक्रियेत बालकांचे मन उपभोगाच्या संस्कृतीकडे आकर्षित होते. परंतु त्याचबरोबर शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक संदेशांसाठी ॲनिमेशनचा उपयोग केल्यास ते परिवर्तनाचे सामर्थ्यवान माध्यम ठरते. सध्या शैक्षणिक ॲनिमेशन ही संकल्पना अत्यंत लोकप्रिय झाली आहे. 'एडुटेनमेंट' (Education + Entertainment) या पद्धतीद्वारे विज्ञान, इतिहास, गणित आणि सामाजिक शास्त्रे यांची समज विद्यार्थ्यांना सोप्या, दृश्यप्रधान आणि रंजक स्वरूपात करून देण्यात येते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी हे विशेषतः उपयुक्त ठरते. समाजातील ज्ञानाचे लोकशाहीकरण घडविण्याचे कार्य ॲनिमेशन प्रभावीपणे करत आहे. डिजिटल युगात ॲनिमेशनचे रूप अत्यंत व्यापक झाले आहे. 3D, आर्णि्ंद यांसारख्या तंत्रज्ञानामुळे ॲनिमेशन आता कल्पनेच्या मर्यादा ओलांडून वास्तवाशी मिसळत आहे. YouTube, Netflix, Hotstar, Amazon Prime सारख्या प्लॅटफॉर्म्सनी या कलारूपाला जागतिक बाजारपेठ उपलब्ध करून दिली आहे. भारतीय निर्माते जागतिक दर्जाचे ॲनिमेशन तयार करत आहेत आणि 'Make in India' अंतर्गत ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्ट्स, गेमिंग आणि कॉमिक्स क्षेत्रात मोठ्या रोजगारनिर्मितीच्या संधी निर्माण होत आहेत. National Skill Development Corporation च्या अहवालानुसार, २०३० पर्यंत या क्षेत्रात सुमारे २० लाख नोकऱ्या निर्माण होऊ शकतात.तथापि, ॲनिमेशनचा समाजावर होणारा परिणाम सकारात्मक आणि नकारात्मक अशा दोन्ही बाजूंनी पाहिला पाहिजे. हिंसा, लिंगभेद, अति-उपभोग आणि अवास्तव कल्पना दाखवणाऱ्या ॲनिमेशनमुळे बालकांच्या मनावर नकारात्मक परिणाम होऊ शकतात. त्यामुळे माध्यम साक्षरता (Media Literacy) वाढवणे अत्यंत आवश्यक आहे, ज्यायोगे प्रेक्षक ॲनिमेशनमधील संदेशांची चिकित्सक दृष्टीने व्याख्या करू शकतील. समाजशास्त्राच्या परिप्रेक्ष्यात ॲनिमेशन हे 'आरसा' आहे, जो समाजातील वास्तव दाखवतो, आणि कधी कधी ते वास्तव बदलण्याची प्रेरणाही देतो. सामाजिक असमानता, लिंगभेद, पर्यावरणीय संकट, युद्ध, शांती, आणि मानवतेचे प्रश्न हे सर्व ॲनिमेशनच्या माध्यमातून संवेदनशील आणि प्रभावीपणे मांडता येतात. त्यामुळे ॲनिमेशन ही केवळ कलात्मक अभिव्यक्ती नव्हे, तर सामाजिक परिवर्तनाची शक्ती आहे.

२८ ऑक्टोबरचा 'आंतरराष्ट्रीय ॲनिमेशन दिन' आपल्याला आठवण करून देतो की मानवी कल्पनाशक्ती अमर्याद आहे. ती समाजातील बंधने मोडून नवीन विचार, नवीन संस्कृती आणि नवीन दृष्टिकोन निर्माण करू शकते. ॲनिमेशन ही केवळ कला नाही, ती कल्पनाशक्तीच्या समाजशास्त्राचे दृश्य रूप आहे, जिथे तंत्रज्ञान आणि मानवी भावना एकत्र येतात, आणि जिथे प्रत्येक रंग, प्रत्येक चळवळ, प्रत्येक पात्र समाजाच्या आरशात नवीन प्रतिबिंब निर्माण करते. आजच्या डिजिटल जगात, जिथे माहिती आणि प्रतिमा सर्वत्र उपलब्ध आहेत, तिथे ॲनिमेशन समाजाला विचार करण्यास, संवेदनशील होण्यास आणि बदल घडविण्यास प्रवृत्त करते. म्हणूनच ॲनिमेशनकडे केवळ मनोरंजन म्हणून न पाहता, ते मानवी कल्पनाशक्तीचे सामाजिक माध्यम म्हणून ओळखले पाहिजे. हाच या दिवसाचा खरा संदेश की ॲनिमेशन म्हणजे मानवी विचारांचा, संस्कृतीचा आणि समाजाचा अखंड प्रवास आहे.

**डॉ. राजेंद्र बगाटे**

# घरकुल लाभार्थ्याचा मानसिक छळ : अभियंत्याचा प्रताप

## पिंपळखुटा येथील लाभार्थ्यांचा आत्मदहनाचा इशारा

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील पिंपळखुटा येथील घरकुल योजनेतील लाभार्थी युसुफ शाह अय्युब शाह यांच्यावर ग्रामपंचायत सरपंच अल्का वाहोकार, सरपंच पती सुभाष वाहोकार, सचिव सागर रोठे, तसेच पंचायत समितीतील अभियंता पवन बढे यांनी मानसिक छळ केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या छळाला कंटाळून युसुफ शाह यांनी आत्मदहनाचा इशारा दिला असून, याबाबतची लेखी तक्रार त्यांनी जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे २७ ऑक्टोबर रोजी सादर केली आहे.

युसुफ शाह यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, गावात अनेकांचे अतिक्रमण असताना केवळ त्यांनाच



वेठीस धरून वारंवार अतिक्रमण नोटिसा पाठविल्या जात आहेत. शासनाच्या घरकुल योजनेअंतर्गत त्यांना १५ हजार रुपयांचा पहिला हप्ता मिळाला होता. त्या रकमेतील जोत्यापर्यंतचे बांधकाम पूर्ण करून त्यांनी दुसऱ्या हप्त्याची वाट पाहत होते. मात्र निधी वेळेवर न मिळाल्याने त्यांनी व्याजाने पैसे काढून घरकुलाचे बांधकाम पूर्ण केले.

त्यानंतर दुसरा हप्ता मिळविण्यासाठी त्यांनी वारंवार पाठपुरावा केला असता, अभियंता पवन बढे यांनी गावातील एका दलालामार्फत ५ हजार रुपयांची मागणी केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. पैसे देण्यास नकार दिल्याने पूर्ण बांधकाम असूनही दुसरा हप्ता गेल्या तीन महिन्यांपासून थांबवून ठेवण्यात आला आहे. त्यामुळे मानसिक छळ होत असल्याचे सांगत युसुफ शाह यांनी पातूर पंचायत समितीच्या आवारात आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे.

> 'पिंपळखुटा येथील युसुफ शाह यांच्या घरकुलाचा दुसरा हप्ता थांबविण्याबाबत ग्रामपंचायतीकडून गटविकास अधिकाऱ्यांकडे तक्रार आली होती. त्यामुळे तो हप्ता रोखण्यात आला आहे.' **पवन बढे,** अभियंता, पंचायत समिती पातूर
>
> ............
>
> 'घरकुलाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर हप्ता थांबवता येत नाही. त्या लाभार्थ्याचा दुसरा हप्ता देण्यासाठीचा प्रस्ताव पंचायत समितीकडे पाठविण्यात आला आहे. अतिक्रमणाबाबत ग्रामस्थांच्या तक्रारीनुसार नोटीस देण्यात आली आहे.'
> **सागर रोठे,** सचिव, ग्रामपंचायत पिंपळखुटा

# अडीच वर्षांतच डांबरीकरण रस्त्याची चाळणी!

## सुकळी ते पिंपळखुटा रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील सुकळी ते पिंपळखुटा या मार्गावरील डांबरीकरण रस्त्याची केवळ अडीच वर्षांतच चाळणी झाल्याने नागरिकांत संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रधानमंत्री ग्रामीण सडक योजने अंतर्गत करण्यात आलेल्या या रस्त्याचे काम केवळ काही वर्षांतच उखडले असून, ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडल्याने प्रवाशांना तसेच वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.



दररोज या मार्गावरून शाळकरी मुले, शेतकरी आणि प्रवासी वाहने जात असतात. रस्त्यावरील खड्ड्यांमुळे अपघातांचा धोका वाढला असून, काही किरकोळ अपघातही झाल्याची माहिती स्थानिकांनी दिली आहे. निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरल्याचा नागरिकांचा आरोप असून, रस्त्याच्या गुणवत्तेबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

### नागरिकांत संताप

नागरिकांनी प्रशासनाकडे तात्काळ रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणी केली असून, लवकरच दखल न घेतल्यास आंदोलनाचा इशारा दिला आहे. अल्पावधीतच रस्ता उखडल्याने संबंधित अधिकाऱ्यांच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

**सहा कोटी २४ लाख रुपये गेले पाण्यात!**

सुमारे दहा किलोमीटर अंतराचा सुकळी ते पिंपळखुटा रस्ता डांबरीकरणासाठी शासनाने तब्बल ६ कोटी २४ लाख रुपये मंजूर केले होते. मात्र केवळ अडीच वर्षांतच रस्ता उखडून चाळणी झाल्याने, या कामाची गुणवत्ता आणि पारदर्शकतेवर संशय व्यक्त केला जात आहे.

**चार महिन्यांपूर्वी डागडुजी – रस्ता जैसे थे!**

रस्त्यावरील खराब झालेला भाग चार महिन्यांपूर्वी जून महिन्यात डागडुजी करून दुरुस्त करण्यात आला होता. मात्र, अवघ्या काही महिन्यांतच पुन्हा खड्डे निर्माण झाल्याने डागडुजीवरही प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. त्यामुळे नागरिकांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्थळ पाहणी करून जबाबदार ठेकेदारावर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.

# अकोट आठवडी बाजारात वेश्याव्यवसायाचा उघड अड्डा!

**लुटमार-दादागिरीने नागरिक हैराण; पोलिसांकडून मूकसंमतीचा आरोप**

■ प्रतिनिधी | अकोट ■

अकोट शहरातील मच्छी साथ परिसरातील आठवडी बाजार भागात वेश्याव्यवसायाचे उघड अड्डे फोफावले असून, या ठिकाणचा गैरकृत्यांचा उघड बाजार नागरिकांच्या संयमाची परीक्षा पाहत आहे. दलाल व महिलांच्या टोळक्यांनी दादागिरीचा चेहरा धारण केला असून, पैशांसाठी लुटमार, मारहाण, धमक्या आणि अपमानास्पद वर्तनाच्या घटना वाढल्या आहेत.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, या महिलांना आणि दलालांना स्थानिक पोलिसांतील काही घटकांचे मूक समर्थन मिळत असल्याची जोरदार चर्चा शहरभर रंगत आहे. 'आमच्याशी पंगा घेऊ नका, आम्ही पोलिसांनाही हप्ते देतो,' अशा उघड धमक्या देत या महिला निर्भयपणे वावरत असल्याने कायदा व सुव्यवस्थेचा बोजवारा उडाला आहे.

सूतगिरणी परिसर व मच्छी साथ बाजार भागात नागरिक, विद्यार्थी आणि ग्राहकांचे सुरक्षित वातावरण धोक्यात आले आहे. काही दिवसांपूर्वी पोलिसांनी कारवाई केली असली, तरी काही दिवसांनी पुन्हा या अड्ड्यांनी आपला व्यवसाय सुरू केला आहे. हा फक्त वेश्याव्यवसाय नसून गुन्हेगारी टोळींचा अड्डा बनल्याची नागरिकांत चर्चा आहे. तरुण पिढी या चंगळवादाच्या आहारी जात असून, पोलिस मात्र मौन बाळगत आहेत. 'या अड्ड्यांना राजकीय संरक्षण मिळते का?' असा प्रश्न नागरिकांकडून विचारला जात आहे. या ठिकाणी तात्काळ छापेमारी करून आरोपी महिलांवर व दलालांवर अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा (घ्ऊईं) आणि इतर गुन्हेगारी कलमांखाली कठोर कारवाई करावी, अशी नागरिकांची मागणी आहे. तसेच, या महिलांना व दलालांना शहरातून कायमस्वरूपी हद्दपार करण्याची मागणीही जोर धरत आहे. प्रशासनाने या घाणेरड्या व्यवसायावर तात्काळ अंकुश न आणल्यास नागरिक रस्त्यावर उतरून आंदोलन छेडतील, असा इशारा देण्यात आला आहे. अकोट शहराला लागलेली ही 'कीड आणि घाण' संपवण्यासाठी आता नागरिकांची लढाई पेट घेऊ लागली आहे.


**Change In Name**

I Have Change My Name in My HUSBAND Passport :- (R9765070) From
**REKHA VARMA**
--TO--
**REKHA KAMALKISHOR VERMA**
My Residential Address is :- Shri Jin krupa Shastri Nagar Near Varhad CT scan Aman kha Plot Akola 444001.

**Change In Name**

I Have Change My Name in My Passport :- (E7789543) From
**SHAIKH JAWED SHAIKH CHAND**
--TO--
**SHAIKH JAVED SHAIKH CHAND**
My Residential Address is :- R.P.T.S. Road Noori plot Bhagatwadi Galli no 4 Akola 444002.

**Change In Name**

I Have Change My Name in My Passport :- (R9765070) From
**KAMALKISHORE MADANLAL VARMA**
--TO--
**KAMALKISHOR MADANLAL VERMA**
My Residential Address is :- Shri Jin krupa Shastri Nagar Near Varhad CT scan Aman kha Plot Akola 444001.

**Change In Name**

My Old passport name was
**MUMTAZ SADAF**
now my new name is
**MUMTAZ PARVEEN MUHAMMAD FIROZ**
My Old passport no N6919342 Address Gazi plot Hiwarkhed road Akot Dist Akola 444101 ( M S )

**Change In Name**

My Old passport name was
**AKHTAR HUSAIN**
now my new name
**AKHTAR HUSAIN ALTAF HUSAIN JAMADAR**
My Old passport no L7774935 Address Dharuli Bes Akot Dist Akola 444101 ( M S )



जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - २९ अंक ३२८**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com



**जाहीर प्रसिध्दी**

दिनांक :- २७/१०/२०२५

दैनिक वृत्तपत्राव्दारे प्रसिध्दी देण्यात येते की, तेल्हारा तालुक्यामध्ये रोजगार मिळण्याचे दृष्टीने सहकारी तत्वावर मजुर सहकारी संस्था स्थापन करण्याचे ठरविण्यात आले असुन नियोजित संस्थेचे सभासद इच्छिणाऱ्यांनी तेल्हारा तालुक्यातील जे प्रत्यक्ष शारीरिक श्रम करण्याऱ्या व्यक्ती तसेच अल्प भूधारक व अत्यल्प भूधारक की जे उदर निर्वाहाकरीता शारीरीक श्रमाची कामेचही करतात अशा व्यक्तींनी तेल्हारा तालुक्यातील इच्छिणाऱ्यांनी ( इसमांनी) नियोजित मजुर कामगार सहकारी संस्थेचे अस्थाई कार्यालय वरूड बु.ता. तेल्हारा जि. अकोला येथे दिनांक ११/११/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता सभा आयोजित केली आहे तरी इच्छिणाऱ्यांनी सभेस हजर राहावे, ही विनंती

**( शिवा प्रकाश भांबुरकर)**

**जाहीर नोटीस**

**वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १८६२/२०२५ — प्रोसेस नं.१७४६४/२०२५
चौ.ता. १४/११/२०२५ — दिनांक : १६/१०/२०२५

**अर्जदार :** १. हरिदास लक्ष्मणराव पराते (९७६५२४४४२३) २. रामदास लक्ष्मणराव पराते ३. ज्ञानेश्वर लक्ष्मणराव पराते ४. रामकृष्ण लक्ष्मणराव पराते ५. आशाबाई हिरालाल पराते ६. गणेश हिरालाल पराते सर्व रा. सितला माता मंदिरासमोरील गल्ली, पराते जनरल स्टोअर्स जवळ, हरिहर पेठ, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला. ७. यंद्रकला प्रदिप नंदनवार रा. सावजी शाळेजवळ, फडके नगर, डाबकी रोड, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. लक्ष्मणराव महादेवराव पराते २. रूख्मिणीबाई लक्ष्मणराव पराते ३. हिरालाल लक्ष्मणराव पराते
**पत्ता :-** तिघेही रा. सितला माता मंदिरासमोरील गल्ली, पराते जनरल स्टोअर्स जवळ, हरिहर पेठ, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्धीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत क. १ लक्ष्मणराव महादेवराव पराते यांचे दि. २४/१२/ २०२१ रोजी, मयत क. २ रूख्मिणीबाई लक्ष्मणराव पराते यांचे दि. १८/०३/२०२२ रोजी व मयत क. ३ हिरालाल लक्ष्मणराव पराते यांचे दि. १३/०९/२०२२ रोजी अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १४/११/ २०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १६/१०/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

**वि. ३रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, खामगांव, यांचे न्यायालय**

CNR:MHBU05-000795-2025

अर्जदार तर्फे वकिल शुभम टेंभे, — ने. ता.१३/११/२०२५
एम.जे.सी.क्र. २६३/३५

**अर्जदार :** १) आरती नरेंद्र चव्हाण वय - ३८ वर्ष, धंदा-गृहीणी, २) शशांक नरेंद्र चव्हाण तर्फे अ.पा.क. आई आरती नरेंद्र चव्हाण वय- १५ वर्ष, धंदा- शिक्षण, ३) मृत्युंजय नरेंद्र चव्हाण तर्फे अ.पा.क. आई आरती नरेंद्र चव्हाण वय- ११ वर्ष, धंदा- शिक्षण, सर्व रा. वार्ड नं. २४ सैनिक किराणा, गोपाल नगर, खामगांव ता. खामगांव जि. बुलडाणा

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** कोणीही नाही

अर्ज - मुंबई रेगयुलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ अन्वये वारसाचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी

ज्याअर्थी अर्जदार हे वरील ठिकाणचे रहिवासी असून अर्जदार क्र. १ ह्या मयत यांची पत्नी असुन, अर्जदार क्र. २ व ३ हे मयत यांचे मुले असुन, नामे मयत नरेंद्र जिवनलाल चव्हाण, ह्या दि.०९/०६/२०२३ रोजी, मौजे खामगांव ता. खामगांव जि. बुलडाणा येथे मयत झाले आहे. नमुद अर्जदार हे मयत नामे नरेंद्र जिवनलाल चव्हाण, यांचे कायदेशीर वारस आहेत वारसाचे प्रमाणपत्र मिळणेसाठी वर नमुद प्रकरण वि. न्यायालयात दाखल केलेले आहे. मयत नामे नरेंद्र जिवनलाल चव्हाण यांचे अर्जदारांव्यतीरीक्त कोणीही वारस नाही.

तेव्हा वरील अर्जदार यांनी या कोर्टात सदरहू मयत नामे नरेंद्र जिवनलाल चव्हाण, यांचे वारसांनी मुंबई रेग्युलेशन अक्ट १८२७ चे कलम २ अन्वये प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केलेला आहे. वरील अर्जदार यांनी दाखल केलेल्या प्रकरणातील वारस म्हणण्याबाबत व वारस प्रमाणपत्र त्यांचे नावे देण्याबाबत कोणाची काही हरकत असल्यास अथवा उजर असल्यास त्यांनी दिनांक १३/११/२०२५ रोजी किंवा सदर नोटीस वर्तमान पत्रात प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत सकाळी ११.०० वाजता या न्यायालयात हजर होउन आपल्या हरकती उपरोक्त प्रकरणात लेखी स्वरूपात कराव्यात. अशी कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास वरील प्रकरणात पुढील कारवाई करण्यात येउन अर्जदार हयांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दि. १४/१०/२०२५ रोजी माझे सहीने व वि न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

शिक्का

**आदेशावरून,**
(विजय एस. कुळकर्णी)
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर, खामगांव

**जाहीर नोटीस**

**वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १८०६/२०२५ — प्रोसेस नं.१६४१०/२०२५
चौ.ता. ०६/११/२०२५ — दिनांक : ३०/०९/२०२५

**अर्जदार :** गजानन साहेबराव नारे रा. ५६ तोष्णीवाल लेआउट, मुर्तिजापुर रोड, शासकीय दुध डेअरीच्या मागे, अकोला,
ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : साहेबराव बाजीराव नारे
**पत्ता :-** रा. ५६ तोष्णीवाल लेआउट, मुर्तिजापुर रोड, शासकीय दुध डेअरीच्या मागे, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्धीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत साहेबराव बाजीराव नारे यांचे दि.०३/०९/२०२५ रोजी ५६ तोष्णीवाल लेआउट, मुर्तिजापुर रोड, शासकीय दुध डेअरीच्या मागे, अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०६/११/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ३०/०९/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला


# सालासर बालाजी मंदिरात देव दीपावलीचे आयोजन

**अकोला :** स्थानीय गीता नगर, बायपास परिसरातील सालासर बालाजी मंदिर सालासर बालाजी सेवा समितीच्या वतीने भव्य देव दीपावली सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले.बुधवार दि.५ नोव्हें. रोजीच्या कार्तिक पौर्णिमेच्या दिनावर साय.५ ते रात्री १० वा.पर्यंत आयोजित या देवदीपावली सोहळ्यात मंदिर परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई व शेकडो दिपमाळांची आरास सजविण्यात येणार आहे.


**TO WHO SO ERVER IT MAY CONCERN**

Notice is hereby given to the Public at large that, my clients Mrs. Saroj Rajesh Babare, R/o Akola, Tq. and Dist. Akola is the owner and possessor of the Gunthewari Private Layout Plot No. 32 of which Eastern Side Portion Area adm. 39.03 Sq. Mt. of Survey no. 20/01/A, currently having Nazul Sheet no. 10, Nazul Plot no. 3/16 of Mauje Akola, Tq. and Dist. Akola, along with the Construction thereon; by virtue of Reg. Sale Deed bearing no. 5948; Dated 08/12/2022. It is noted that the Original previous chain title Reg. Sale Deed Bearing no. 3626, Dated 19/08/1998 is lost/misplaced my clients. That my client is availing the loan facility from the JM Finance Ltd. for which the said property is offered as security of which the above lost sale deed are required.

Hence, all persons are hereby requested and informed that, if anyone has come across or having possession/idea of the original title deed, kindly informed below. Further if anyone entered or to be enter or agreed to be entered, in to any agreement or transaction with anyone, in respect of the above schedule property; further anyone from the public at large has any right, title, interest or charge or have any objection in respect of above mortgage transactions in respect of the above schedule property. Further Kindly inform the undersigned in writing on the below mentioned address within 7 days from this present.

Akola
Dated 27/10/2025

**Adv. Gaurav S. Deshmukh**
Aalshi Plot, Gaurakshn Road,
Tq. And Dist. Akola
9028232246/9404092024


# वृक्ष संगोपनाच्या देयकामध्ये भ्रष्टाचाराचा आरोप

**पातूर पं. स.च्या अभियंत्याला निलंबित करण्याची शिवसंग्रामची मागणी**

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर पंचायत समिती अंतर्गत रोजगार हमी योजनेतील वृक्ष लागवड व संगोपनाच्या देयकामध्ये मोठा गैरव्यवहार होत असल्याचा गंभीर आरोप शिवसंग्रामचे जिल्हाध्यक्ष दिलीप परनाटे यांनी केला आहे. या संदर्भात त्यांनी दिनांक २७ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना लेखी तक्रार सादर केली आहे.



परनाटे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, रोजगार हमी योजनेत बांबू व इतर वृक्षांच्या संगोपनाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर आर्थिक अनियमितता सुरू आहे. प्रत्यक्षात कमी प्रमाणात लागवड झालेली असताना कागदोपत्री मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड दाखवून मजुरांच्या नावावर बनावट देयक काढले जात असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

ही सर्व प्रक्रिया पातूर पंचायत समितीचे अभियंता आर. बी. चौधरी आणि संबंधित रोजगार सेवक यांच्या संगनमताने चालवली जात असल्याचा दावा तक्रारीत करण्यात आला आहे. त्यामुळे या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून अभियंत्याला तात्काळ निलंबित करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

> 'पातूर तालुक्यात रोजगार हमी योजनेतील बांबू व इतर वृक्ष लागवडीच्या देयकांमध्ये अभियंता आर. बी. चौधरी यांच्या लाचखोरीमुळे घोळ सुरू आहे. प्रत्यक्ष लागवड अत्यंत कमी असून, कागदोपत्री आकडे फुगवून मजुरांच्या नावावर कोट्यवधींची देयके काढली जात आहेत. या गैरव्यवहारावर तात्काळ कारवाई न झाल्यास शिवसंग्रामकडून ठिय्या आंदोलन छेडले जाईल.'
> **दिलीप परनाटे**
> (जिल्हाध्यक्ष, शिवसंग्राम)


# वनपरिक्षेत्र अधिकारी नरनाळा परिक्षेत्र यांचे कार्यालय

**कार्यालय पत्ता :-** अकोट ता. अकोट जि. अकोला ४४४१०१

जावक क्रं. : - /योजना/ ६४८ / २०२५-२६ — अकोट, दिनांक २७/१०/२०२५.

**B-1 निविदा सुचना क्रं. ०१ सन २०२५-२६**

वनपरिक्षेत्र अधिकारी, नरनाळा परिक्षेत्र कार्यालयामध्ये खाली नमुद केलेल्या कामाचे मोहरबंद निविदा B-1 नमुना प्रपत्रात सार्वजनिक बांधकाम विभागाचे ५-अ व त्यावरील पंजिबध्द असलेल्या कंत्राटदाराकडुन मागवित आहे.

| B-1 निविदा सुचना क्रं | कामाचे नाव | | निविदेचा प्रकार | निविदा फॉर्म किंमत | कामाची अंदाजीत किंमत | अमानत रक्कम १ | काम पूर्ण करण्याचा कालावधी | कंत्राटदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Renovation of ACF Office Cabin At Akot in Narnala Range. | 346165 | B-1 | 500 | 346165 | 3460 | १५ दिवस | खुला |
| 2 | Repairs to Wanmajur Quator Forest Colony Akot in Narnala Range. | 225771 | | | 225771 | 2260 | | |
| | **एकुण** | **571936** | | | **571936** | **5720** | | |

| B-1 निविदा सुचना क्रं | कामाचे नाव | | निविदेचा प्रकार | निविदा फॉर्म किंमत | कामाची अंदाजीत किंमत | अमानत रक्कम १ | काम पूर्ण करण्याचा कालावधी | कंत्राटदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Construction of Tree Protection wall at DCF Bunglow at Akot in Narnala Range | 384600 | B-1 | 500 | 384600 | 3846 | १५ दिवस | खुला |
| | **एकुण** | 384600 | | | 384600 | 3846 | | |

**अटी व शर्ती :-**

१) निविदेत नमुद केलेली अंदाजीत रक्कमेतुन बदल होऊ शकते.
२) कोरी निविदा प्रपत्र वनपरिक्षेत्र अधिकारी, नरनाळा यांचे कार्यालयात दि. २८/१०/२०२५ ते ०३/११/२०२५ दुपारी १७.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत विक्रीस उपलब्ध राहतील.
३) निविदा सादर करण्याची अंतिम तारीख ०३/११/२०२५ ला दुपारी १४.०० वाजे पर्यंत राहील. निविदेची प्रत टपालाने पाठविता येणार नाही.
४) निविदा दिनांक ०३/११/२०२५ रोजी दुपारी १६.०० वाजता वनपरिक्षेत्र अधिकारी नरनाळा यांचे कार्यालयात उपस्थितीत निविदा धारण कंत्राटदारांसमोर उघडण्यात येईल्.
५) **अ) बोली पात्रता लिफाफा :-** उपरोलिखीत करुन त्यात खालील दस्ताऐवज/सत्यप्रत सिलबंद करावे. a) सार्वजनिक/उपनिबंधक विभागाचे कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्र. b) वस्तु व सेवाकर (GST) प्रमाणपत्र c) मागील तिन वित्तीय वर्षाचे आयकर व पॅन कार्ड छायाप्रती d) शासकीय/अर्थ शासकीय किंवा नामांकीत संशोधन संस्था इत्यादी कामे केल्याचे Work Order जोडणे आवश्यक राहील. e) Annexure-1 सोबत जोडलेल्या नमुन्यामध्ये परिपुर्ण स्वाक्षरीसह भरणे बंधनकारक आहे.
**ब) लिफाफा क्र. २ :- किंमत बोली लिफाफा :-** उपरोलिखीत करुन त्यास या कार्यालयातुन खरेदी केलेले निविदा प्रपत्रात रितसर दर भरलेले व सही केलेले असावे सदर लिफाफा सिलबंद असावा.
**६) प्राप्त झालेल्या निविदा दिनाक :-** ०३/११/२०२५ रोजी दुपारी १६.०० वाजता निविदा उघडने वेळी हजर राहावयास इच्छुक निविदाकर्त्यांच्या किंवा त्याच्या अधीकृत प्रतिनिधीच्या उपस्थितीत उघडण्यात येतील. लिफाफा क्रं. १ मध्ये प्रस्तुत करण्यात आलेली कागपत्रे समाधानकारक व परिपुर्ण आढळुन आली तरच लिफाफा क्रं.२ उघडण्यात येईल्.
७) निविदाकर्त्याला निविदा प्रपत्र जारी करणे याचा अर्थ निविदाकर्ता निविदा उघडण्यासाठी पात्र झाला असे नाही. पात्रता बोली (लिफाफा क्रं. १) प्रथम उघडण्यात येईल व त्यानंतर ते पात्र असल्यास निविदा बोली (लिफाफा क्रं. २) उघडण्यात येईल्.
८) सुशिक्षित बेरोजगार हे आकोला जिल्हातीलच असावे.
९) उपरोक्त कामाकरीता प्रशासकीय मान्यता/अनुदान उपलब्ध झाल्यानंतरच कार्यारंभ आदेश जारी करण्यात येतील तसेच कुठलेही कारण न देता कोणतीही किंवा सर्वच निविदा फेटाळण्याचा अधिकार, उपवनसंरक्षक मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अकोट वन्यजीव विभाग, अकोट यांचेकडे सुरक्षीत आहे.

**वनपरिक्षेत्र अधिकारी**

# नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची दिवाळी अंधारात

## मुख्यमंत्र्यांचे आश्वासन फोल ; सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना आजही मदतीची प्रतीक्षा

**वर्धा जनमाध्यम :** खरीप हंगामात अतिवृष्टीमुळे उध्वस्त झालेल्या शेतीचे दुःख अजूनही कमी झालेले नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिवाळीपूर्वी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत पोहोचेल असे आश्वासन दिले होते. मात्र ते आश्वासन फोल ठरले असून मदतीच्या प्रतिक्षेत असलेले शेतकरी आता सरकारवर संतप्त झाले आहेत. तालुक्यातील अनेक गावांमध्ये प्रशासनाने पंचनामे केले असले तरी अद्याप एकाही शेतकऱ्याच्या खात्यात मदत जमा झालेली नाही. कृषी अधिकाऱ्यांकडून




आदेश एवढेच आले आहेत, मदत थेट खात्यात जमा होईल अशीच आश्वासनांची पुनरावृत्ती होत आहे. मात्र दिवसेंदिवस परिस्थिती बिकट होत असून शेतकऱ्यांची दिवाळी अंधारातच गेली आहे.

रोहणा येथील शेतकरी निलेश गलाट यांनी तीव्र शब्दांत सांगितले, शेतकऱ्यांना मदत करण्याची सरकारची मानसिकता नाही. सोयाबीन उत्पादक शेतकरी संपूर्णपणे वाऱ्यावर आहे. दिवाळीपूर्वी मदतीचं आश्वासन देऊनही काही झालं नाही. मारडा येथील अजय वंजारी म्हणाले, शासनाने १८ हजार रुपये हेक्टरी मदत देण्याचं वचन दिलं होतं. पण ते पूर्ण न झाल्याचे पडसाद स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत उमटणं निश्चित आहे. बोदड येथील शेतकरी यश काळे यांनी सरकारवर रोष व्यक्त करताना सांगितले, विधानसभा निवडणुकीनंतर आनंदाचा शिधा, पिक कर्जमाफी, खरीप हंगाम नुकसान भरपाई.

यापैकी एकही शब्द सरकारने पाळला नाही. त्यामुळे आम्हाला काळी दिवाळी साजरी करावी लागली. दरम्यान, ग्रामीण भागात सरकारच्या वचनभंगावरून असंतोष वाढत असून शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. प्रशासनाकडून केवळ कागदोपत्री हालचाली सुरू असून प्रत्यक्ष मदत अद्याप दिवसाढवळ्या हरवलेली दिसते.

# कारंजा-धावडी रस्त्याची झाली चाळण

## नागरिकांचा संताप; संघर्ष समितीचा आंदोलनाचा इशारा

**कारंजा (घा.) जनमाध्यम :** कारंजा शहरातून धावडी गावाकडे जाणारा मुख्य रस्ता खड्ड्यांनी भरून निकामी झाला असून, या रस्त्याची अक्षरशः चाळण झाल्यामुळे नागरिकांनी जि.प. बांधकाम विभागाचे लक्ष वेधले आहे. कारंजा नागरी समस्या संघर्ष समितीने निवेदन देत येत्या काही दिवसांत दुरुस्तीचे काम सुरू न झाल्यास आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.नवीन लेआऊटपासून राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ पर्यंतचा हा रस्ता पूर्णपणे उखडला असून, खोल खड्ड्यांमुळे वाहनधारक आणि विद्यार्थी त्रस्त झाले आहेत. अनेक विद्यार्थी सायकलने शाळेत येताना पडून जखमी झाल्याचे



प्रकार घडले आहेत. ग्रामस्थांपासून शेतकऱ्यांपर्यंत सर्वांनाच या मार्गाने प्रवास करणे कठीण झाले आहे.समितीच्या निवेदनात मागणी करण्यात आली आहे की, पुढील सात दिवसांत रस्त्यावरील खड्डे तातडीने बुजवावेत आणि दोन महिन्यांच्या आत पक्के बांधकाम करावे. या मुदतीत काम न झाल्यास रस्त्यावरील खड्ड्यांची प्रतीकात्मक पूजा करून लोकांच्या संतापाचा आवाज बुलंद केला जाईल, असा इशारा समितीने दिला आहे.हे निवेदन जि.प. बांधकाम उपविभागाचे उपविभागीय अभियंता एफ. एस. मुल्ला यांनी स्वीकारले. यावेळी समितीचे कार्यकर्ते आणि ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

## संक्षिप्त

### प्रहारचे बच्चू कडू यांची ट्रॅक्टर रॅली आज सेलूत



**सेलू :** शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करावा, दिव्यांगाच्या मानधनात वाढ करावी वे आदी मागण्यांसंदर्भात. प्रहार संघटनेचे अध्यक्ष तथा माजी मंत्री बच्चू कडू यांच्या आर्वी येथून नागपूरकडे निघालेली ट्रॅक्टर रॅली डे आज मंगळवार, २८ ऑक्टोबर रोजी सेलूत दाखल होणार आहे. सुकळी येथील मुक्कामानंतर मंगळवारी ही ट्रॅक्टर रॅली येळाकेळी, पिपरी, वर्धा, पवनारमार्गे सकाळी १०.३० वाजता पोहोचल्यानंतर सेलूत दाखल होणार आहे. सेलू येथे या रॅलीचे प्रहार अपंग क्रांती संघटना, प्रहार संघटनेच्या वतीने स्वागत केले जाणार असून, यानंतर ही रॅली केळझर, खडकी, सेलडोहमार्गे बुटीबोरी नागपूरला जाणार आहे. तेथे कापूस संशोधन केंद्रालगतच्या मैदानावर रॅलीचा मुक्काम असून, शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी आंदोलन केले जाणार आहे. शेतकऱ्यांचा सातबारा कोरा केल्याशिवाय तेथून हटणार नाही, असा पवित्रा बच्चू कडू यांनी घेतल्याने अनेकांचे लक्ष या आंदोलनाकडे लागले आहे. जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी यात सहभागी व्हावे, असे आवाहन प्रहार संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे.


### 'शॉक लागून शेतकऱ्याचा शेतातच मृत्यू

**समुद्रपूर ;** तालुक्यातील नंदोरी येथील प्रगतशील शेतकरी कवडू महादेव कांबळे (६०) हे शेतातील सोयाबीन ताडपत्रीने झाकण्यासाठी गेले असता त्यांना तारेच्या कुंपनात सोडण्यात आलेला विद्युत प्रवाहाचा जबर झटका बसला. यात त्यांचा मृत्यू झाला, मागील दोन दिवसांपासून जिल्ह्यात ढगाळ वातावरण आहे. पावसात कापणी केलेले सोयाबीन भिजू नये या हेतूने शेतात ढीग लावलेले सोयाबीन ताडपत्रीने झाकण्यासाठी कवडू कांबळे हे शेतात गेले होते. ते शेतात जात असताना शेजारील शेतकरी नारायण हरिभाऊ मोहदरे यांनी आपल्या शेताला तारेचे कुंपन करून त्यात विद्युत प्रवाहित केलेल्या तारेचा स्पर्श झाला. यात कवडू कांबळे यांचा मृत्यू झाला. शेतात गेलेले कवडू बराचवेळ होऊन न परतल्याने कुटुंबियांनी त्यांचा शोध घेतला. या शोधमोहिमेत नारायण मोहदरे यांच्या शेताच्या धुऱ्यावर कवडूचा मृतदेह आढळून आला. त्यानंतर समुद्रपूर पोलिसांना माहिती देण्यात आली. माहिती मिळताच समुद्रपूर ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक गिरीश मोहतुरे, कपिल मेश्राम यांनी घटनास्थळ गाठून पंचनामा केला. शिवाय मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी शासकीय रुग्णालयात पाठविला. याप्रकरणी समुद्रपूर पोलिसांनी गुन्ह्याची नोंद घेतली आहे.

### उभ्या ट्रकला दुचाकीची धडक

**वडनेर :** हिंगणघाट मार्गावरील निर्मल धाब्यासमोर उभ्या असलेल्या ट्रकवर दुचाकी आदळल्याने दुचाकीस्वार ठार झाला. प्रदीप लक्ष्मण धानोरकर असे मृतकाचे नाव आहे. मृतक हे एमएच ४० एएल १५३८ क्रमांकाच्या दुचाकीने वडकी येथून हिंगणघाटला येत होते. घाटसावलीजवळ धाब्यावर कुठलेही लाइट सुरू न करता व सुरक्षितता न बाळगता उभा करण्यात आला होता. दरम्यान अंधारात न दिसल्याने दुचाकी ट्रकवी आदळली. यात दुचाकीस्वार गंभीर जखमी होऊन ठार झाला.

### अशोक श्रीरंगवार यांचे निधन



**वर्धा :** शहरातील रामनगर सर्कस मैदान परिसरातील सेवानिवृत्त शिक्षक अशोक श्रीरंगवार यांचे निधन झाले, ते ७७ वर्षाचे होते, त्यांच्या पश्चात दोन मुलं, दोन मुली, स्नुषा, नातवंडे असा मोठा परिवार आहे, ते कन्ट्रक्शन व्यवसायात कॉंक्रीट मिक्सर मशीन किंग म्हणून ओळखले जात होते.

# अतिवृष्टीचा कापसावर घाला; उत्पादनात ५० टक्क्यांपर्यंत घट

## हमीभावापेक्षा दीड हजारांनी कमी दर; शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले

**वर्धा जनमाध्यम :** या वर्षी जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीने शेतकऱ्यांच्या आशा-अपेक्षांवर अक्षरशः पाणी फिरवले आहे. अवर्षणग्रस्त असलेल्या या भागात सरासरी ६०० ते ७०० मिमी पर्जन्यमानाच्या तुलनेत यंदा तब्बल ९०० ते १००० मिमी पाऊस झाला. त्यातून कापूस, तूर, सोयाबीन आणि मका पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.विशेषतः कापसाच्या पिकावर अतिवृष्टीचा सर्वाधिक परिणाम झाला असून, यंदा उत्पादनात मागील वर्षाच्या तुलनेत ४० ते ५० टक्क्यांपर्यंत तूट येण्याचा अंदाज तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे.



अतिवृष्टीमुळे बोंड सडले, पाने गळून पडली, काही ठिकाणी बोर्ड पिवळी पडली. अनेक ठिकाणी पेरणी उशिरा झाल्याने पिके नीट वाढू शकली नाहीत. दरम्यान, कापूस पणन महासंघाकडून (सीसीआय) नवी ऑनलाइन नोंदणी प्रणाली सुरू करण्यात आली असून, त्यावर नोंदणी न झाल्यास खरेदीस परवानगी नाही, अशा नवीन नियमांमुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. परिणामी, अनेक शेतकरी खासगी जिनिंगकडून कापूस विकत आहेत. मात्र, त्यांना सरकारने जाहीर केलेल्या ८१०० रुपयांच्या हमीभावा ऐवजी दीड हजार रुपयांनी कमी, म्हणजेच ६५०० ते ७००० रुपयांपर्यंत दर मिळत आहेत. उत्पादन घटले, दर कोसळले आणि सरकारी यंत्रणा निकामी ठरली, अशी शेतकऱ्यांची व्यथा असून, सरकारकडून तातडीने हस्तक्षेपाची मागणी होत आहे.

# अवैध दारू वाहतूक प्रकरणात एकाला अटक

**हिंगणघाट :** तालुक्यातील वडनेर येथील संविधान चौकात पोलिसांनी केलेल्या कारवाईत दुचाकीने अवैध दारूची वाहतूक करणाऱ्या व्यक्तीस अटक करण्यात आली आहे. या कारवाईत पोलिसांनी एकूण ७३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी मोहन शंकर रेवतकर (वय ३१, रा. येरणगाव) हा एमएच ३२ झेड ७६४५ क्रमांकाच्या हिरो कंपनीच्या मोटर सायकलवरून संत्रा कंपनीची देशी दारू अवैधरित्या वाहतूक करत होता. संविधान चौक येथे पोलिसांनी त्याला थांबवून तपासणी केली असता, देशी दारूच्या अनेक बाटल्या त्याच्याकडे आढळल्या. पोलिसांनी दुचाकीसह दारूचा साठा असा एकूण ७३, हजार रु. किमतीचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी पोलीस उपनिरीक्षक भारत वर्मा यांच्या फिर्यादीवरून आरोपीविरुद्ध कलम ६५, ७७ (अ), १३० आणि १७३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास ठाणेदार घनश्याम पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार प्रशांत मेश्राम करत आहेत.

# महिला कॉँग्रेस जिल्हाध्यक्षपदी अरुणाताई धोटे

## महिला कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण; नव्या नेतृत्वाकडून संघटन बळकटीचा संकल्प

**वर्धा जनमाध्यम :** भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या महिला विभागात वर्धा जिल्ह्याच्या अध्यक्षपदी अरुणाताई धोटे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीची घोषणा महिला कॉंग्रेसच्या प्रदेशाध्यक्षा संध्याताई सव्वालाखे यांनी केली असून, नव्या नियुक्त्तीमुळे जिल्ह्यातील कॉंग्रेस कार्यकर्त्यांमध्ये विशेषतः महिला कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

अरुणाताई धोटे यांच्या नियुक्तीनंतर विविध स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे. शुभेच्छांचा वर्षाव होत असताना, महिला कॉंग्रेसच्या नव्या नेतृत्वाकडून संघटन अधिक बळकट करण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

नवीन जबाबदारी स्वीकारल्यानंतर अरुणाताई धोटे यांनी वरिष्ठ नेत्यांचे आभार मानले असून, महिला सक्षमीकरण, त्यांचे सामाजिक आणि आर्थिक हक्क यासाठी प्रभावी आवाज बनणे हे माझे प्रमुख ध्येय राहील. जिल्ह्यातील प्रत्येक महिला कार्यकर्तीला पक्षाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी मी प्रयत्नशील राहीन, असे त्यांनी सांगितले. अरुणाताई धोटे यांच्या नेतृत्वाखाली वर्धा महिला कॉंग्रेसला नवचैतन्य प्राप्त होईल आणि जनसंपर्कावर अधिक केंद्रित कार्य घडेल. अशी प्रतिक्रिया वरिष्ठ कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.

# कापूस वेचणीसाठी मोजावे लागतात १० ते १२ रुपये

## मजुरही मिळेना : कापूस उत्पादक शेतकऱ्यांची कसरत वाढली; लाडक्या बहिणींचा परिणाम

**वर्धा जनमाध्यम :** कपाशीचे पीक यंदा चांगले आले होते परंतु अतिवृष्टीने त्याचे तिनतेरा वाजले, उरल्यासुरल्या कैऱ्यातून कपाशी घरी आणण्यासाठी शेतकऱ्यांना प्रति किलो दहा ते बारा रुपये मोजावे लागतात मात्र तरीही मजूर मिळत नाही कारण ऊसतोड कामगाराचे स्थलांतर झाले असून लाडकी बहिणीसह विविध योजनेमुळे मजूर कामावर येण्यास टाळाटाळ करत असल्याने कपाशी वेचणीसाठी शेतकऱ्यांना मजुरांच्या अभावाचा सामना करावा लागत आहे.

वर्धा जिल्ह्यात कापसाचे मोठे क्षेत्र असून मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जाते, गेल्या दोन वर्षांपासून निसर्गाच्या संकटाचा सामना करत असतांना शेतकरी मात्र मेटाकुटीस आलेला पाहायला मिळत आहे. कपाशी लागवडी पासून तो घरी येईपर्यंत ४० हजार रुपयाचा खर्च होतो परंतु या तुलनेत यावर्षी उत्पादन फक्त ३० हजार रुपयेच पदरात पडत असल्याने वर्षभराचे नियोजन करायचे कसे असा प्रश्न शेतकऱ्यांमधून उपस्थित केला जात आहे. दरम्यान यंदाच्या खरीप हंगामाची अतिवृष्टीमुळे वाट लागल्याने पुढील नियोजन करायचे कसे असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा असतांना शेतकऱ्यांनी काळवंडलेल्या बोंडातून कपाशी बाहेर काढण्यांचा प्रयत्न सुरू केला परंतु ऊसतोड मजुरांचे दुसऱ्या जिल्ह्यात ऊसतोडणी साठी स्थलांतर होत असून तसेच लाडकी बहिणी योजनेमुळे महिला मजुर कामावर येण्यास टाळाटाळ करत असल्याचे बोलले जात आहे. कापूस वेचणीसाठी प्रतिकिलो १० ते १२ रुपयांचा भाव कापूस वेचणीसाठी मंजूर मिळत नाही मिळालेच तर १० ते १२ रुपये किलोने पैसे मोजावे लागतात अनेकांनी किलो मागील मजुरीचे दर १० वरुन १२ रुपयांपर्यंत केले आहेत. परंतु ढगाळ वातावरण आणि मजुरांच्या १२ रुपयांच्या मागणीमुळे शेतकऱ्यांची परिस्थितीत इकडे आड आणि तिकडे विहीर अशी झाली आहे. त्यामुळे काही शेतकऱ्यांना घरच्या घरीच वेचणीचे काम पार पाडावे लागते आहे.

महागाईला अनुसरुन कापसाला हमीभाव मिळावा

कपाशी वेचण्यास आली, पण मजुर मिळत नाहीत. रोजंदारी वाढवली तरी कोणी येत नाही. पाऊस आला तर उरलीसुरली कपाशी ही पाण्यात मिसळून मातीमोल होणार आहे. त्यामुळे शासनांने वाढलेल्या महागाईचा विचार करून अतिवृष्टीच्या अनुदानांबरोबर शेतकरी टिकेन असा कापसाला हमीभाव द्यावा. अशी प्रतिक्रिया शेतकऱ्यांनी दिली आहे.

# हिंगणघाट ठाणेदारपदी अनिल राऊत यांची नियुक्ती

**हिंगणघाट :** जिल्ह्यातील संवेदनशील ठाण्यांपैकी एक मानल्या जाणाऱ्या हिंगणघाट शहर पोलीस स्टेशनच्या ठाणेदारपदी अनिल शिवराम राऊत यांची नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक अनुराग जैन यांनी २५ ऑक्टोबर रोजी यासंदर्भात आदेश निर्गमित केले आहेत. या अगोदर ठाणेदारपदी देवेंद्र ठाकूर कार्यरत होते. मात्र दुर्गा विसर्जनाच्या वेळी पोलिसांवर झालेल्या हल्ल्याच्या घटनेनंतर, तसेच टिळक चौकात ठाणेदाराची कॉलर पकडल्याच्या प्रसंगानंतर, त्यांच्यावरील दबाव वाढला होता.

# अवैध दारू विक्री करणाऱ्या महिलांवर पोलिसांची कारवाई

**हिंगणघाट :** हिंगणघाट येथील संत ज्ञानेश्वर वार्ड आणि संत चोखोबा वार्ड परिसरात पोलिसांनी दोन स्वतंत्र कारवायांमध्ये अवैध दारू विक्री करणाऱ्या महिलांविरुद्ध कारवाई केली आहे. पहिल्या कारवाईत संत ज्ञानेश्वर वार्ड येथील नानीबाई सुभाष तांदूळकर (वय ५५) यांच्या घरावर पोलिसांनी धाड टाकली असता, त्यांच्या घरातून तब्बल २०० लिटर गावठी दारू, किंमत सुमारे ७, हजार रुपये, असा अवैध साठा जप्त करण्यात आला. दुसऱ्या ऱ्या कारवाईत संत चोखोबा वार्ड येथील नर्गीस परविन शेख युनूस शेख (वय २५) हिच्या घरातून देशी दारूच्या प्रीमियम कंपनीच्या २९ शिश्या व गावठी मुळा दारू, असा एकूण ४ हजार ८०० रुपयांचा मुद्दे माल पोलिसांनी जप्त केला. ही कारवाई गुन्हे शाखेचे चंदू धात्रक व प्रशांत ठोंबरे यांच्या पथकाने केली. दोन्ही महिलांविरुद्ध पूर्वीपासूनही अवैध दारू विक्रीचे गुन्हे असल्याचे पोलिस सूत्रांनी सांगितले. दाखल सध्या अवैध दारू विक्रीच्या व्यवसायात महिलांचा वाढता सहभाग दिसून येत असून, ही समाजासाठी धोकादायक बाब असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे.

# सावंगीच्या गजानन नगरीत घरफोडी

**वर्धा :** सावंगी मेघे भागातील मार्गावरील पालोती गजानननगरी येथील सूरज प्रतापसिंग राठोड यांच्या घरात चोरट्याने प्रवेश करून एक लाख ६६ हजारांचा मुद्देमाल चोरून नेला. तक्रारीनंतर ही घटना उघडकीस आली.

चोरट्याने राठोड यांच्या घरातून सोन्याच्या बांगड्या, सोन्याचे मंगळसूत्र, सोनसाखळी, रोख ५० हजार रुपये, दोन घड्याळी, चार्जर, लॅपटॉपचे अलेक्सा डिव्हाईस, मोबाईलचे चार्जर असा मुद्देमाल चोरून नेला. या प्रकरणी सावंगी पोलिसांनी गुन्ह्याची नोंद केली आहे.

# सेलगाव (उमाटे) येथे शेततळ्यातील ताडपत्री चोरी

**कारंजा जनमाध्यम :** तालुक्यातील सेलगाव (उमाटे) येथील शेतकरी अशोक भाऊराव घागरे यांच्या शेतातील शेततळ्यातून पुन्हा एकदा ताडपत्री चोरी झाल्याची घटना घडली आहे.

२५ ऑक्टोबरच्या रात्री अज्ञात चोरट्यांनी सर्वे क्रमांक १६२/१ मधील शेततळ्याची ताडपत्री कापून नेल्यामुळे मोठे नुकसान झाले आहे.घटनेमुळे शेततळ्यातील सुमारे पन्नास टक्के पाणीसाठा वाहून गेला असून, घागरे यांना आर्थिक तसेच मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. या संदर्भात त्यांनी कारंजा पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दिली आहे.

शेतकरी घागरे यांनी सांगितले की, यापूर्वीही ६ जुलै २०२५ रोजी त्यांच्या याच शेततळ्यातील काही भागातील ताडपत्री चोरीस गेली होती. त्या घटनेबाबत पोलीस स्टेशनला माहिती देऊनही दोषींवर कारवाई झालेली नाही, हे देखील त्यांनी नमूद केले. सतत दोन वर्षे नापिकीचा सामना करत असताना चोरीसारख्या घटनांनी शेतकऱ्यांचे हाल वाढले असल्याची प्रतिक्रिया परिसरात व्यक्त होत आहे. या घटनेमागे परिसरातीलच काही व्यक्तींचा हात असावा, असा संशय शेतकरी आणि गावकऱ्यांनी व्यक्त केला आहे. ग्रामीण भागात वारंवार होणाऱ्या अशा चोरीच्या घटनांमुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष पसरला आहे.ग्रामस्थ आणि स्थानिक शेतकरी संघटनांनी प्रशासन व पोलीस विभागाने या प्रकरणी गांभीर्याने तपास करून दोषींना कठोर शिक्षा करावी, तसेच संबंधित शेतकऱ्याला तातडीने मदत देण्यात यावी, अशी मागणी केली आहे.

# गौळण लोककला आजही जिवंत

## सोशल मीडियाच्या युगात हरवणाऱ्या परंपरेला साहूरच्या कलाकारांनी दिला नवसंजीवनीचा स्पर्श

**साहूर जनमाध्यम :** कधी काळी दिवाळीच्या पाडव्याला गावोगावी काढली जाणारी गौळण ही लोककला आता डिजिटल युगात लोप पावत असली, तरी साहूर ग्रामस्थांनी मात्र या परंपरेला नवजीवन दिलं आहे. काही उत्साही तरुण आणि हौशी कलाकारांनी नऊवारी नेसवून पारंपरिक ढोलकी, झांज, चोंकं यांच्या तालावर गावभर फिरत लोकगीतांचे सादरीकरण करत लोकांचे मनोरंजन केले. लोककलावंतांनी गल्लीबोळांमधून फिरत लोकगीतांच्या ओव्या म्हणत गावकऱ्यांना हसवले, आनंद दिला. गौळणीच्या वेषात सजलेला कलाकार हा कार्यक्रमाचा केंद्रबिंदू ठरला. बालकांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांनी आनंद लुटला. कार्यक्रमाच्या माध्यमातून थोडी वर्गणी गोळा करून कलाकारांनी सामाजिक सलोखा वाढवण्याचा अभिनव उपक्रम राबविला. गावातील पाटील, सरपंच, तसेच प्रतिष्ठित नागरिकांपुढे लोकगीते सादर करून दक्षिणा घेण्याची परंपरा आजही सुरू आहे. त्यामुळे मराठमोळ्या संस्कृतीचा आणि ग्रामीण चालीरीतींचा गंध आजही या लोककलेतून दरवळतो आहे.मात्र, मोबाईल आणि सोशल मीडियाच्या युगात या लोककलेला अपेक्षित बळ नाही. गौळणसारख्या लोककला आता फक्त आठवणीतच राहतील अशी भीती व्यक्त होत असताना, साहूरमधील चेतन शेंद्रे, मनोहर राऊत, सूचक बनगाळे, गणेश कुरवाडे, निलेश खरबडे, सुधाकर गायकवाड, ईश्वर कुरवाडे, अंकुश ठाकरे, बंटी सोनवणे, विजू कुरवाडे, सागर वरकड, अविनाश



गोंधळे, अमोल भोरे, ज्ञानेश्वर वरठी आणि 'डान्सर' करिष्मा शेलारे यांनी मात्र आपली लोककला जपण्यासाठी दिवाळी निमित्ताने गौरवशाली परंपरेचा धागा घट्ट पकडला आहे.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष - १३ अंक ३२८**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# महा-ई-सेवा व आधार केंद्र संचालकांचा १२ पासून संप

## प्रलंबित मागण्या पूर्ण करण्यासाठी दिला इशारा

**अमरावती/प्रतिनिधीः-** महा-ई-सेवा व आधार केंद्र संघटनेच्या वतीने आपल्या विविध प्रलंबित मागण्या पूर्ण करण्यासाठी येणाऱ्या १२ ते १४ नोव्हेंबर पर्यंत संप पुकारण्याचा इशारा आज सोमवार २७ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांना दिलेल्या निवेदनातून दिला आहे. निवेदनात म्हटले आहे की, शासन द्वारा काढण्यात आलेल्या नवीन परिपत्रक मध्ये फेरबदल करण्यात यावे. आधार सेवा केंद्राचे कमिशन त्वरित देण्यात यावे. आधार ऑपरेटरला ब्लॅकलिस्ट करू नका. राज्यातील



प्रत्येक जिल्ह्यात सीडीपीओ महाआयटी व्यवस्थापन, तांत्रिकी व्यवस्थापक यांच्या नेमणुका होऊन दर तीन वर्षानंतर बदल्या करण्यात याव्या. सीएमएस, महाऑनलाईन कडून अजून पर्यंत कमिशन नाही मिळाले ते कमिशन देण्यात यावे. शासनाने १९ जानेवारी २०१८ च्या परिपत्रकानुसार लोकसंख्या नुसार आधार केंद्राची संख्या नियंत्रित ठेवावी. आज पर्यंत राबवलेली योजनेनुसार कमिशन देण्याचे ठरविले होते ते अजून पर्यंत नाही दिले. ते देण्यात यावे. ग्रामपंचायत कार्यालय, शालेय महाविद्यालय यांचे आपले सेवा केंद्राचे आयडी वाटप करू नये व केलेली आयडी बंद करावी. यासह २७ मागण्यासाठी संप पुकारण्यात आलेला आहे. निवेदन देतांना विनोद तायडे, कुणाल वाठ, संदीप राऊत, संतोष त्रिपाठी, संजय वानरे, अतुल बोबडे, सुदर्शन यावले, कुणाल कोठेकर, प्रकाश बनसोड, निलेश इंगळे, सुमित मनोहर, नरेश तीमारे, अफसर खान सह सेवा केंद्र संचालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भारतरत्न डॉ. एपीजे अब्दुल कलाम महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन साजरा

**अमरावती/प्रतिनिधीः-** शिवाई एज्युकेशनल सोशल अँड मेडिकल ट्रस्ट द्वारा संचालित भारतरत्न डॉ. एपीजे अब्दुल कलाम कॉलेज फॉर यु जी अँड पीजी विथ मिलेनियम स्किल्स इनोव्हेशन इंक्युबेशन अँड रिसर्च अमरावती या महाविद्यालयात भारतरत्न डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाई एज्युकेशनल सोशल अँड मेडिकल ट्रस्टचे सचिव प्रा.दिनेश सूर्यवंशी होते. यांनी डॉ. कलाम यांच्या जीवना बद्दल तसेच डॉ. कलाम यांना अमरावती मध्ये एका कार्यक्रमासाठी बोलाविलेले असताना त्यांच्यासोबत चर्चा करून घालविलेल्या वेळाबद्दल विद्यार्थ्यांना भरभरून सांगितले. तसेच भारतरत्न डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा. अक्षय देठे तसेच सुशीला सूर्यवंशी महाविद्यालयाचे प्रभारी संचालक प्रा. अमोल करमरकर यांची प्रमुख उपस्थिती या कार्यक्रमाला होती. मान्यवरांच्या हस्ते भारतरत्न डॉ.एपीजे अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. हा दिवस विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी आणि समाजात वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी समर्पित आहे. डॉ. कलाम यांच्यासारख्या थोर व्यक्तींच्या वाचनाची आवड आणि ज्ञानार्जनाची जिज्ञासा



सर्वांना प्रेरणा देणारी होती. त्यांच्या स्मृती जपण्यासाठी आणि वाचनाचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या ग्रंथपाल विभागाकडून करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाच्या ग्रंथपाल प्रा. राखी गचके यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गौरी गुल्हाने या विद्यार्थिनींनी केले. श्रावणी बांगडे या विद्यार्थिनींनी पुस्तक वाचन व ग्रंथालय यांचा सुरेख संगम साधनारी सुरेख अशी कलाकृती आपल्या रांगोळीच्या माध्यमातून साकारली. तसेच कार्यक्रमाची सुरुवात करताना गायत्री देशमुख या विद्यार्थिनींनी स्वागत गीत व नंदिनी धिरडे या विद्यार्थिनीने सरस्वती वंदना सादर केली. डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या जीवनात त्यांनी केलेल्या विविध कार्य पोस्टरच्या माध्यमातून युक्ती यादव या विद्यार्थिनींनी रेखाटले. डॉ. अब्दुल कलाम यांच्या जयंतीचे निमित्य साधून बुक रिव्हू अ?क्टिव्हिटी या कार्यक्रमा दरम्यान घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी वाचलेल्या पुस्तकां मधून त्यांना काय बोध झाला.ती अनुभूती या कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी सांगितली.

या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन अवंतिका अडसोड या विद्यार्थिनी केले. या कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेच्या अध्यक्षा डॉ. स्मिता सूर्यवंशी, संस्थेचे सचिव प्रा. दिनेश सूर्यवंशी तसेच संस्थेचे कोषाध्यक्ष अभय सूर्यवंशी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# आयोडीन न्यूनता विकार ही एक सामाजिक समस्या

आधुनिक आणि धकाधकीच्या जीवनात काही आजाराचे प्रमाण बरेच अंशी वाढलेले आहे. अशाच आजारापैकी गलगंड हा एक आजार आहे. आयोडीन न्युनतेमुळे मानवाला सर्वसाधारण किंवा अतिशय गंभीर असे शारीरिक व मानसिक आजार होऊ शकतात. सहजासहजी दिसणारा आणि ओळखता येणारा गलगंड हे आयोडीन न्युनतेचे एक लक्षण आहे. आहारात आयोडीन न्युनता असणाऱ्या स्त्रियांमध्ये वारंवार गर्भपात व उपजत मृत्यु होतात. हायपोथॉयरडीझम मेंदुची वाढ खुंटणे बुध्धांक कमी होणे व बाल जिवित्वात घट असे दुष्परिणाम आय आयोडीनच्या कमतरतेमुळे होण्याची शक्यता असते.

गर्भवती स्त्रियांमध्ये जर गर्भपणात आयोडीनची कमतरता असेल तर गर्भाला पण आयोडीन कमतरता भासते आणि त्यांचे दुष्परिणाम थॉयरॉक्झिनच्या निर्मितीवर होतात. थॉयरॉक्झिनची निर्मिती योग्यरित्या न झाल्याने गर्भाची बौध्दिक व शारीरिक वाढ ही कायम स्वरुपाची व भविष्यात बौध्दिक विकासाला आळ घालणारी ठरु शकते. सर्वेक्षणात असो सिध्द झाले की, आयोडीनच्या कमतरतेमुळे सर्व शाळांमधील मुलांचा बुध्धांक हा १० ते १५ गुणानी कमी असतो.

**आयोडीनच्या न्युनतेमुळे होणारे विकार**

**जीवनातील टप्पे व त्यावर होणारे परिणाम**



**गर्भ :-** गर्भपात उपजत मृत्यु जन्मजात दोष. प्रसूती पश्चात बालमृत्यु मध्ये वाढ, अर्भक मृत्यु मधील वाढ. मज्जासंस्थेतील होणारे विकार, मतीमंदापणा, मानसिक पंगुत्व, ग्रंथीदोषामुळे येणारा मतीमंदापणा, खुंटकेपणा, खुजेपणा, मानसिक व शारीरिक दोष.

**नवजात** :- नवजात गलगंड, नवजात हायपोथायराडीझम गलगंड

**बालक** :- बाल्यवस्थेतील हायपोथैयराडीझम

प्रौढ :- मानसिक दुर्बलता, शारीरिक वाढ खुंटणे

**तरुण** : गलगंड व हायोथॉयरडीझम मानसिक दुर्बलता.

**बालकांना मतिमंदत्व का येते ?**

आईच्या गर्भाशयात वाढणाऱ्या बाळाला त्याच्या मेंदुच्या व शरीराच्या सर्वसाधारण वाढीसाठी आणि विकासासाठी योग्य प्रमाणात नियमित आयोडीनचा पुरवठा आवश्यक असतो. बाळाला फक्त आईच आवश्यक आयोडीनचा पुरवठा करु शकते. जर आईच्या शरीरामध्ये आयोडीनची कमतरता असेल तर गर्भाला सुध्दा आयोडीनचा पुरवठा होऊ शकत नाही. जर आईच्या शरीरात आयोडीनची कमतरता जास्त प्रमाणात असेल तर बाळाची शारीरिक व बौध्दिक वाढ कायमस्वरुपाची खुंटते आणि बाळ मतिमंद होतो. तसेच इतरांप्रमाणे बोलु चालु व विचार करु शकत नाही जर आईच्या शरीरातील आयोडीनची कमतरता सौम्य प्रमाणात असेल तर त्याचा परिणाम बाळावर होतो. आईच्या शरीरतील आयोडीन कमतरतेचा परिणाम बाळाच्या भावी आयुष्यात दिसुन येतो.

भविष्यामध्ये अशा समस्या टाळता याव्यात म्हणुन प्रत्येकांने जेवनात आयोडीनयुक्त मिठाचा वापर करावा. आयोडीनयुक्त मिठ हे साधेच मिठ असते. ज्यामध्ये आयोडीन हे संयुगाच्या स्वरुपात योग्य प्रमाणात मिसळलेले असते. आयोडीनयुक्त मिठ हे दिसायाला, चवीला आणि वासाला नेहमीच्या साध्या मिठा प्रमाणेच असते. ते आपण आपल्या रोजच्या जेवणात नेहमी प्रमाणे वापरु शकतो. हे मिठ अन्न शिजवतांना तसेच खाण्यासाठी सुध्दा वापरु शकतो.

साधारणतः जवळपास १५० मायक्रोग्रॅम एवढे मिठ रोज आहारात वापरले जाते. जर १५ पी.पी. एम.एवढे आयोडीनचे प्रमाण उपलब्ध असलेले आयोडीनयुक्त मीठ तयार करुन बाजारात उपलब्ध करुन दिले जात आहे.आयोडीनयुक्त मिठातील आयोडीन हे हवेतील उष्णता व दमटपणा यामुळे निघुन जाते म्हणून घसरगुती वापराकरिता वापरले जाणारे आयोडीनयुक्त मीठ हे उष्णतेपासुन लांब, हवाबंद आणि आर्द्रता विरहित बरणीमध्ये साठवून ठेवावे.

वाहतुकदार, घाऊक विक्रेते आणि किराकोळ विक्रेत्यांनी सुध्दा आयोडीनयुक्त मीठ वाहतुक करताना आणि साठवून ठेवताना त्याचा बाहेरिल वातावरणाशी (जसे सुर्यप्रकाश आणि पाऊस) संपर्क येऊन त्यातील आयोडीन निघुन जाणार नाही याची काळजी घ्यावयास हवी. आयोडीनयुक्त मिठ हे रोजच्या वापरात खुपच कमी लागते. हे लक्षात घेता आयोडीन न्युनता विकार यापासुन बचाव हा मोठा फायदा होण्यासाठी कुटुंबाला खुपच कमी किंमत मोजावी लागते. आधी नमुद केल्याप्रमाणे भविष्यात माता आणि मुले यांच्यावर कोणतेही दूरगामी परिणाम होऊ नयेत म्हणुन समाजातील प्रत्येक कुटुंबात आयोडीनयुक्त मिठाचाच वापर करावा.

**-डॉ. ज्योत्सना पोटपिटे**
प्राचार्य, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र,अमरावती

---

## चौकशीची जाहीर नोटीस

(नमुना क्र.०२)

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,अमरावती विभाग, अमरावती**

**फेरफार अहवाल/अर्ज क्र.२०२/२०२५**
**सार्वजनिक न्यासाचे नांव - नोंदणी क्रमांक** - **श्री महारुद्र हनुमान मंदिर ट्रस्ट आठवडी बाजार नवी वस्ती, बडनेरा, ता.जि.अमरावती**
**नोंदणी क्रमांक - ई - ७२६/अमरावती**
**बाबत अर्जदार - श्री.पवन महेशजी भिंडा**

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,
सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यासाचा सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय ?

२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**अ) जंगम मिळकत (वर्णन)** -

**ब) स्थावर मिळकत (वर्णन)** - नवी वस्ती बडनेरा महानगरपालिका अमरावती कर आकारणी सुची नुसार मालमत्ता क्र.२०२४, प्रमाणे महानगरपालिका अमरावती हददीतील कर आकारणीस पात्र असलेल्या ईमारत आणि जमीन यांची आकारणी सुची प्रमाणे आठवडी बाजार, नवी वस्ती बडनेरा, अमदापुर, ता.जि.अमरावती येथे श्री.महारुद्र हनुमान मंदिर स्थापित आहे. या मंदिराची जागा महानगरपालिका अमरावती कर आकारणी सुची नुसार मालमत्ता क्र.२०४४, प्रमाणे एकुण ९६९ चौ.फुट क्षेत्रफळ असलेला संपूर्ण जागा श्री महारुद्र हनुमान मंदिराची असुन या जागेत २०X २० चौ.फुट जागेमध्ये श्री महारुद्र हनुमान मंदिराचे (सिमेंट विटांचे) बांधकाम केलेले आहे व ५६९ चौ.फुट जागा ही खुली जागा आहे. चर्तुसिमा -पुर्वेस :- सरकारी रोड, पश्चिमेस :- दुकाने उत्तरेस :-सरकारी रोड, दक्षिणेस :- सरकारी रोड,

**स्थावर मालमत्ता अंदाजे किंमत - रु.१२,००,०००/- (बारा लाख रुपये )**

सदर चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणे असेल त्यांनी लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहाय्यक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक २४/१०/२०२५ रोजी दिली.

शिक्का

सही /-
अधीक्षक (न्याय शाखा)
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती**

---

## जाहीर सुचना

माझे पक्षकार यांनी मला दिलेल्या माहिती, सुचना व अधिकारान्वये मी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार नामे **श्री.अतुल रमेशराव पडोळे**, वय ५२ वर्षे, रा.राधाकृष्ण कॉलनी, मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती यांच्या खालील वर्णनाची मिळकत विकत घेण्याचा सौदा माझे पक्षकारासोबत करार केलेला आहे. त्या मालमत्तेचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन** - मौजा-जामठी, प्र.ता.पो.तु.मोर्शी, जि.अमरावती येथील शेत सर्व्हे नं.६/२, क्षेत्र हे.आर. १-७४, पो.,ख. ०.०८ आर, आ.रु.१.५०, भो.वर्ग-१ असून यात असलेल्या झाडाझुडपासह, जलपाषाणासह, दगड मातीसह व शेताला लागून असलेल्या पुर्वापार रस्त्याचे हक्कासह तसेच इतर सर्व प्रकारचे हक्क सोई व सुविधांसह शेतजमीन विकत घेण्याचा सौदा केलेला आहे. या शेतजमिनीची चतुःसिमा खालीलप्रमाणे आहे--

पुर्वेस - नितीन काकडे यांचे शेत
पश्चिमेस - एकनाथ पाटील यांचे शेत
उत्तरेस - रस्ता
दक्षिणेस - एकनाथ पाटील यांचे शेत

तरी वरील मिळकतीवर कोणाचेही कोणत्याही प्रकारचे कर्ज, गहाण, बोजा, हक्क, कूळ, हितसंबंध, न्यायालयीन प्रकरण व ईतर कोणत्याही प्रकारची भानगड असल्यास किंवा कोणतीही हरकत असल्यास सदर नोटीस प्रकाशित झाल्यापासून ७ दिवसांचे आत खालील पत्त्यावर लेखी सुचनेद्वारे किंवा प्रत्यक्ष भेटून दस्ताऐवजासह भेटावे. त्यानंतर सदर मिळकतीबाबत कोणत्याही प्रकारची हरकत विचारात घेतल्या जाणार नाही. व माझे पक्षकार सदर मिळकतीची खरेदीखत नोंदवून घेण्यास मोकळे राहतील.

सबब जाहीर सूचना

दिनांक /१०/२०२५

१. कल्पना दिनेशराव फणसे
२. दिनेश बापुराव फणसे
संताजी नगर, अमरावती
ता.जि.अमरावती

(ॲड.स्वराज रा.श्रीराव)
रा.राजगड, शिवाजी नगर,
बियाणी लेआऊट, सिंभोरा रोड,
मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती
मो.९७३०७५२७०६

---

**( C.J.J.D.) मा.दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**

**कि.आर.एम.जे.सी.अर्ज क्र.२४०/२०२५** — **ने.ता.१८.११.२०२५**

**चंद्रकांत // वि // निरंक**

१. **चंद्रकांत नारायण कोटांगळे,**
रा.वरखंडे चाळ जुनागाव ठाणे, ता.जि.ठाणे
२. **गजानन नारायण कोटांगळे**
रा.दाभा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

**// वि // निरंक**

ज्याअर्थी **सखुबाई नारायण कोटांगळे** यांचा मृत्यू दि.२१.०८.२०१७ रोजी दाभा, ता.नांदगाव खंडे, जि.अमरावती येथे झाला असुन ते तेथीलच **मुळ रहिवासी होते.** अ.क्र.१ ते२ ही मयत यांची मुले आहेत. अर्जदार हेच मयत यांचे कायदेशिर वारस आहेत. करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी **१०.३०** वाजता मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

**आज दिनांक २५ ऑगष्ट २०२५** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
मा. दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**श्री.के.ए.पट्टेबहादुर, अतिरिक्त दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.२३३०/२०२५
**सुशिला -वि- निरंक**
पुढील ता.२०.११.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
१. सुशिला अरुण उके, वय ७८ वर्षे, व्यवसाय - घरकाम
२. राजेश अरुण उके, वय ५२ वर्षे, व्यवसाय - मजुरी
दोघेही रा.संतोषी माता मंदिराजवळ, चिंचफैल रुक्मिणी नगर, अमरावती
३. संजय अरुण उके, वय ५७ वर्षे, व्यवसाय - मजुरी
रा.फ्लॅट नं.१६, विंग-ए, विश्रांती नगर, सिंहगड रोड, सिल्वर केस्ट हिंगणे खुर्द समोर पुणे
४. नंदकिशोर अरुण उके, वय ५५ वर्षे, व्यवसाय - मजुरी
रा.अंबा विला अपार्टमेंट फ्लॅट नं.५०६, अंबामाता मंदिर रोड राईजींग स्टार स्कूल सिरियल नं.४२/१२ अंबाई दारा धायरी गांव पुणे सिटी, वडगांव बॅंक जि,पुणे
५. रेखा विजय लांजेवार, वय ५९ वर्षे, व्यवसाय - घरीकाम
रा.विष्णु नगर, व्हीटीसी, कांडली, जि.अमरावती
६. सिमा अमर फरकुंदे, वय ५४ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.वार्ड नं.८, शिवाजी नगर, पो.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती
७. शुभांगी सचिन सहारे, वय ५० वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.डॉ.जोशी नर्सिंग होम, सहकार नगर, भंडारा

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत अरुण आत्मारामजी उके** यांचे दिनांक **२२.०१.२०२५** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अजदार सुशिला अरुण उके व ईतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सुशिला अरुण उके व ईतर** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१४.१०.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.६५४ — ने.ता.०४.१२.२०२५

**अर्जदार -**
१. श्री.विलास कृष्णराव देशमुख, वय ६५ वर्षे, धंदा - शेती
२. श्री.संजय कृष्णराव देशमुख, वय ५९ वर्षे, धंदा - शेती
दोघेही रा.खेड, ता.मोर्शी, जि.अमरावती
३. सौ.प्रभा विवेकराव जगताप, वय ६३ वर्षे, धंदा - घरकाम
रा.नांदपूर, ता.आर्वी, जि.वर्धा
४. सौ.अल्का जयंतराव देशमुख, वय ६७ वर्षे, धंदा - घरकाम
रा.गोपालखेड, पो.गांधीग्राम, ता.जि.अकोला

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार-** निरंक

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदाराचे वडील **कृष्णराव अजाबराव देशमुख** हे दि.**०३.०६.२०१०** रोजी **खेड**, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले असून अर्जदाराची आई नामे **सुशिला कृष्णराव देशमुख** ही दिनांक **०७.०५.२०२५** रोजी खेड, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मरण पावलेली आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**दिनांक १७.१०.२०२५**

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

---

## जाहीर नोटीस

**दि.२०/१०/२०२५**

माझे पक्षकार **सौ.ज्योती नरहरी पाठक, वय ६२ वर्षे, व्यवसाय-घरकाम, रा.फुबगाव, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती** यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन जाहीर नोटीस देतो ती येणेप्रमाणे :-

१) मौजा मुंडनारायण प्रगणे व ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती नगर पंचायत नांदगाव खंडेश्वर, जि.प.अमरावती येथील शेत सर्वे नं.१६/१ मधील वि.उपविभागीय अधिकारी साहेब, अमरावती यांच्या फाईलवरील रामाक्र./एन.ऐ.-३४/ मुंडनारायण/२०/२००१-२००२ दिनांक २९/०६/२००२ चे आदेशावरुन निवासी करिता लेआऊट कन्वरटेड झालेला प्लॉट नं. २८ ब, क्षेत्रफळ ११२.५० चौ.मी. (१२१०.५० चौ.फुट) घराचे आरसीसी स्वरुपाचे बांधकाम यात एक हॉल, एक किचन, एक बेडरुम, व संडास बांथरुम सह ज्याचे क्षेत्रफळ ७०० चौ.फुट आहे, यात एक नळ व विदयुत कनेक्शन सह व तसेच संपूर्ण बांधकाम व स्लॅपसह तसेच नगर पंचायत कार्यालय नांदगाव खंडेश्वर येथील प्रभाग क्रमांक १ प्लॉट क्रमांक ७०७ हा प्लॉट, ज्यांच्या चतुःसिमा-पुर्वेस-दिलीप पायघन यांचे घर, पश्चिमेस- लेआऊट मधील रोड, दक्षिणेस- प्लॉट नं. २९-अ, उत्तरेस-पदमाकर मेटकर यांचे घर, हा प्लॉट विकत घेण्याचा सौदा माझ्या पक्षकाराने प्रविण दिलीपराव चोरे, वय ४१ वर्षे, व्यवसाय-शेती, रा.बेलोरा धामक,ता. नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती यांच्या सोबत केलेला आहे, त्यावरुन त्यांनी माझे पक्षकारास सदर प्लॉटची नोटरी ईसारचिठ्ठी दिनांक ०६/०६/२०२५ रोजी दोन साक्षीदारासमंक्ष करुन दिलेली आहे.

२) माझे पक्षकार सदर प्लॉटची खरेदी करणार आहे. सदर प्लॉटवर कोणाचा बोजा, गहाण, ईसारचिठ्ठी, खरेदी खत, बॅंकेचा बोजा व गहाण खत असेल तर आपण माझ्या पक्षकारास किंवा मला सात दिवसाचे आत कळवावे, त्यानंतर माझे पक्षकार सदर प्लॉटची खरेदी करेल, त्यानंतर कोणाचा बोजा, गहाण, खरेदी, ईसारचिठ्ठी व बॅंकेचा बोजा व गहाण खत विचारात घेतले जाणार नाही व तसेच कोणाचीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, करिता सदरची जाहीर नोटीस देत आहे.

**दिनांक :-२०/१०/२०२५**

**पक्षकारातर्फे अधिवक्ता**
**(ॲड.पी.एम.ठाकरे)**
**मो.९४२३६४८३६५,९९२१०७५०६९**

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.६४७/२०२५ — ने.ता.२०.११.२०२५

**अर्जदार -**
१. श्री.रामदास विश्रामजी शेंद्रे, वय ६६ वर्षे, धंदा - शेती
२. श्री.राजकुमार रामदास शेंद्रे, वय ३५ वर्षे, धंदा - शेती
दोघेही रा.खेड, ता.मोर्शी, जि.अमरावती
३. सौ.कविता श्रीकृष्ण गजबे, वय ३३ वर्षे, धंदा - घरकाम
रा.घारफळ, ता.जि.अमरावती
४. सौ.अर्चना मोहन राऊत, वय ३१ वर्षे, धंदा - घरकाम
रा.तळेगांव ठाकुर, ता.तिवसा, जि.अकोला

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार-** निरंक

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ ची पत्नी तर अर्जदार नं.२ ते ४ यांची आई नामे **बेबी रामदासराव शेंद्रे** हे दि.**१७.०३.२०२५** रोजी **खेड**, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**दिनांक १६.१०.२०२५**

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

---

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ५१**
**आर.एन.आय.रजी.नं.** 49763/89 **पोस्टल लायसन क्र.** ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६९
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

एम.जे.क्र.२२०४/२०२५ — ने.ता.२४.११.२०२५

**अर्जदार :**
१. विनोद निळकंठराव केने, वय ६२ वर्षे, व्यवसाय - नोकरी
रा.कृषक कॉलनी मागे, राम नगर जवळ, अमरावती
२. वेदांत विनोद केने, वय २९ वर्षे, व्यवसाय - नोकरी
३. वरद विनोद केने, वय २७ वर्षे, व्यवसाय - नोकरी
१ व २ रा.स्पेलनडिड चौक, फ्लॅट नं.३०३ धनोरी रोड, लोहगांव, पुणे, ता.जि.पुणे

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** पोस्ट मास्टर,
कॅम्प, अमरावती, ता.जि.अमरावती

ज्याअर्थी अर्जदार यांनी भारतीय वारसा कायदा १९२५ च्या ककलम ३७२ अन्वये या न्यायालयात उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमुद केले आहे की, मयत **कल्पना विनोद केने** यांचे निधन दिनांक २७.०८.२०२४ रोजी झाले असून वरील अर्जदार त्यांचे कायदेशीर उत्तराधिकारी आहेत व इतर कोणीही मयतास उत्तराधिकारी नाही. सबब उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळावे.

त्याअर्थी सदर अर्जास कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत स्वतः जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत वि.दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) अमरावती या न्यायालयामध्ये हजर होऊन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही असे गृहित धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल, ह्याची नोंद घ्यावी.

आज दि.१७.१०.२०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय (व.स्तर) ,
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगरदेव, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२३३७/२०२५
**श्रीमती तुळसा अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.२६.११.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Smt.Tulasa Laxmanrao Parakhe, Age 66 Yrs. Occu.: Household
2. Mangesh Laxmanrao Parakhe, Age 45 Yrs. Occu.: Labour
3. Deepak Laxmanrao Parakhe, Age 40 Yrs. Occu.: Labour
Appli.No.1 to 3 all R/o Near Mahendra Colony, Khairiya Nagar, Amravati
4. Sarita Amol Adekar, Age 43 Yrs. Occu.: Household
R/o Near Buddha Vihar, Rahul Nagar, Bicchu Tekadi, Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **लक्ष्मण सोनाजी पारखे** हे दिनांक 15.05.2024 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **तुळसा अधिक तीन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **तुळसा अधिक तीन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१३.१०.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगरदेव, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२३७३/२०२५
**श्रीमती आशा अधिक एक -वि- निरंक**
पुढील ता.२८.११.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Asha Kalyan Ghosale (Bhosale), Age 42 Yrs. Occu.: Household
2. Akshya Kalyan Ghosale (Bhosale), Age 30 Yrs. Occu.: Labour
Both R/o Bahilolpur, Tq. Dist. Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **श्री. शकीला बेरलाल घोसले** हे दिनांक 04.10.2003 रोजी **काटआमला, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **आशा अधिक एक विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **आशा अधिक एक विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१५.१०.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

# रतन इंडिया प्रकल्पातील निःशुल्क राख प्रकरणी प्रशासन मौन

## व्यावसायिकांमध्ये संतापाची लाट

## लवकरात लवकर निर्णय न झाल्यास आंदोलन छेडण्याचा इशारा

**नांदगाव पेठ/वार्ताहर**

नांदगावपेठ एमआयडीसीतील रतन इंडिया औष्णिक वीज प्रकल्पातून दररोज हजारो टन कोळशाची राख निर्माण होत असून, या राखेच्या निशुल्क वितरणाबाबत प्रशासनाने अद्याप कोणताही ठोस निर्णय घेतलेला नाही. या संदर्भात स्थानिक व्यावसायिक, वीटभट्टीधारक आणि वाहतूकदारांनी अनेकदा जिल्हा प्रशासनाचे लक्ष वेधले, निवेदने दिली, पत्रव्यवहार केला, पण तरीसुद्धा जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयाकडून केवळ आश्वासने मिळत असून प्रत्यक्ष कारवाईचा अभाव कायम आहे. परिणामी, स्थानिक उद्योजक, बांधकाम व्यावसायिक आणि वाहतूक क्षेत्राशी संबंधित घटकांमध्ये तीव्र नाराजी आणि संतापाची लाट उसळली आहे.



रतन इंडिया प्रकल्पातून निघणारी राख सध्या खासगी ठेकेदारांमार्फत विकली जाते. मात्र ही प्रक्रिया पारदर्शक नसल्याचा गंभीर आरोप करण्यात येत आहे. स्थानिक व्यावसायिकांच्या मते, राख विक्रीत मोजक्या व्यावसायिकांना प्राधान्य दिले जात असून, स्थानिकांना राख मिळवण्यासाठी प्रचंड अडथळे निर्माण केले जातात. दरम्यान, कोराडी आणि मौदा औष्णिक प्रकल्पांमध्ये जिल्हा प्रशासनाने थेट हस्तक्षेप करून स्थानिक व्यावसायिकांना राखेचा निशुल्क लाभ मिळवून दिला आहे. केवळ एवढेच नव्हे, तर शासकीय आणि निमशासकीय प्रकल्पांमध्ये राख वापरण्यासाठी प्रति टन १२५ रुपयांचे अनुदान देखील देण्यात आले आहे. रतन इंडिया परिसरातील वीटभट्टीधारक, ट्रान्सपोर्ट असोसिएशन आणि स्थानिक औद्योगिक संघटनांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे यासंबंधी वारंवार निवेदने दिली आहेत. मात्र, प्रशासनाने या प्रकरणाकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप त्यांनी केला आहे. 'राख वितरणाची प्रक्रिया पारदर्शक करून स्थानिकांना निशुल्क राख देण्यात यावी, अन्यथा आम्हाला तीव्र आंदोलनाचा मार्ग पत्करावा लागेल,' असा इशारा वाहतूकदार संघटनेने दिला आहे.परिसरातील सामाजिक संघटनांनी देखील या प्रश्नावर प्रशासनाने तातडीने भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी केली आहे. राखेचा योग्य वापर न झाल्यास हवेतील प्रदूषण आणि जमीन दूषित होण्याचे प्रमाण वाढते. त्यामुळे हा विषय प्रशासनाने गांभीर्याने घेणे अत्यावश्यक आहे. यामुळे शेतजमिनींची सुपीकता घटते आणि नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होतो. त्यामुळे राखेचा योग्य वापर होणे पर्यावरणीय दृष्ट्याही आवश्यक ठरत आहे.

**पर्यावरण व स्थानिक अर्थव्यवस्थेला दिलासा देणारा निर्णय अपेक्षित**

**राखेचा वापर वीटभट्ट्या, सिमेंट, बांधकाम साहित्य आणि रस्ते बांधणीसाठी मोठ्या प्रमाणावर होऊ शकतो. जर प्रशासनाने स्थानिकांना निशुल्क राख देण्याचा निर्णय घेतला, तर स्थानिक उद्योगांचे उत्पादन खर्च कमी होतील, रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील आणि पर्यावरणीय हानीही टळेल.**

# असदपूर येथे प्रकल्पग्रस्तांची संवाद सभा

## बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष संघटनेचे आयोजन

**आसेगाव पूर्णा/वार्ताहर**

अचलपूर तालुक्यातील असदपूर येथे प्रकल्पग्रस्त संवाद सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेत प्रकल्पग्रस्तांच्या विविध महत्वपूर्ण समस्यांवर विचार मंथन करण्यात आले. संवाद सभेचे मुख्य मार्गदर्शक बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मनोज दादा चव्हाण यांनी उपस्थित शेकडो प्रकल्पग्रस्तांच्या समस्या ऐकून घेत प्रकल्पग्रस्तांशी संवाद साधला.



असदपूर/शहापूर ही गावे चंद्रभागा लघु प्रकल्पामुळे अंशतः बाधीत झाली असुन आठ ते दहा गावची चारशेहून अधिक हेक्टर सुपीक जमीन या प्रकल्पासाठी संपादित करण्यात संपादित करण्यात आली आहे.दोन हजार आठ पासून या प्रकल्पाचे निर्माण कार्य सुरू असुन प्रकल्पग्रस्तांच्या अनेक समस्या प्रलंबित असताना. अधिकाऱ्यांनी मात्र आपल्या अधिकाराचा गैर वापर करत कुठलाही वाजागाजा न करता गुपचुप पणे धरणाची घळभरणी केली. असदपूर व शहापूर या गावातील प्रकल्पाशी संबंधित प्रकल्पबाधित व्यक्तींच्या अनेक समस्यां प्रलंबित असताना धरणाची घळभरणी केलीच कशी असा खडा सवाल मनोज दादा चव्हाण यांनी मार्गदर्शन करताना केला. अनेकांच्या घरांचे मोजमाप योग्य रित्या केलें नसल्याने त्या प्रकल्पग्रस्तांना मुल्यांकन केलेल्या मालमत्तेचा मोबदला अत्यंत कमी देण्यात आला आहे. मिळालेल्या पैशात नवीन पुनर्वसन गावठाणात घरं बांधने शक्य होत नसल्याने अधिकाऱ्यांनी चुकीचे मुल्यांकन करुन प्रकल्पग्रस्तांची फसवणूक केली असल्याचे प्रकल्पग्रस्तांनी या संवाद सभेत आपल्या समस्या मांडताना सांगितले.



अजून प्रकल्पात १५ ते २० टक्केच पाणी साठले असताना मोठ्या प्रमाणावर समस्या निर्माण झाल्या आहेत, १०० टक्के पाणी साठा झाल्यावर काय परीस्थिती निर्माण होईल हे सांगता येत नाही. म्हणून संबंधित जलसंपदा/ भूसंपादन व जिल्हा पुनर्वसन विभागाने या संदर्भात योग्य कारवाई केली नाही तर येत्या काळात प्रकल्पग्रस्तांसह अन्य सामान्य नागरिकांचा शासन व प्रशासना प्रती तिव्र रोष पहायला मिळेल असा इशारा प्रकल्पग्रस्त संवाद सभेतून देण्यात आला. मंचावर उपस्थित गुलाम अली हाफीज साहेब, अतुल गिरी, सय्यद साजिद हाफीज शहा, सचिन ढवळे शरद शर्मा, साजिद टेलर ,शाहरिक शहा उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शेख नाशिर यांनी केले तर आभार प्रदर्शन हफीज शहा यांनी केले.

# दहावी,बारावीच्या परीक्षा शुल्कात सलग चौथ्या वर्षी भरीव वाढ

## पूरग्रस्तांना माफ, मात्र इतर विद्यार्थ्यांवर शुल्काचा मोठा भार

**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने दहावी आणि बारावीच्या परीक्षा शुल्कात पुन्हा एकदा वाढ केली. गतवर्षीच्या तुलनेत परीक्षा शुल्क ५० रुपयांनी वाढले आहे. त्यामुळे पालकांच्या खिशाला चांगलीच झळ पोहोचणार आहे. राज्यात ओला दुष्काळ जाहीर झाल्याने पूरग्रस्त विद्यार्थ्यांचे दहावी व बारावीचे परीक्षा शुल्क माफ झाले. इतर विद्यार्थ्यांवर मात्र अतिरिक्त वाढीव शुल्काचा मोठा भार पडणार आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने दहावी आणि बारावीच्या परीक्षा शुल्कात पुन्हा एकदा वाढ केली. गतवर्षीच्या तुलनेत परीक्षा शुल्क ५० रुपयांनी वाढले आहे. त्यामुळे पालकांच्या खिशाला चांगलीच झळ पोहोचणार आहे.राज्यात यावर्षी धो-धो पाऊस बरसला. अनेक भागात अतिवृष्टी होऊन पूरपरिस्थितीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या सर्व पार्श्वभूमीवर राज्य शासनाने पूरग्रस्त जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर केला.

त्या भागामध्ये दुष्काळाच्या सर्व सोयीसुविधा लागू झाल्या आहेत. त्यामध्ये दहावी व बारावीचे परीक्षा शुल्क माफ करण्याचा देखील समावेश आहे. दुष्काळाची परिस्थिती असतानाच राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने सलग चौथ्या वर्षी दहावी, बारावीच्या परीक्षा शुल्कामध्ये वाढ करण्याचा निर्णय घेतला. मार्च २०२६ मध्ये होणाऱ्या परीक्षेसाठी सुधारित शुल्क घेतले जात आहे. दहावीच्या नियमित विद्यार्थ्यांसाठी परीक्षा शुल्क आता ४७० वरून ५२० केले.

बारावीच्या विद्याथ्यर्थ्यांसाठीचे परीक्षा शुल्कही वाढविण्यात आले आहे. आता शुल्क ४९० वरून ५४० झाले आहे. शिक्षण मंडळाने केलेल्या शुल्क वाढीमुळे सर्वसामान्य पालकांवर अतिरिक्त आर्थिक भार पडत आहे. २०२६ मध्ये होणाऱ्या परीक्षांसाठी सुधारित शुल्क आकारण्यात येणार आहे. दरम्यान, या शुल्क वाढीपासून पूरग्रस्त भागातील दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना दिलासा मिळणार आहे. पूरग्रस्त भागातील दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याचा निर्णय शासनाने घेतल्याने लाखो विद्यार्थ्यांचे ते माफ होणार आहे. कागद, छपाई आणि प्रशासकीय खर्च वाढल्याचे कारण समोर करीत मंडळाने शुल्क वाढ केली. मंडळाने इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षा शुल्कात सुमारे १२ टक्के वाढ केली आहे. सर्वसामान्यांसाठी शिक्षण घेणे सध्या अडचणीचे व अत्यंत महागडे ठरत आहे.

त्यातच माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने दहावी व बारावीच्या परीक्षा शुल्कात वाढ करून शिक्षणाच्या खर्चात भर घातली. सलग चौथ्या वर्षी मंडळाने दहावी, बारावीच्या परीक्षा शुल्कामध्ये वाढ केल्याने पालकांमध्ये नाराजीचा सूर आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर देखील त्याचा परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# उभ्या ट्रॅक्टर ट्रॉलीला दुचाकीची धडक; एक ठार एक गंभीर

## अंजनगाव-अकोट माहमार्गावरील लखाड येथील घटणा

**अंजनगा सुर्जी/प्रतिनिधी**

अंजनगाव सुर्जी तालुक्यातील अंजनगाव -अकोट महामार्गा वरील लखाड गावाजवळ दुचाकीने उभ्या असलेल्या ट्रॅक्टरला धडकल्याने दुचाकीस्वार चालकचा मृत्यू झाला तर दुसरा गंभीर जखमी झाला. दि.२४ शुक्रवार रोजी सायंकाळी ६:३० वाजताच्या सुमारास हा अपघात घडला. मृतक मोटारसायकल चालकाचे नाव लक्ष्मण हिरे असे आहे. मिळालेल्या माहितीनुसार, लक्ष्मण हिरे आणि त्यांचा भाऊ २४ ऑक्टोबर रोजी शुक्रवारी संध्याकाळी अंजनगांवरुन आपल्या लखाड गावाकडे दुचाकीवरून येत होते. अमोल बाळकृष्ण वानखडे( ४०) यांनी लखाड गावाजवळील स्त्यावर निष्काळजीपणे ट्रॅक्टर उभा केला. संध्याकाळच्या अंधारात ट्रॅक्टर न दिसल्याने लक्ष्मण हिरे यांची दुचाकी ट्रॅक्टरला धडकली. लक्ष्मण हिरे दुचाकीवरून पडल्याने त्यांच्या डोक्याला आणि छातीला गंभीर दुखापत झाली असून त्यांचा जागीच मृत्यू झाला. लक्ष्मणचा भाऊही ज्ञानदेव स.हीरे गंभीर जखमी झाला. मृतकाचा मुलगा अशोक लक्ष्मण हिरे यांच्या तक्रारी वरून अंजनगाव सुर्जी पोलिसांनी अमोल वानखडे विरुद्ध भादंवि च्या कलम २८१, २८५, १२५ (आय) ए, १२५ (टी) आणि १०६ (१) मोटार परीवहन कलम २७९,३३७, ३३८,३०४(अ) अंतर्गत गुन्हा दाखल केला असुन झालेला अपघात नेमका कशामुळे व कोनत्या कारणे झाला हे चौकशी अंती व शव विच्छेदन अहवल आल्यानंतर स्पस्ट होणार आहे.

# 'भगवान बिरसा कलासंगम'ची विभागीय फेरी

## आदिवासींच्या कलागुणांना राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन

**अमरावती/का.प्र.**

आदिवासी एकता मित्र मंडळ, स्व. लक्ष्मणराव मानकर ट्रस्ट आणि प्रगती प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंती वर्षानिमित्त घेण्यात आलेल्या 'भगवान बिरसा कलासंगम' ही राज्यस्तरीय आदिवासी कलास्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

या स्पर्धेची पश्चिम विदर्भाची विभागीय फेरी अमरावती येथे , २८ ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आली आहे. सकाळी १० वाजता क्षीतिज पॅलेस, राजपूत धाब्याजवळ, नवसारी चौक, अमरावती येथे होणा-या या फेरीत पश्चिम विदर्भातील अकोला, अमरावती, बुलढाणा, वाशीम व यवतमाळ जिल्ह्यांतील ४०० स्पर्धक सहभागी होणार आहेत. महाराष्ट्रातील आदिवासी कलाकारांना संधी, सन्मान आणि राज्यस्तरीय ओळख मिळवून देण्याच्या उद्देशाने घेण्यात आलेल्या या स्पर्धेमध्ये नृत्य, गायन, वाद्य वादन, चित्रकला, हस्तकला, रील्स, व्लॉग्स, फोटोग्राफी तसेच डॉक्युमेंटरी आणि शॉर्ट फिल्म या प्रकारांत ही स्पर्धा घेण्यात येत आहे.

पूर्व विदर्भाकरिता ही स्पर्धा गडचिरोली येथे होणार असून महाराष्ट्र राज्यस्तरावरील स्पर्धेचे आयोजन नागपूर येथे पुढील महिन्यात केले जाणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागाच्यावतीने घेण्यात येणा-या या अंतिम फेरीतील विजेत्यांना भरघोस पारितोषिके दिली जाणार आहेत, असे लक्ष्मणराव मानकर ट्रस्टचे सचिव प्रशांत बोपर्डीकर यांनी कळवले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे संघटक महासचिव

# आ.संजय खोडके यांनी ग्रामीण कार्यकर्त्याशी साधला संवाद

**अमरावती/ का.प्र.**

महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक आपण महायुती म्हणून लढलो असो तरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंदर्भातील परिस्थिती ही वेगळी आहे. अमरावती जिल्ह्यात आगामी निडवणुका होण्याबाबतचे चित्र स्पष्ट झाले असून कमी कालावधी उरला आहे. या निवडणुकांमध्ये राष्ट्रवादी पक्षाला नवी ताकद व बळ द्यायचे आहे. यासाठी आतापासूनच जोमाने तयारीला लागून निवडणूका जिंकायच्या आहेत. कुठल्या जागांवर स्वबळाबर लढायचे, कुठे युती करायची अथवा मैत्रीपूर्ण लढत करायची, यासंदर्भात स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊनच निर्णय घ्यावा लागणार आहे, ही जबाबदारी स्थानिक नेतृत्वाने घेऊन एक प्रबळ, सक्षम व सर्वसमावेशक असा निवडून येणारा उमेदवार निश्चित करावा. यासाठी सर्वांनी मोठ्या ताकदीने व जोमाने कामाला लागा, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे संघटक महासचिव आमदार संजय खोडके यांनी केले.



आगामी काळात होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पूर्व तयारीच्या अनुषंगाने पश्चिम विदर्भाच्या दौऱ्यावर असलेले राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे संघटक महासचिव आमदार संजय खोडके यांच्या अध्यक्षतेखाली रविवार रोजी अमरावती जिल्हा ग्रामीण राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी अमरावती जिल्हा परिषद, नगर पालिका व पंचायत समिति निवडणुकांव्या पार्शवभूमीवर आढावा घेण्यात आला. आ. संजय खोडके यांनी पुढे सांगितले की, जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची विचारधारा मानणारा व राष्ट्रीय अध्यक्ष तसेच राज्याचे उप-मुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास दर्शविणारा मोठा जनाधार आहे. मात्र याचे रूपांतर मतांमध्ये होतांना दिसत नाही. आता कार्यकत्यांनी एकजूट होऊन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला बळ द्यायचे आहे. आ. संजय खोडके यांनी ग्रामीण भागातील कार्यकत्यांमध्ये नवा उत्साह निर्माण केला. तत्पूर्वी या बैठकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे संघटक महासचिव आमदार संजय खोडके यांनी अमरावती जिल्हा परिषदेच्या ५९ सर्कल, ११ नगर पालिका व ११८ पंचायत समितीच्या गण बाबत सविस्तर आढावा घेतला. बैठकीमध्ये महिला पदाधिकारी सुरेखा ठाकरे, जिल्हाध्यक्ष संतोष महात्मे यांनी मार्गदर्शन केले. या बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हा ग्रामीणचे पदाधिकारी, तालुकाध्यक्ष तसेच माजी नगराध्यक्ष व जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य तसेच कार्यकर्ते प्रामुख्याने उपस्थित होतें.

# चांदूरबाजार नेताजी मार्केटचे झडपी, रेलींगचे तुकडे पडू लागले

## नागरिकांच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह; अभियंत्यांच्या कामकाजावर टीका

**चांदूरबाजार/वार्ताहर**

येथील नगरपालिकेने उभारलेल्या नेताजी मार्केटची सध्या दुरवस्था झाली आहे. या मार्केटमधील दुकानांच्या झडपी आणि रेलींगचे तुकडे पडू लागले आहेत, ज्यामुळे नागरिकांच्या सुरक्षेला धोका निर्माण झाला आहे. सिमेंट आणि लोखंडाचा भराव असलेले हे तुकडे खाली उभ्या असलेल्या ग्राहकांच्या डोक्यावर पडल्यास मोठा अपघात होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नगरपालिकेच्या अभियंत्यांनी याकडे लक्ष देऊन मार्केटची तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.



या मार्केटची अवस्था इतकी जीर्ण झाली आहे की, तेथून ये-जा करणाऱ्या नागरिकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागतो. सततच्या मागणीनंतरही नगरपालिकेचे प्रशासन याकडे दुर्लक्ष करत असल्याने अभियंत्यांच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. नागरिकांच्या चर्चेतून हे मार्केट सध्या त्यांच्या जीवावर उठल्याची भावना व्यक्त होत आहे.

नेताजी चौकातील हे मार्केट तत्कालीन नगराध्यक्ष कमल उपाध्याय यांच्या कार्यकाळात बांधण्यात आले होते. चांदूरबाजार शहरातील हे पहिले मार्केट असून, त्याला बांधून जवळपास ३० वर्षे पूर्ण झाली आहेत. मार्केटमध्ये एका बाजूने कापड व्यवसाय तर दुसऱ्या बाजूने सराफा लाईन असल्याने येथे नेहमीच ग्राहकांची मोठी गर्दी असते. यावर्षी झालेल्या सततच्या पावसामुळे आणि जुनाटपणामुळे सिमेंटच्या प्लॅस्टरचे तुकडे अधिक वेगाने पडू लागले आहेत.

या मार्केटमध्ये वरच्या माळ्यावर जाण्यासाठी बांधण्यात आलेला लोखंडी जिनाही जीर्ण झाला आहे. पायऱ्यांवर चढताना नागरिकांना धोका पत्करून जावे लागते. या मार्केटमध्ये १०० हून अधिक दुकाने असल्याने ग्राहकांची वर्दळ मोठ्या प्रमाणात असते, ज्यामुळे भविष्यात मोठा अपघात होण्याची भीती वाढली आहे.

या मार्केटमधून नगरपालिकेला भाड्याच्या स्वरूपात लाखो रुपयांचे उत्पन्न मिळते, असे असूनही येथील व्यापाऱ्यांना आणि ग्राहकांना मूलभूत सुविधा पुरवण्यात नगरपालिका अपयशी ठरत आहे. कित्येक दिवसांपासून मार्केटचे तुकडे पडत असल्याने याची दुरुस्ती खूप पूर्वीच व्हायला हवी होती. नगरपालिकेचे कार्यालय या मार्केटपासून काही अंतरावरच असून, स्वतंत्र अभियंताही कार्यरत आहेत, तरीही या गंभीर समस्येकडे दुर्लक्ष केले जात असल्याबद्दल आश्चर्य व्यक्त होत आहे.

काही दिवसांपूर्वी या दुरुस्ती कामाचे टेंडर निघाले असले तरी, पुढे कामाची प्रगती का थांबली आहे, असा सवाल नागरिक विचारत आहेत. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि संभाव्य अपघात टाळण्यासाठी प्रशासनाने तातडीने याकडे लक्ष देऊन दुरुस्तीचे काम पूर्ण करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# अलायन्स एअर आठवड्यातून चार दिवस सेवा देणार

**अमरावती-** १६ एप्रिल रोजी अमरावती-मुंबई व्यावसायिक उड्डाण सेवा सुरू झाल्यापासून प्रवाशांच्या विमानाच्या वेळेबाबतच्या मागण्या अखेर उद्यापासून पूर्ण होत आहेत.

विशेष कामासाठी मुंबईला आणि मुंबईहून प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी हे सोयीस्कर असल्याचा दावा केला जात आहे. अलायन्स एअरचे स्थानिक व्यवस्थापक राजकुमार पटेल यांनी सांगितले की, रविवार, २६ ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या नवीन सेवा वेळेला प्रवाशांकडून चांगला प्रतिसाद मिळाला आहे. सर्व तिकिटे दोन दिवस आधीच बुक करण्यात आली आहेत. राजकुमार पटेल यांनी सांगितले की, मुंबईहून अमरावतीला जाणारी विमानसेवा आता सकाळी ७:०५ वाजता निघेल आणि सकाळी ८:५० वाजता अमरावती विमानतळावर उतरेल. अमरावती-मुंबई विमानसेवा सकाळी ९:१५ वाजता उड्डाण करेल आणि सकाळी ११ वाजता पोहोचेल. त्यांनी सांगितले की, उद्या, रविवार, २६ ऑक्टोबर आणि त्यानंतरच्या बुधवार, २९ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या विमानांच्या उड्डाणांची आधीच पूर्ण बुकिंग झाली आहे.




दरम्यान, व्यापारी समुदाय आणि उद्योगांनी नवीन उड्डाण वेळेचे स्वागत केले आहे. चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष विनोद कलंत्री यांनी सांगितले की, वेळेनुसार योग्य असल्यासच विमानांना प्रतिसाद मिळेल. अमरावती विमानतळावर रात्रीच्या विमान उतरवण्याच्या सुविधा तातडीने सुरू करण्याची मागणीही त्यांनी केली. या संदर्भात प्रशासनाशी चर्चा सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. लवकरच तेथे रात्रीच्या विमान उतरवण्याच्या सुविधा उपलब्ध होतील, ज्यामुळे इतर शहरांमध्येही उड्डाणे करता येतील. मेट्रोपॉलिटन चेंबरचे अध्यक्ष सुरेश जैन यांनी असेही सांगितले की, विमानांचे यश वेळेवर अवलंबून असते. वेळेत बदल होताच अमरावती-मुंबई विमान पूर्णपणे बुक झाले. त्यांनी इतर प्रमुख शहरे आणि राष्ट्रीय राजधानी नवी दिल्लीला थेट उड्डाणे करण्याची विनंतीही केली.

भाजप नेते आणि एमआयडीसी असोसिएशनचे अध्यक्ष किरण पातुरकर यांनी मुंबईला येणाऱ्या विमानांच्या अपेक्षित वेळेवर पुन्हा सुरू होण्याचे स्वागत केले आणि म्हटले की, यामुळे उद्योगांना निश्चितच फायदा होईल. मुंबईशी संपर्क सुधारेल. शेवटी, मुंबईला आर्थिक राजधानीचा दर्जा आहे. अमरावतीकडे मोठ्या उद्योगांना आकर्षित करण्यासाठी विमानतळाचे सक्रियकरण अत्यंत महत्त्वाचे आहे. हळूहळू, अमरावती हवाई नकाशावर प्रमुख स्थान मिळवेल. येत्या काही दिवसांत पुणे, बंगळुरू, अहमदाबाद आणि हैदराबाद यासारख्या शहरांसह चार महानगरांनाही विमानसेवा सुरू होईल असा विश्वास पातुरकर यांनी व्यक्त केला. त्यांनी असेही सांगितले की, मुंबईला लवकरच दररोज उड्डाणे होतील, ज्यामुळे उद्योगांना चालना मिळेल.

# शेतक-यांच्या कर्जमुक्तीसह विविध मागण्यांसाठी महाएल्गार

## बच्चू कडू यांच्या नेतृत्वात हजारो शेतकरी नागपुरला रवाना




**अचलपूर/प्रतिनिधीः-** शेतकरी कर्जमुक्तीच्या मुख्य मागणीसह इतर महत्वाच्या मागण्यांसाठी नागपुरात २८ ऑक्टोबरला शेतकऱ्यांचे प्रहारसह महाएल्गार आंदोलन होणार आहे.आज २७ ऑक्टोबर रोजी कुरळपूर्णा येथून हजारो शेतकरी बांधवसह माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांच्या नेतृत्वात महाएल्गार आंदोलन नागपूर च्या दिशेने रवाना झाले आहे. यावेळी गुरुकुंज मोझरी मध्ये भव्य दिव्य स्वागत करण्यात आले.गुरूकुंज मोझरी येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या समाधीचे दर्शन घेऊन माजी राज्यमंत्री बच्चू कडू हे वर्धे करीता रवाना झाले आहे .गुरूकुंज मोझरी पर्यंत २५० पेक्षा जास्त ट्रॅक्टर व ५० चारचाकी वाहन सहभागी होते .हळूहळू पुढील येणारे गावातून शेतकरी मोठ्या संख्येने ट्रॅक्टर सह सहभागी होऊन हे आंदोलन एतीहासिक ठरणार असल्याची प्रतिक्रिया अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक नितीन आगे यांनी दिली .

यावेळी बेलोरा तसेच विविध गावात पुष्प वर्षाव करून माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांचे स्वागत केले जात आहे. या आंदोलनाला दिव्यांग बांधवांनी पाठिंबा दिला आहे. राज्यातील दिव्यांग बांधवांच्या अनेक संघटनेचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थितीत आहे. या आंदोलनात अनेक शेतकऱ्यांनी स्वयंपूर्तीने सहभागी होऊन जेवणाचे साहित्य



,भाजीपाला ,किराणा ,झोपण्याचे साहित्य घेऊन सहभाग घेतला आहे .यावेळी उपस्थितीत शेतकरी , दिव्यांग बांधव एकत्र होऊन नागपुरात आरपारचे आंदोलन छेडणार असल्याचा निर्धार ही व्यक्त केला आहे. नागपूर येथे आयोजित आज महाएल्गार सभेला राज्यभरातून दिव्यांग बांधवांनी पाठिंबा दिला आहे. या सभेद्वारे शेतकरी कर्जमुक्ती, रोजगारनिर्मिती तसेच दिव्यांगांच्या अधिकारासंदर्भातील ठोस उपाययोजना करण्याची मागणी करण्यात येणार आहे. शेतकरी आणि दिव्यांगांचा आवाज शासनापर्यंत पोहोचवण्यासाठी हे आंदोलन ऐतिहासिक ठरेल, असे मत राज्याचे माजी मंत्री बच्चू कडू यांनी व्यक्त केले.राज्यातील विविध संघटना आणि सामाजिक कार्यकर्तेही या आंदोलनात सक्रिय सहभागी होत आहेत. या महाएल्गार आंदोलनाला राज्यभरातून शेतकरी, बेरोजगार युवक, दिव्यांग, मेंढपाळ, मच्छीमार आणि विविध घटक मोठ्या संख्येने दाखल होत आहेत. या सभेमुळे शेतकऱ्यांचा आवाज पुन्हा एकदा सत्ताधाऱ्यांपर्यंत पोहोचणार आहे.राज्याच्या कानाकोपऱ्यातून हजारो शेतकरी नागपूरकडे रवाना होत आहेत. राज्यातील विविध संघटनांनी यासभेला पाठिंबा जाहीर केला आहे. अनेक शेतकरी ☞(पान २

# एसटी बस व क्रुझर अपघातातील तिसऱ्या प्रवाशाचाही मृत्यू

### अंजनगाव-परतवाडा मार्गावर पांढरी फाट्याजवळील घटना



**अचलपूर/प्रतिनिधीः-** परतवाडा ठाण्याच्या हद्दीतील अंजनगांव सुर्जी ते परतवाडा मार्गावर येणी पांढरी गावाजवळ झालेल्या अपघातातील तिसऱ्या गंभीर जखमीचा रविवारी २६ ऑक्टोंबर रोजी उपचारा दरम्यान अमरावती येथील खासगी रुग्णालयात मृत्यु झाला.मुकुंद देशपांडे रा. गोमेवाडी ता. आटपाडी जि. सांगली असे मृत्यू पावलेल्या प्रवाशाचे नांव असल्याची माहिती परतवाडा ठाणेदार सुरेश म्हस्के यांनी दिली. शनिवारी सायंकाळच्या सुमारास एसटी बस व कुझरमध्ये जोरदार धडक झाल्याने हा भीषण अपघात झाला होता. त्यात क्रुझरमधील चालक आप्पासो राजाराम अतकरी (रा. खटाव, जि. सातारा) व दस्तगीर बाबुमिया मुलाणी रा. गोमेवाडी, ता. आटपाडी, जि. सांगली) या दोघांचा जागीच मृत्यू झाला होता, तर बिरुदेव तातोबा जावीर (रा. गोमेवाडी, ता. आटपाडी, जि. प्रकृती व मुकुंद देशपांडे यांची प्रकृती गंभीर असल्यामुळे त्यांना उपचाराकरिता अमरावती येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्या गंभीर जखमींपैकी मुकुंद ☞(पान २ वर)

# शहानूर नदी काठावर बेपत्ता तरुणाचा आढळला सांगाडा

### आधारकार्डमुळे पटली अक्षय गावंडेची ओळख



खल्लार/प्रतिनिधीः- येवदा येथील गेल्या महिन्यापासून बेपत्ता असलेल्या एका ३२ वर्षीय तरुणाचा सांगाडा (दि. २६) शहानूर नदीच्या काठावर झुडपांमध्ये आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली . मृतकाच्या खिशात सापडलेल्या आधारकार्ड आणि पॅनकार्डमुळे हा सांगाडा अक्षय धनराज गावंडे या तरुणाचा असल्याची ओळख पटली आहे.

येवदा येथिल रहिवासी असलेला अक्षय धनराज गावंडे हा तरुण दैनंदिन कामाप्रमाणे दि. २१ सप्टेंबर रोजी मेडीकल दुकानावर जातो असे सांगून घरातून बाहेर पडला होता. मात्र तो घरी परतला नाही. कुटुंबियांनी त्याची सर्वत्र शोधाशोध केली. परंतु तो कुठेही मिळून आला नाही. अखेर, कुटुंबियांनी दि. २७ सप्टेंबरला येवदा पोलिस स्टेशनमध्ये तो बेपत्ता झाल्याची फिर्याद दाखल केली होती. पोलिसांनी ☞(पान २ वर)

# स्वच्छता कंत्राटाच्या शर्यतीत चार कंपन्या

### कमी दर असणाऱ्या कंपनीला मिळेल २४० कोटीचा कंत्राट

**अमरावती/प्रतिनिधीः-** महानगरपालिकेच्या वतीने स्वच्छता कंत्राट निविदा प्रकाशित करण्यात आली होती. या निविदा प्रक्रिये मध्ये आरएडबी इन्फ्रा, पीजी रेड्डी, अर्बन एनवायरो व कोणार्क इन्फ्रा द्वारा निविदा सादर करण्यात आली आहे. आज सोमवार २७ ऑक्टोबरच्या सकाळी चारही कंपन्यांच्या निविदा खुल्या करण्यात आल्या. चारही निविदा धारकांच्या निविदा तांत्रिकी पद्धतीने तपासल्या जातील आणि ज्याचे दर सर्वात कमी राहील त्याला २४० कोटी रुपयाचा कंत्राट मिळण्याची शक्यता आहे.

महानगरपालिकेच्या वतीने कचरा संकलन आणि कचरा वाहतूक नेण्याकरिता संपूर्ण शहरात एकल कंत्राट पद्धती लागू करण्यासाठी निवेदा प्रकाशित करण्यात आल्या होत्या. गेल्या १४ ऑक्टोबर रोजी झालेल्या बैठक मध्ये इच्छुक एजन्सी कंपनीसोबत मनपा अधिकाऱ्यांनी चर्चा केली. बैठकी मध्ये सहभागी ७ कंपन्यां पैकी ४ कंपन्यांनी ऑनलाइन पद्धतीने विविध प्रस्ताव दाखल केले. निविदा प्रस्ताव सोमवारी उघडण्यात आले. आता



या निविदांची टेक्निकल तपासणी करण्यात येतील. एल वन म्हणजेच ज्याची दर सर्वात कमी राहतील त्या निविदा धारकाला २४० कोटी रुपयांचा कंत्राट दिला जाईल. सफाई कंत्राट प्राप्त करण्यासाठी अर्बन एन्व्हायरमेंट वेस्ट मॅनेजमेंट लिमिटेड नागपूर, कोणार्क मुंबई, पी गोपीनाथ रेड्डी कर्नाटक , आर एंड बी इन्फ्रा यांचा समावेश आहे. स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापनासाठी मनपाच्या वतीने सगळ्यात मोठा कंत्राट यावेळी दिल्या जात आहे. जकात कंत्राट प्रमाणेच या कंत्राटचे अंदाजे मूल्य २४० कोटी रुपये आहे. जी कंपनी हा कंत्राट प्राप्त करेल, त्यांना अमरावती शहरातील नागरी वस्तीतून साफसफाई आणि निघालेला कचरा संकलित करून त्याला सुकळी किंवा अकोली परिसरातील कंपोज डेपो पर्यंत पोहोचावा लागेल. महानगर पालिकेच्या ☞(पान २ वर)

# मनपा प्रस्तावित २९ हॉकर्स झोन रद्द करा

### -शहीद भगतसिंग युनियनची मागणी

अमरावती/प्रतिनिधीः- महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा यांच्या मान्यतेने नुकतेच शहरात २९ नवीन हॉकर्स झोन प्रस्तावित केले आहे. हे हॉकर्स झोन पूर्णपणे चुकीचे असल्याचा आरोप करत शहीद भगतसिंग युनियन च्या पदाधिकाऱ्यांनी हे हॉकर्स झोन रद्द करण्याची मागणी आज सोमवार २७ ऑक्टोबर रोजी महापालिका आयुक्तांना दिलेल्या निवेदनात केली आहे.



युनियनच्या म्हणण्यानुसार, पथ विक्रेता समितीच्या सहमतीने जी योजना मंजूर झाली, त्याला राज्य सरकारने मान्यता द्यावी. पथ विक्रेता करिता योजना २०१७ उच्च न्यायालयाने रद्द करण्याचे ठरविले आहे. तेव्हा सदर योजने अंतर्गत शहरात विविध ठिकाणी झोन तयार करण्यात येणार आहे. ते तातडीने रद्द करण्यात यावे. पथ विक्रेता समितीने शहरात अस्तित्वात असलेल्या व नव्याने आवश्यक ठिकाणी झोन तयार करण्यात यावे. शहर फेरीवाला समितीच्या काही दिवसापूर्वी झालेल्या बैठकीत हॉकर झोन मान्य नसल्याचे सांगितले होते, पण महापालिका प्रशासनाने पुन्हा नव्याने २९ हॉकर्स झोन प्रस्तावित केले आहे.यामुळे सर्व पथविक्रेता आणि हॉकरच्या अधिकारांचे हनन होत आहे. शहरात जे झोन हॉकर्स झोन प्रस्तावित केले आहे ते पूर्णपणे ☞(पान २ वर)

# पत्नीला जिवे मारण्याचा प्रयत्न

### आरोपी पतीला पोलिसांनी केली अटक

**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** शहरातील गोदावरी नगर येथे चारित्र्यावर संशय घेऊन पत्नीला दगडाने जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना रविवारी सायंकाळी सात वाजताच्या दरम्यान घडली असून या प्रकरणी आरोपी पती विरुद्ध चांदूर रेल्वे पोलिसांनी गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे.

उत्तम विश्वनाथ घोष (वय ४३ वर्ष, रा. चांदूर रेल्वे) असे अटक आरोपीचे नाव आहे. माहितीनुसार जखमी चंदा उत्तम घोष (वय ४१ वर्ष) हिचा आरोपी उत्तम विश्वनाथ घोष (वय ४३ वर्ष, रा. चांदूर रेल्वे) याच्या सोबत वीस वर्षांपूर्वी प्रेम विवाह झाला होता व ते चांदूर रेल्वे येथेच वास्तव्यास आहेत. आरोपीने पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत भांडण करून नालीच्या बाजूला पडलेला मोठा दगड हातात घेऊन पत्नीला डोक्यावर मारून गंभीर जखमी केले. यानंतर शेजाऱ्यांनी जखमी महिलेला रुग्णवाहिकेने स्थानिक ग्रामीण रुग्णालयात भरती केले जेथे प्राथमिक उपचारानंतर प्रकृती गंभीर असल्यामुळे तिला डॉक्टरांनी जिला सामान्य रुग्णालय, अमरावती येथे रेफर केले. फिर्यादी लक्ष्मी गुंडाळे यांच्या तक्रारीवरून चांदूर रेल्वे पोलिसांनी आरोपी उत्तम विश्वनाथ घोष याच्याविरुद्ध बीएनएस कलम १०९ (१) अन्वये गुन्हा दाखल केला असून आरोपीला पोलिसांनी २७ ऑक्टोंबरला मध्यरात्री अटक केली. आरोपीला सोमवारी चांदूर रेल्वे न्यायालयात हजर केले असता आरोपीला न्यायालयीन कोठडी सुनावून जेलमध्ये रवानगी करण्यात आली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पीएसआय रोहित कुदळे करीत आहे.

# देशी कट्टा व चाकूसह आरोपी ताब्यात

**दर्यापूर/प्रतिनिधीः-** देशी कट्टा व चाकू घेऊन दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने फिरणाऱ्या आरोपीला गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेतले आहे.




त्याच्या कडून देशी कट्टा व चाकू सह १० हजार २०० चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. अंकित किशोर घाटे (वय २९,जुनी तहसील जवळ दर्यापूर ) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. दर्यापूर पोलीस स्टेशन परिसरात गुन्हे शाखेचे पथक पेट्रोलिंग करीत असताना त्यांना माहिती मिळाली की दर्यापूर ते अंजनगाव रोडवर एमएससीबी कार्यालया जवळ एमआयडीसी रोडवर घातपात करण्याच्या उद्देशाने आरोपी धारदार ☞(पान २ वर)

# शिंदी बु. येथील गजानन महाराज व महादेव मंदिरातील दानपेट्या फोडल्या

### चोरटे सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद

**अचलपूर/प्रतिनिधीः-** अचलपूर तालुक्यातील ग्रामीण भागात चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असतानाच रविवारी मध्यरात्री शिंदी बु. येथील गजानन महाराज व महादेव मंदिरातील दानपेट्या फोडून रोकड लंपास केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे परिसरातील भाविक व ग्रामस्थांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी मंदिरांचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर दोन्ही मंदिरांतील दानपेट्या फोडून त्यातील रक्कम चोरट्यांनी लंपास केली. मंदिर परिसरात बसविण्यात आलेल्या



सीसीटीव्ही कॅमेऱ्यात चोरट्यांच्या हालचाली स्पष्टपणे कैद झाल्या असून, फुटेजच्या आधारे पोलिस तपास सुरू आहे.घटनेची माहिती मिळताच पथ्रोट पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. चोरट्यांनी चेहरा झाकलेला असल्याने त्यांची ओळख अद्याप पटलेली नाही. मात्र सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली ☞(पान २ वर)

# महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशन निवडणूक :

## रणजित सावरकर यांच्याविरुद्ध उभे रहाणार आमदार प्रवीण दरेकर

**मुंबई/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशनच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे नातू आणि महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशनचे विद्यमान अध्यक्ष रणजीत सावरकर यांच्या विरोधात आमदार प्रवीण दरेकर यांनी एक व्हिडिओ प्रसारित करून आपली उमेदवारी घोषित केली आहे. २४ ऑक्टोबरला प्रसारित केलेल्या या व्हिडिओमध्ये महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशनला ऊर्जितावस्थेत आणण्यासाठी जय कवळी यांच्या आग्रहाखातर मी उभा असून यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मला पूर्ण पाठिंबा दिला असल्याचा दावा प्रवीण दरेकर यांनी केला आहे.

मुख्यमंत्र्यांचे नाव वापरून प्रवीण दरेकर मतदारांची दिशाभूल करत त्यांच्यावर दबाव निर्माण करत आहेत, अशी चर्चा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांमध्ये सुरु आहे.

उल्लेखनीय म्हणजे उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशनची

### जय कवळी गटाचे प्रवीण दरेकरांना समर्थन



निवडणूक निष्पक्षपाती होण्यासाठी उपधर्मादाय आयुक्तांची निवडणूक अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. ९ नोव्हेंबर या दिवशी ही निवडणूक होणार आहे. अशा स्थितीत मुख्यमंत्र्यांचे जाहीरपणे नाव घेत प्रवीण दरेकर हे सगळ्यांवर दबाव आणण्याचे राजकारण करत असल्यामुळे निवडणूक निष्पक्षपाती कशी होणार, ही चर्चा सर्वत्र होत आहे.

**कोण आहेत जय कवळी ?** जय कवळी हे बॉक्सिंग फेडरेशन ऑफ इंडियाचे माजी सचिव असून भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली त्यांना २० जानेवारी २०२२ बॉक्सिंग फेडरेशन ऑफ इंडिया (इंघ्) च्या आदेशानुसार निलंबित करण्यात आले होते. त्याच वेळी ते महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशनचे अध्यक्ष असल्याने निलंबनानंतर त्यांना अध्यक्षपदाचा राजीनामा देणे भाग पडले. यामुळे १९ जून २०२२ मध्ये झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत रणजित सावरकर यांची अध्यक्षपदी एकमताने निवड करण्यात आली. आजही ते विद्यमान अध्यक्ष म्हणून कारभार करत आहेत.

बीएफआयने भ्रष्टाचाराच्या आरोपावरून जय कवळी यांना निलंबित केल्यानंतर महाराष्ट्र बॉक्सिंग आसोसिएशनमध्ये त्यांनी केलेल्या भ्रष्टाचाराची तक्रार रणजित सावरकर यांनी धर्मादाय आयुक्तांकडे केली आहे. त्याची चौकशी जवळपास पूर्ण झाली आहे. या प्रकरणी अन्य भ्रष्टाचाराच्या आरोपांबरोबरच त्यांनी ☞(पान २ वर)

# शेंदोळा परिसरातील अवैध दारुवर कारवाई



**अमरावती/प्रतिनिधीः-** अवैध दारूची विक्री,वाहतूक, बाळगणे संदर्भात केसेस करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याबाबत आदेश देण्यात आले होते. त्या अनुषंगाने पोलिसांनी आज सोमवार २७ ऑक्टोबर रोजी सकाळी ६ वाजता पासून नांदगाव पेठ पोलीस स्टेशन हद्दीतील शेंदोळा या गावांमध्ये सूर्यगंगा नदीच्या काठावर स्टाफ च्या मदतीने ४ ठिकाणी धाड मारण्यात आली. आरोपी मिथुन वीठ्ठल राठोड, तुकाराम रतनासिंग जाधव,सुना खुशाल राठोड, मनोज भावसिंग राठोड (सर्व रा. शेंदोंळा (बु) ☞(पान २ वर)